सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

**महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे - ४११००१**

# मार्गदीपिका

## कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५

### भाग ७

# सेवादायी संस्थांची भूमिका

कौटुंबिक हिंसा पीडित महिलेला न्याय मिळवून देताना......





लेखक : प्रसन्ना इनवल्ली
स्त्री अभ्यास केंद्र,
आयएलएस् विधी महाविद्यालय,
पुणे


SWISSAID

महाराष्ट्र शासन

महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे - ४११००१

# मार्गदीपिका

## कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५

भाग ७

# सेवादायी संस्थांची भूमिका

कौटुंबिक हिंसा पीडित महिलेला न्याय मिळवून देताना......




लेखक : प्रसन्ना इनवल्ली
स्त्री अभ्यास केंद्र,
आयएलएस् विधी महाविद्यालय,
पुणे

SWISSAID

# ‘कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५’

ह्या कायद्याखाली नेमलेल्या

# अधिकारी आणि सेवा पुरविणाऱ्यांसाठी मार्गदीपिकांचे ७ भाग

| | | |
|---|---|---|
| भाग १ | लिंगभाव आणि कौटुंबिक हिंसा | - मिलिंद चव्हाण |
| भाग २ | न्यायदंडाधिकाऱ्यांची भूमिका | - जया सागडे |
| भाग ३ | संरक्षण अधिकाऱ्यांची भूमिका | - प्रसन्ना इनवल्ली |
| भाग ४ | वकिलांची भूमिका | - रमा सरोदे |
| भाग ५ | वैद्यकीय सेवा देणाऱ्यांची भूमिका | - संगीता रेगे<br>- पद्मा देवस्थळी<br>- सुजाता आयार्कर |
| भाग ६ | पोलिसांची भूमिका | - मेधा देव<br>- तृप्ती पांचाल |
| भाग ७ | सेवादायी संस्थांची भूमिका | - प्रसन्ना इनवल्ली |

© स्वीसएड, सर्व लेखक; आय्एल्एस् विधी महाविद्यालय आणि महिला व बाल विकास बिभाग, महाराष्ट्र राज्य.

प्रकाशक : मा. आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे - ४११००१

२३.१२.२०१९

CHIEF JUSTICE
HIGH COURT AT BOMBAY
सत्यमेव जयते

## संदेश

कौटूंबिक हिंसेपासून स्त्रियांच्या संरक्षणाचा कायदा, २००५ हा दिवाणी स्वरुपाचा महत्वाचा कायदा आहे. हया कायद्याची परिणामकारक अंमलबजावणी होण्यासाठी अनेक घटकांवर जबाबदारी टाकलेली आहे. त्यातील न्यायाधिश आणि न्याययंत्रणा हा एक महत्वाचा घटक आहे.

कौटूंबिक हिंसेची समस्या गंभीर, गुंतागुंतीची आहे. पुरुषप्रधान आणि पितृसत्ताक समाजरचनेत, लिंगभावाधीष्ठीत होणारी हिंसा (शारीरिक, मानसिक, लैंगिक, आर्थिक, शाब्दिक) स्त्री–पुरुषामध्ये भेदभाव निर्माण करते. ही हिंसा स्त्रीच्या मानवी हक्कांचे आणि राज्यघटनेने दिलेल्या मूलभूत हक्कांचे उल्लंघन करते. हया पार्श्वभूमीवर कौटुंबिक हिंसेपासून स्त्रियांच्या संरक्षणाच्या कायद्याखालील येणाऱ्या प्रकरणांमध्ये न्यायालयांचा दृष्टीकोन अधिक संवेदनशिल असणे अपेक्षित आहे असे माननिय सर्वोच्च न्यायालयाने *कृष्णा भटाचारजी वि. सारथी चौधरी* (क्रिमिनल अपिल नंबर.१५४५/२०१५ निर्णय दिनांक २० नोव्हेंबर, २०१५) या न्यायनिर्णयात नमूद केलेले आहे.

कौटूंबिक हिंसेपासून स्त्रियांच्या संरक्षणाचा कायदा, २००५ हा कायदा स्त्रियांच्या हितासाठी केलेला आहे. त्यामुळे कायद्यातील तरतुदीचा अन्वयार्थ लावताना एकापेक्षा जास्त अर्थ निघत असतील तर कायद्यांच्या उद्दिष्टाला पूरक असा अर्थ निवडला पाहिजे. स्त्रियांना तो त्यांना जास्तीत जास्त न्याय्य कसा ठरेल हयाचा विचार व्हायला हवा.

आयएलस विधी महाविद्यालयाच्या स्त्री अभ्यास केंद्राने पुढाकार घेउन दंडाधिकाऱ्यांच्यासह संरक्षण अधिकारी, पोलीस, वैद्यकीय अधिकारी, सेवा देणाऱ्या संस्था आणि वकील हयांच्यासाठी तयार केलेल्या मार्गदीपिकांचे मी स्वागत करतो. या सर्व मार्गदीपिका कौटूंबिक हिंसेपासून स्त्रियांच्या संरक्षणाचा कायदा, २००५ मधील तरतुदींबाबत सर्वसमावेशक आहेत. विशेष म्हणजे 'लिंगभाव आणि कौटूंबिक हिंसा' ह्याविषयावरील स्वतंत्र मार्गदीपिका सर्व संबधित घटकांना उपयुक्त ठरेल असा मला विश्वास वाटतो.

सर्व हितसंबधाना माझ्या शुभेच्छा !

१६ ऑक्टोबर २०१८

(न्यायमुर्ती नरेश ह. पाटील)

# ऋणनिर्देश

“पीडब्ल्यूडीव्हीए काद्याखालील सर्व हितसंबंधियांसाठी मार्गदीपिका तयार करणे” ह्या प्रकल्पाला दिलेल्या अर्थसाहाय्यासाठी आणि संकल्पनात्मक रचनेसाठी आम्ही ‘स्विसएड इंडियाचे’ ऋणी आहोत.

मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश माननीय न्यायमूर्ती श्री. नरेश पाटील ह्यांनी दिलेल्या संदेशाबद्दल आम्ही त्यांचे विशेष ऋणी आहोत.

अनेक सहकार्यांच्या सहभागामुळेच हा प्रकल्प पूर्ण होऊ शकला. या सर्वांचेही आम्ही ऋणी आहोत. त्यांचा नामनिर्देश पुढीलप्रमाणे:

**लेखक**

- मार्गदीपिका - वकिलांची भूमिका - रमा सरोदे, आणि त्यांचे सहकारी असीम सरोदे ‘सहयोग’, पुणे, आणि इतर वकील
- मार्गदीपिका - वैद्यकीय सुविधा देणाऱ्यांची भूमिका - संगीता रेगे, पद्मा देवस्थळी, आरथी चंद्रशेखर, सुजाता आयार्कर - सेहत (CEHAT), मुंबई, आणि ‘दिलासा’ केंद्राचे सहकार - चित्रा जोशी, मृदुला सावंत, संजना चिक्लेकर
- मार्गदीपिका - पोलिसांची भूमिका - मेधा देव, तृप्ती पांचाल - टाटा सामाजिक विज्ञान संस्थेच्या, RCI-VAW आणि या विभागातील सहकारी - नंदकिशोर डहाळे, शीतल देवस्थळी, सुनिता पवार - मुंबई
- मार्गदीपिका - लिंगभाव आणि कौटुंबिक हिंसा - मिलिंद चव्हाण, लिंगभाव प्रशिक्षक, पुणे
- संरक्षण अधिकाऱ्यांची भूमिका लिहिताना प्रसन्ना इनवल्ली यांना महाराष्ट्र महिला-बाल विकास आयुक्तालय, आणि शहरी व ग्रामीण भागातील काही संरक्षण अधिकाऱ्यानी दिलेल्या माहितीबद्दल तसेच मार्गदीपिकेच्या कच्च्या मसुद्यावर प्रतिक्रया दिल्या बाबत आम्ही त्यांचे आभारी आहोत.

**अनुवाद साहाय्य**

सुषमा देशपांडे

**इतर साहाय्य**

आय्‌एल्‌एस्‌ विधी महाविद्यालयचे - अशोक माळवदे, योगेश सोनावणे, शुभांगी पुराणिक, प्रमोद राणे, हरिभाऊ दोडके, चंद्रकांत घुमे, वेंकट घतकार

**छपाई**

जलाराम कॉपियर्स, पुणे

**सर्वांना पुनः एकदा मनापासून धन्यवाद!**

## दोन शब्द ...

### सुरवात करताना ...

स्त्रियांवर होणारी कौटुंबिक हिंसा हा भारतातीलच नव्हे तर जगातील एक गंभीर सामाजिक प्रश्न आहे. कौटुंबिक हिंसेचे गंभीर आणि दूरगामी परिणाम केवळ स्त्रियांच्या आयुष्यावरच नाही तर कुटुंब आणि समाजावर होत असतात. २००५ पर्यंत कौटुंबिक हिंसेचे प्रश्न हे फौजदारी कायद्यातून हाताळले गेले होते. मात्र त्यातून पीडित स्त्रीची कुटुंबात राहून हिंसा थांबावी ही इच्छा पुरी होत नव्हती. उलट हिंसा करणाऱ्या सासरच्या लोकांना तुरुंगवासाची शिक्षा होत होती. त्यामुळे, ती कुटुंबापासून तुटत होती. या पार्श्वभूमीवर देश भरातील महिला संघटनांनी/ सामाजिक संघटनांनी एकत्रित आवाज उठवून कौटुंबिक हिंसेसंदर्भात दिवाणी स्वरूपाचा कायदा हवा, अशी मागणी केली. लॉयर्स कलेक्टिवने पुढाकार घेऊन 'कौटुंबिक हिंसेपासून महिलांचे संरक्षण कायद्याचे' प्रारूप तयार केले. देशातील वेगवेगळया भागांमध्ये जाऊन संघटनांबरोबर चर्चा करून या प्रारुपात बदल केले गेले आणि ते सरकारला सादर करण्यात आले. संसदेच्या दोन्ही गृहांनी या कायद्याला मान्यता दिली, आणि 'कौटुंबिक हिंसे पासून महिलांचे संरक्षण अधिनियम' *(पीडब्ल्यूडीव्हीए* - Protection Of Women from Domestic Violence Act) २००५ मध्ये अस्तित्वात आला. त्यानंतर या कायद्याखालील नियमांची बांधणी झाल्यावर २६/१०/२००६ रोजी या कायद्याची अंमलबजावणी सुरु झाली.

या कायद्याची अनेक वैशिष्ट्ये आहेत. त्यापैकी एक महत्वाचे वैशिष्ट्य म्हणजे कायद्याची अंमलबजावणी होण्यासाठी नेमलेली यंत्रणा. ह्या यंत्रणेचे न्यायाधीश, संरक्षण अधिकारी, वकील, वैद्यकीय सेवा देणारे, सेवादायी संस्था आणि पोलीस हे घटक आहेत.

ह्या सर्व घटकांच्या ह्या कायद्याअंतर्गत असलेल्या जबाबदाऱ्या आणि कर्तव्ये स्पष्ट करण्यासाठी स्त्री अभ्यास केंद्राने अनेक प्रशिक्षणे 'स्विसएड इंडिया'च्या आर्थिक साहायाने आयोजित केली. प्रत्येक प्रशिक्षणात 'लिंगभाव' या विषयावर  वर स्वतंत्र दीर्घ सत्र घेण्यात आले. अशी प्रशिक्षणे देशभर अनेक संस्था आयोजित करत होत्या. त्यामुळे अनेकांनी सर्व घटकांना उपयोगी होतील अशी मॅन्युअल्स तयार केली होती. मात्र मराठीत अशा प्रकारचे साहित्य उपलब्ध नव्हते. कायद्याच्या अंमलबजावणीसाठी प्रत्येक टप्प्यावर कसे काम करायचे, पिडीतेला न्याय मिळण्याच्या दृष्टीने कोणती पाऊले उचलायला पाहिजेत, काय खबदारी घ्यायची, इत्यादी मुद्द्यांच्या संदर्भात साहित्य निर्माण करण्याची गरज होती. स्त्री अभ्यास केंद्राने या कायद्याखालील नेमलेल्या यंत्रणेतील सर्व हितसंबंधीयांसाठी अशा प्रकारचे मराठीत साहित्य तयार करण्याचा दृष्टीने स्विसएड इंडियाच्या आर्थिक साहाय्याने एक प्रकल्प हाती

घेतला. या प्रकल्पाअंतर्गत १. **न्यायाधीश**, २. **संरक्षण अधिकारी**, ३. **वकील**, ४. **वैद्यकीय सेवा देणारे**, ५. **सेवादायी संस्था** आणि ६. **पोलीस** - ह्या प्रत्येक हितसंबंधियांसाठी स्वतंत्र मार्गदीपिका तयार करण्याचे ठरविले.

*पीडब्ल्यूडीव्हीए* कायद्याची बांधणी स्त्रीवादी भूमिकेतून स्त्रियांचे मुलभूत हक्क आणि मानवी हक्क यांची जपणूक आणि संवर्धन व्हावे या पायावर आधारित आहे. कौटुंबिक हिंसा स्त्रियांचा सन्मानाने जगण्याचा अधिकार काढून घेते आणि स्त्री-पुरुषामध्ये भेदभाव करते. या सर्व मुद्द्यांचा विचार करता स्त्रियांवर होणाऱ्या कौटुंबिक हिंसेकडे लिंगभावाच्या दृष्टिकोनातून बघणे फार आवश्यक आहे. अर्थातच त्यासाठी लिंगभाव म्हणजे काय हेही स्पष्ट असायला हवे. म्हणून वरील सहा मार्गदीपिकांबरोबरच **'लिंगभाव आणि कौटुंबिक हिंसा'** ही स्वतंत्र सातवी मार्गदीपिका तयार करण्याचे ठरविले.

ह्या सातही मार्गदीपिका लिहिण्यासाठी वेगवगळ्या हितसंबंधीयांच्या बरोबर *पीडब्ल्यूडीव्हीए* कायद्याखाली ज्यांनी विशेष काम केले आहे त्यांना लिहिण्याची विनंती करायची असे ठरवले. वकिलांसाठी सहयोग संस्था, पुणे; वैद्यकीय सेवा देणाऱ्यासाठी - सेहत संस्था, मुंबई; पोलिसांसाठी - टाटा सामाजिक विज्ञान संस्था, मुंबई; यांना विनंती केली. 'लिंगभाव आणि कौटुंबिक हिंसा या मार्गदीपिकेसाठी' - श्री. मिलिंद चव्हाण, लिंगभाव प्रशिक्षक; यांना विनंती केली. सर्वांनीच मार्गदीपिका लिहिण्याचे तत्परतेने मान्य केले. स्त्रीअभ्यास केंद्राने न्यायाधीश, संरक्षणअधिकारी आणि सेवादायी संस्था यांच्यासाठी मार्गदीपिका लिहिण्याची जबाबदारी घेतली.

ह्या सातही मार्गदीपिका आपल्यासमोर सादर करताना आम्हाला अतिशय आनंद होत आहे. केवळ स्विसएड इंडिया, ह्यांच्या आर्थिक साहाय्यामुळेच हे आम्हाला शक्य झाले.

ह्या मार्गदीपिका **सर्व हितसंबंधियांना आणि प्रशिक्षकांनाही** उपयुक्त ठरतील असा आम्हाला विश्वास वाटतो.

**डॉ जया सागडे** — **प्रसन्ना इनवल्ली**

**मानद संचालिका** — **समन्वयक**

**स्त्री अभ्यास केंद्र,**

**आय्एल्एस् विधी महाविद्यालय, पुणे**

२० ऑक्टोबर २०१८

# महिला व बाल विकास आयुक्तालय

## महाराष्ट्र शासन

सत्यमेव जयते
GOVERNMENT OF MAHARASHTRA

२८, राणीचा बाग, जुन्या सर्किट हाऊस शेजारी, पुणे- ४११००१

फोन : ०२०- २६३३००४० Email : commissionerwcd@ymail.com


क्र. : मबाविआ/ ६२०५        दिनांक : २३/१२/२०१९

## "संदेश"

महाराष्ट्र राज्याने महिलांच्या विविध प्रश्नांवर व त्यांच्यासाठी करण्यात आलेल्या उपायावर अनेक योजनांवर प्रगत पाऊले उचलली आहेत.राज्यपातळीवर कौटुंबिक हिंसेपासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ ची अंमलबजावणी महिला व बाल विकास विभागामार्फत सुरु आहे.या कायदयाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी संरक्षण अधिका-यांच्या नियुक्त्या करणे, त्यांचे प्रशिक्षण,त्यांच्या कार्यालयांना सोयी सुविधा पुरविणे, कायदयाच्या सनियंत्रणासाठी मुल्यांकन पध्दती विकसीत करून सांख्यिकी माहिती जिल्हा व तालुकास्तरावर अदयावत ठेवणे इ.अनेक महत्वाची कामे विभागामार्फत पार पाडली जात आहेत.

PWDVA २००५ कायदयाची अंमलबजावणीची जबाबदारी जरी विभागाची असली तरी या कायदयांतर्गत निश्चित केलेले सर्व स्टेकहोल्डर्स / सहभागी यंत्रणा यांची ही तितकीच महत्वाची जबाबदारी आहे. आय एल एस विधी महाविदयालयाच्या स्त्री अभ्यास केंद्राने सर्व सहभागी यंत्रणा / स्टेकहोल्डर्स जसे की, संरक्षण अधिकारी, वकील,पोलीस,वैदयकीय सेवा देणारे,सेवादायी संस्था आणि मा. न्यायदंडाधिकारी यांच्यासाठी तयार केलेल्या मार्गदर्शिका हया अत्यंत उपयुक्त असून त्याचा वापर सर्व स्टेकहोल्डर्सनी स्वतःच्या दैनंदिन कामात करणे आवश्यक आहे.जेणे करून पिडीत महिलेला लवकरात लवकर सर्व सेवा देणे शक्य होईल.

या मार्गदर्शिकेमध्ये दैनंदिन कामातही उदाहरणे देऊन टप्प्या टप्प्याने सर्व स्टेकहोल्डर्सच्या / सहभागी यंत्रणाच्या भूमिका व जबाबदा-या अधिक स्पष्ट करून सांगण्यात आल्या आहेत व त्या प्रत्येकासाठी उपयुक्त आहेत.

याबदल आय एल एस् विधी महाविदयालयाच्या स्त्री अभ्यास केंद्राचे विशेष आभार व PWDVA २००५ या कायदयाच्या अंमलबजावणीसाठी काम करणा-या सर्व सहभागी संस्था / यंत्रणा यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा !

(डॉ.हृषीकेश यशोद )
आयुक्त
महिला व बाल विकास
महाराष्ट्र राज्य,पुणे

मार्गदीपिका

'कौटुंबिक हिंसेपासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५'

**सेवादायी संस्थांची भूमिका**

# अनुक्रमणिका


१.० प्रस्तावना.....5

२.० 'सेवादायी संस्था' कोण असतात?.....10

३.० 'सेवादायी संस्था' म्हणून संस्थेची नोंद कशी होते?.....12

४.० सदर कायद्यामुळे सेवादायी संस्थेला कोणते अधिकार मिळतात?.....13

**५.० सर्व प्रकारच्या सेवादायी संस्थांची समान कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या**.....14

५.१ पीडितेवर / तिच्या मुलांवर झालेल्या कौटुंबिक हिंसेची माहिती मिळाल्यावर त्याची दखल घेणे.....14

सेवादायी संस्थेस कसे कळेल की महिला 'पीडिता' म्हणून सदर कायद्याखाली मदत घेऊ शकेल?.....15

५.२ पीडितेचे आत्मीयतेने स्वागत करणे, आणि सदर कायद्याचा वापर करण्यासाठी माहितीपूर्ण (ज्ञात) निर्णय घेण्यास साहाय्य करणे......17

**५.२.१ सदर कायद्याबाबत माहिती द्यावी.**.....17

**५.२.२ सदर कायद्याखाली ती जी कारवाई करेल तिचे परिणाम काय होतील आणि त्यांना तोंड कसे द्यावे याचा विचार करण्यास तिला साहाय्य करावे.**.....19

५.३ 'कौटुंबिक घटनेचा अहवाल' - *डीआयआर*- तयार करावा.....20

**५.३.१ 'कौटुंबिक घटनेचा अहवाल'- डीआयआर म्हणजे काय?**.....20

**५.३.२ *डीआयआर* कसा तयार करावा?**.....21

५.४ सदर कायद्याखाली कोणते आदेश मिळवता येतात?.....23

**५.४.१ संरक्षण आदेश कलम 18**.....23

**५.४.२ निवासाचे आदेश – कलम 19**.....25

**५.४.३ आर्थिक आदेश - कलम 20** ........................................................ 27

**५.४.४ ताबा आदेश- कलम 21** ........................................................ 28

**५.४.५ भरपाईचा आदेश - कलम 22** ........................................................ 29

**५.४.६ अंतरिम आणि एकतर्फी आदेश - कलम 23** ........................................................ 29

५.५ डीआयआर फॉर्म १ भरल्यानंतर काय करावे? ........................................................ 31

५.६ सुरक्षा योजना तयार करणे ........................................................ 33

**५.६.१ सुरक्षा नियोजन म्हणजे काय?** ........................................................ 33

**५.६.२ फॉर्म ५ नुसार सुरक्षा नियोजन कसे करावे?** ........................................................ 34

**५.६.३ सुरक्षा नियोजनाबद्दल लक्षात ठेवण्याचे काही महत्त्वाचे मुद्दे** ........................................................ 36

**५.६.४ सर्वोत्तम पध्दत—सदर कायद्याखाली सुरक्षा नियोजन कसे अमलात आणता येते.** ........................................................ 37

५.७ सेवादायी संस्थांनी इतर सहभागी यंत्रणांबरोबर समन्वयाने काम करावे. ........................................................ 39

**विशिष्ट सेवादायी संस्थांची कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या.** ........................................................ 40

**६.० आधार गृहांची भूमिका** ........................................................ 40

६.सदर कायद्याखाली आधार गृहांची नियुक्ती कशी केली जाते? ........................................................ 40

६.२ आश्रयाची मागणी कोण करू शकते? ........................................................ 41

६.३ आधार गृहांनी कोणत्या माध्यमातून आणि कोणत्या प्रकारे केलेली विनंती स्वीकारावी? ........................................................ 41

६.४ कौटुंबिक हिंसा पीडितेस आधार गृहात ठेवल्यानंतर काय करावे? ........................................................ 42

**७.० सदर कायद्याखालील -समुपदेशकाची भूमिका** ........................................................ 43

७.१ समुपदेशक कोण असते? ........................................................ 43

७.२ अर्जानुसार कायदेशीर कारवाईत 'सदर कायद्याखालील-समुपदेशक' म्हणून कोणाची नेमणूक करता येते? ........................................................ 44

७.३ सदर कायद्याखालील-समुपदेशकाने अनुसरावयाची कायदेशीर पध्दत ........................................................ 44

७.४ 'सदर कायद्याखालील-समुपदेशन' (काऊन्सेलिंग) आणि 'मध्यस्थी' (मिडिएशन) यात काय फरक आहे?....47
७.५ समुपदेशन म्हणजे काय?....53
७.६ व्यक्तींना मदत करण्याचे विविध मार्ग....53
७.७ हिंसा करणाऱ्या व्यक्तीस (पीडितेच्या जोडीदारास) समुपदेशन करणे....55
**७.७.१ अशा हिंसा करणाऱ्या व्यक्तीस जाणून घेणे**....55
**७.७.२ पितृसत्तेमधून आलेल्या असहायता ओळखणे**....62
**७.७.३ हिंसा करणाऱ्या व्यक्तीला स्वतःच्या समस्या ओळखायला आणि त्यांचा सामना करायला साहाय्य करणे**....64
**७.७.४ स्वतःकडून होणाऱ्या हिंसेला प्रतिबंध करण्यास मदत करणे**....66
७.८ नातेसंबंधाबाबत समुपदेशन करणे....68
७.९ सदर कायद्याखालील-समुपदेशकास प्रयत्न करण्यास असलेला मर्यादित वाव....70
७.१० समुपदेशनाविषयी अधिक....70
७.० समारोप....71

# मार्गदीपिका

## ‘कौटुंबिक हिंसेपासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५’

## **सेवादायी संस्थांची भूमिका**

## १.० प्रस्तावना

या मार्गदीपिकेच्या ‘लिंगभाव आणि कौटुंबिक हिंसा’ या पहिल्या भागात पितृसत्ताक पध्दतीत लिंगभावाची व्याख्या कशी केली गेली आहे, हे आपण पाहिले. तसेच पितृसत्ताक पध्दतीतून निपजलेले ‘लिंगभाव आणि सत्ता’ यांच्यातील नाते कौटुंबिक हिंसा चालू राहण्यासाठी प्रामुख्याने कसे जबाबदार असते, हेही आपण बघितले.

म्हणून कौटुंबिक हिंसेला ‘लिंगाधारित हिंसा’ असे मानले जाते. ‘महिलांच्या बाबतीत केला जाणारा सर्व प्रकारचा भेदभाव नष्ट करण्यासाठीचा आंतरराष्ट्रीय करार’ म्हणजेच CEDAW, यामध्ये कौटुंबिक हिंसेस मानवी हक्कांची पायमल्ली असे मानले जाते.

म्हणून कौटुंबिक हिंसेसारख्या कृतीं म्हणजे एका व्यक्तीचे दुसऱ्या व्यक्तीवरील फक्त आक्रमण किंवा रागाचे प्रकटीकरण नसते, हे लक्षात ठेवले पाहिजे. ही हिंसा जास्त करून फक्त महिलांवरच होते ही बाबच हे दर्शवून देते की ही हिंसा चालू राहण्यासाठी लिंगभावच मोठ्या प्रमाणात कारणीभूत असतो. आपण या आधी पाहिल्याप्रमाणे ३१% विवाहित महिला कौटुंबिक हिंसाचारास तोंड देत असतात. यात महिलांना नियंत्रित करण्यासाठी पितृसत्ताक पध्दतीने बहाल केलेल्या सत्तेचा पुरुष वापर करतात, आणि हीच सत्ता कौटुंबिक हिंसेच्या मुळाशी असते.

म्हणूनच सेवादायी संस्थांनी (ज्यांच्या सेवांची ‘कौटुंबिक हिंसेपासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५’ (यापुढे या अधिनियमाचा सदर कायदा असा उल्लेख केला जाईल) खाली स्वतंत्रपणे नोंद झाली आहे) आपल्याकडे मदतीसाठी येणाऱ्या प्रत्येक महिलेकडे लिंगभाव आणि सत्तासंबंधाच्या नजरेतून पाहणे गरजेचे आहे. या सत्तासंबंधांमुळे निर्माण होणाऱ्या तिच्या असहायता, भीती, काळजी, दुःख, आणि एकूणच जीवनातील अनिश्चिततेला संवेदनशीलतेने प्रतिसाद देणे गरजेचे आहे.

कौटुंबिक हिंसा ही लिंगाधारित आहे, या मूलभूत समजुतीच्या आधारावर सदर कायदा तयार केला आहे. म्हणून सदर कायद्यातील तरतुदी पीडित स्त्रियांच्या असहायतांना आणि

लिंगभावास संवेदनशीलतेने प्रतिसाद देतात. त्यानुसार त्यात 'तात्काळ' हिंसा थांबवा, मुलांचा ताबा आदेश, घरात राहण्याचा आदेश,आर्थिक आदेश अशा न्यायालयाच्या विविध आदेशांनुसार पीडितेस साहाय्य मिळणे, तसेच पीडितेस अधिकृत संस्था व व्यक्तींकडून आधार आणि योग्य साहाय्य मिळणे अशा महत्त्वाच्या तरतुदी आहेत. म्हणूनच त्याला 'हितकारक कायदा' असे म्हटले जाते.




दुसऱ्या शब्दात, आपण असे म्हणू शकतो की सदर कायद्यामधील तरतुदींमुळे संरक्षण अधिकाऱ्यांना (आणि इतर सहभागींना ) कौटुंबिक हिंसेने पोळलेल्या पीडितेला 'लिंगभाव-संवेदनशीलतेने' प्रतिसाद देता येतो आणि त्यामुळे हिंसेस तात्काळ आळा बसू शकतो आणि तिला न्याय मिळू शकतो. जर वर उल्लेखिलेल्या सर्व सहभागींनी आपापली नेमून दिलेली कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या पध्दतशीरपणे आणि लिंगभाव-संवेदनशीलतेने पार पाडल्या तर आपण असे म्हणू शकू की या कायद्याची सर्वार्थाने अंमलबजावणी झाली. परिणामतः त्याचा असाही अर्थ होतो की वरील सर्व सहभागींनी त्यांची भूमिका योग्य तऱ्हेने पार पाडली.

सदर कायदा असे मानतो की पीडित महिलेस अधिकृत व्यक्तींच्या तसेच संस्थांच्या आणि संघटनांच्या बहुविध सेवांचा लाभ घेण्याचा हक्क आहे आणि ही तिची एकत्रित आधार व्यवस्था आहे. सदर कायद्यास याची जाणीव आहे की जी महिला हिंसेचा प्रतिकार करते किंवा समाजाच्या प्रचलित रीतीविरुध्द जाते आणि तिचे हक्क बजावण्यासाठी कायद्याचा मार्ग अनुसरते ती अनेकदा एकटी पडते, तिच्या तथाकथित जवळच्या नातेवाईकांपासून दुरावते. हा कायदा कौटुंबिक हिंसेतून निर्माण होणाऱ्या शारीरिक, मानसिक आरोग्याच्या समस्यांची दखल घेतो. तसेच बेघर होणे, जीवाला धोका असणे, उत्पन्नाचा मार्ग नसणे, गरिबी, आणि अशाच अन्य परिणामांचीही दखल घेतो.

**आकृती : सदर कायद्याखालील आधार आणि प्रतिसाद यंत्रणा**




गेली कित्येक दशके महिलांचे गट, स्वयंसेवी संस्था, आणि अशासकीय संस्था कौटुंबिक हिंसापीडित स्त्रियांना राहण्यासाठी आधार म्हणून तात्पुरता निवास, वैद्यकीय सेवा, आर्थिक साहाय्य, व्यवसाय प्रशिक्षण, कायद्याचे साहाय्य, मानसिक आधार, आणि समुपदेशन इत्यादी स्वरूपात मोलाची मदत करत आहेत. अशा संस्थांची उत्कट इच्छा, समृध्द अनुभव, आणि त्यांची कार्यक्षमता यामुळे त्या जी महत्त्वाची भूमिका पार पाडू शकतात त्याची दखल म्हणून सदर कायदा कौटुंबिक हिंसापीडित महिलांना आधार आणि पाठिंबा देण्यासाठी त्यांची 'सेवादायी संस्था म्हणून नेमणूक करतो. अशा संस्थांना सदर कायद्यांतर्गत 'सेवादायी संस्था' म्हणून कायदेशीर मान्यता मिळवण्यासाठी त्यांना राज्य सरकारकडे अर्ज करावा लागतो. असा अर्ज केल्यावर त्यास सरकारची स्वीकृती मिळाली की त्याची नोंदणी होते व सदर कायद्याखाली सेवादायी संस्था म्हणून मान्यता मिळते. सदर कायदा अशा सेवादायी संस्थाना काही अधिकार देतो. अशा सेवादायी संस्थांचे सदस्य 'लोकसेवक' (भारतीय दंड संहिता, १८६० प्रमाणे) मानले जातात आणि ते काही कर्तव्यांशी बांधील असतात. त्याविषयी आपण ह्या मार्गदीपिकेत सविस्तर चर्चा करूया.

खालील तालिकेतून हिंसापीडित महिलेस संरक्षण अधिकारी आणि पोलिसांच्या सेवेव्यतिरिक्त कोणत्या सेवा उपलब्ध आहेत ती माहिती एका दृष्टिक्षेपात कळेल अशा स्वरूपात सादर केली आहे.

## हिंसापीडित महिलेस उपलब्ध असलेल्या सदर कायद्याखालील सेवा

| क्र. | सेवेचा प्रकार | सेवा कोण पुरवते | त्यांची नेमणूक कोण करते | नेमणुकीचा मार्ग | सदर कायद्यातील लागू असलेले कलम आणि नियम |
|---|---|---|---|---|---|
| १ | कायद्याचे साहाय्य | महाराष्ट्र विधिसेवा प्राधिकरण (लीगल एड ॲथॉरिटी) | राज्य सरकार | विधी सेवा प्राधिकरण अधिनियम, १९८७ | कलम 5(d), 9(1)(d) |
| | | सेवादायी संस्था (सदर कायद्यांतर्गत नोंदणीकृत संस्था) | सरकारी - महाराष्ट्र राज्य महिला बाल विकास विभाग | नोंदणी (अर्ज करून) आणि प्रमाणित करणे (प्रमाणपत्र मिळवणे) | कलम 10(1), 10(2) |
| २ | आधार गृह | सरकारने चालवलेली गृहे | राज्य शासन | शासनाच्या अधिसूचनेतून (नोटीफिकेशन) | कलम 2(t), 6, 9(1)(f) |
| | | सरकारी अनुदानित गृहे | राज्य शासन | शासनाच्या अधिसूचनेतून (नोटीफिकेशन) | कलम 2(t), 6, 9(1)(f) |
| | | सेवादायी संस्था (*पीडब्ल्यूडीव्हीए* अंतर्गत नोंदणीकृत संस्था) | राज्य शासन | नोंदणी करणे (अर्ज करून) आणि प्रमाणित करणे (प्रमाणपत्र मिळवणे) | कलम 10(1), 10(2) |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३ | वैद्यकीय सुविधा | सार्वजनिक आरोग्य | राज्य शासन | शासनाच्या अधिसूचनेतून (नोटीफिकेशन) | कलम 2(j) |
| | | सेवादायी संस्था (*प* सदर कायद्यांतर्गत नोंदणीकृत संस्था) | राज्य शासन | नोंदणी करणे (अर्ज करून) आणि प्रमाणित करणे | कलम 10(1), 10(2) |
| ४ | समुपदेशक | सेवादायी संस्था (*सदर कायद्यां*तर्गत नोंदणीकृत संस्था) | न्यायदंडाधिकारी (एका विशिष्ट केससाठी) | समुपदेशकांच्या सूचीतील सेवा पुरवणारा सदस्य | कलम 10(1), 10(2) नियम 13. |
| ५ | आर्थिक साहाय्य | सेवादायी संस्था (*सदर कायद्यां*तर्गत नोंदणीकृत संस्था) | राज्य शासन | नोंदणी करणे आणि प्रमाणित करणे | कलम 10(1), 10(2) |
| ५ | समुपदेशक | नोंदीकृत सेवा पुरवणाऱ्या संस्थेतील सदस्य | न्यायदंडाधिकारी | संरक्षण अधिकाऱ्यांना दिलेल्या सूचीतून | कलम 14, नियम13, नियम 14 |
| ६ | कुटुंब कल्याण तज्ज्ञ | न्यायदंडाधिकाऱ्यांना योग्य वाटेल अशी कोणतीही व्यक्ती | न्यायदंडाधिकारी | न्यायदंडाधिकाऱ्यांना योग्य वाटेल अशी कोणतीही व्यक्ती | कलम 15 |

**कृपया नोंद घ्यावी: सेवादायी संस्थांची नेमणूक करण्याकरता राज्य शासन जबाबदार असते (कलम १०).** वरील तालिकेतून असे दिसून येते की काही सेवांची सदर कायद्यामध्येच दखल घेतलेली आहे किंवा त्यांची राज्य शासनाच्या अधिसूचनेतून नोंदणी झाली आहे. यात राज्य विधिसेवा प्राधिकरण (कलम 5(d)) च्या कायदेविषयक साहाय्य सेवा, सार्वजनिक आरोग्य केंद्रांच्या वैद्यकीय सुविधा म्हणून अधिसूचित केलेल्या सेवा (कलम 2(j) आणि शासनातर्फे चालवलेल्या किंवा अनुदानित असलेल्या अधिसूचित केलेल्या आधार गृहांच्या सेवा (कलम 2(t)) यांचा समावेश होतो.

नोंदणीतून आणि प्रमाणित करून ज्यांची नेमणूक झाली आहे त्यांना अधिनियमात 'सेवादायी संस्था' असे म्हटले जाते. अशी नोंदणी करण्याकरता आणि प्रमाणित होण्याकरता त्यांना राज्य शासनाकडे अर्ज करावा लागतो. या मार्गदीपिकेतून सेवादायी संस्थांची नेमणूक कशी केली जाते, त्यांची पीडितेस साहाय्य करताना तसेच तिला आधार देताना कोणती कर्तव्ये आहेत आणि त्यांची भूमिका काय आहे हे आपणास समजेल.

**कृपया नोंद घ्यावी**: या मार्गदीपिकेत 'कौटुंबिक हिंसेपासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५' (यापुढे या अधिनियमाचा 'सदर कायदा' असा उल्लेख केला जाईल) आणि 'कौटुंबिक हिंसेपासून महिलांचे संरक्षण नियम, २००६' (यापुढे या नियमाचा 'सदर नियम' असा उल्लेख केला जाईल.) सदर कायद्याखालील तरतुदींचा उल्लेख **'कलम'** असा केला असून सदर या नियमाखालील तरतुदींचा उल्लेख **'नियम'** असा केला आहे. जर अन्य कोणत्याही कायद्यातील कलम किंवा नियम यांचा उल्लेख आल्यास त्या कायद्याचे नाव दिलेले आहे.

## २.० 'सेवादायी संस्था' कोण असतात?

कलम 2(r) अन्वये सेवादायी संस्था म्हणजे अशा व्यक्ती ज्यांची सदर कायद्याच्या कलम 10(1) खाली राज्य शासनाकडे (महाराष्ट्रात हे महिला आणि बालविकास खाते आहे) अर्जामार्फत नोंद झालेली असते, त्यांची अर्हता खालीलप्रमाणे असते:

- १८६०च्या सोसायटी रजिस्ट्रेशन अधिनियमाखाली नोंदणी केलेल्या स्वयंसेवी संस्था किंवा १९५६च्या कंपनी अधिनियमाखाली नोंदणी केलेल्या किंवा लागू असलेल्या कोणत्याही इतर कायद्याखाली नोंदणी केलेल्या कंपनी सेवादायी संस्था असू शकतात.
- कायदेशीर मार्गाने स्त्रियांचे हक्क आणि हितसंबंधांचे रक्षण करणे हे या संस्थांचे उद्दिष्ट असावे.
- या सेवांमध्ये कायदेविषयक साहाय्य, वैद्यकीय तसेच आर्थिक साहाय्य, आधार गृह, मानसोपचार, कुटुंबाचे समुपदेशन, व्यावसायिक प्रशिक्षण, कायदेविषयक जाणीव, कौटुंबिक हिंसेतून वाचलेल्या पीडितांना गट समुपदेशन आणि असेच अन्य काही यांचा समावेश होतो.
- कलम 30 अन्वये, 'सेवादायी संस्था' यांचे सदस्य हे 'लोकसेवक' (कलम 21, भारतीय दंड संहिता, १८६०, प्रमाणे) मानले जातात.

**या उपयुक्त सेवांच्या श्रेणीची 'सेवादायी संस्था' म्हणून नोंद करणे योग्य ठरेल**


विविध उपयुक्त सेवा
मानसोपचारतज्ज्ञ मानसशास्त्रज्ज्ञ
मुलांचे समुपदेशन
कुटुंबाचे समुपदेशन
अन्य सेवा - दिव्यांगांसाठी, कायद्याचे, आर्थिक, वैद्यकीय साहाय्य, आणि
व्यावसायिक प्रशिक्षण
आश्रयगृह
जाणीव जागृती कार्यक्रम घेणारे
गट समुपदेशन / आधारगट

## ३.० ‘सेवादायी संस्था’ म्हणून संस्थेची नोंद कशी होते?

या अर्जाचा नमुना सदर कायद्याच्या नियमांच्या नियम 11(1) मधील फॉर्म 6 मध्ये दिला आहे (परिशिष्ट १ पहा). याचा अर्थ ज्या संस्थांची/ संघटनांची/ कंपनींची अधिनियमाखाली नोंद झालेली नाही त्यांना कौटुंबिक हिंसा पीडितांना सेवा देण्याची बंदी आहे असा होत नाही; तर कलम 10(2) अन्वये सेवादायी संस्थांना जे अधिकार दिलेले आहेत ते अधिकार सदर कायद्याखाली नोंदणी न झालेल्या संस्थांना 'सेवादायी संस्था' म्हणून उपलब्ध नाहीत.

संस्थेचा मूलभूत तपशील देण्याव्यतिरिक्त अर्ज करणाऱ्या संस्थेने त्यांच्या अनेक सेवांपैकी कोणत्या सेवांची 'सेवादायी संस्था' या वर्गात नोंद केली जावी याचाही उल्लेख करावा. महाराष्ट्रात हा अर्ज महिला आणि बाल विकास खात्याच्या आयुक्तांकडे केला जातो.

नियम 11(1) मध्ये विशेष नमूद केलेल्या तीन अटी खालील प्रमाणे आहेत.

१. अर्ज करणाऱ्या संस्थेने अर्ज करण्याच्या तारखेपूर्वी लागोपाठ तीन वर्षे सेवा पुरवल्याची नोंद दाखवावी.
२. त्या त्या संबंधित नियामक अधिकाऱ्यांकडे (महाराष्ट्रात हे महिला आणि बालविकास आयुक्तालय आहे) त्याची नोंद केलेली असावी.
३. जर संस्था आधार गृहाची सुविधा पुरवत असेल तर नियुक्त केलेल्या अधिकाऱ्यांमार्फत त्याची तपासणी करणे राज्य शासनासाठी अनिवार्य असते. हे अधिकारी त्या आधार गृहाची जास्तीत जास्त किती जणांना राहता येते ती क्षमता, सुरक्षा व्यवस्था, आणि तेथे राहणाऱ्यांसाठी टेलिफोनसारखी संपर्क व्यवस्था कशी आहे याची पाहणी करून त्याचा अहवाल तयार करतात.

एकदा अर्ज सादर केल्यावर राज्य शासन सर्व पाहणी करून त्याची छाननी करते (नियम 11(2)) आणि जर अर्ज नाकारला गेला तर सेवा देणाऱ्यांचे म्हणणे ऐकून घेण्याची संधी त्यांना द्यावी लागते.

जर नोंदणी मान्य झाली तर राज्य शासन त्यांना सेवादायी संस्था म्हणून प्रमाणपत्र देते.

राज्य शासनाने संरक्षण अधिकाऱ्यांना सेवादायी संस्थांची यादी देणेसुध्दा अपेक्षित असते. तसेच ती यादी वर्तमानपत्रात किंवा वेबसाईटवर प्रसिध्द करणे अपेक्षित असते.

संरक्षण अधिकाऱ्यांनी सेवादायी संस्थांची नावे असलेली यादी अनुक्रमाने रजिस्टरमध्ये लिहून ठेवणे अपेक्षित असते.

## ४.० सदर कायद्यामुळे सेवादायी संस्थेला कोणते अधिकार मिळतात?

सदर कायद्याखाली नोंद झालेल्या सेवादायी संस्थेला खालील अधिकार असतात:

१. **कौटुंबिक हिंसा सहन करत असलेल्या महिलेची जर इच्छा असेल तरच** डीआयआर दाखल करता येतो आणि त्याची प्रत न्यायदंडाधिकारी आणि संरक्षण अधिकाऱ्यांकडे पाठवता येते. (कलम10(2)(a))

२. पीडितेची **वैद्यकीय तपासणी** करून त्याचा अहवाल संरक्षण अधिकाऱ्यांकडे आणि स्थानिक पोलिस स्टेशनकडे पाठवण्यासाठी मिळवता येतो. (कलम 10(2)(b)).

३. ज्या संरक्षण अधिकाऱ्यांनी ( ज्याच्या अधिकार क्षेत्रात सेवादायी संस्था असते) डीआयआर तयार केला त्यांच्या कडून **डीआयआरची प्रत पाठवली जाते किंवा घेता येते** (कलम 9(b)).

ज्या न्यायदंडाधिकाऱ्यांच्या कार्यक्षेत्रात सेवादायी संस्था असते त्या न्यायदंडाधिकाऱ्यांकडून सदर कायद्याखाली **कोर्टाच्या आदेशाची प्रत पाठवली जाते किंवा घेता येते.**

## सेवादायी संस्थांची कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या

वरील तालिकेमध्ये पाहिल्याप्रमाणे सेवादायी संस्था ज्या सेवा पुरवतात त्या अनेक प्रकारच्या असतात.

'सेवादायी संस्था' म्हणून सदर कायद्याखाली नोंद झाली आहे म्हणून त्या संस्थेचे हक्क सदर कायद्यापुरते मर्यादित राहत नाहीत, संस्थेच्या उद्दिष्टांप्रमाणे तसेच पध्दतीप्रमाणे कृती करण्यास मर्यादा येत नाहीत हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे. सदर कायद्याखाली नोंद झाल्यामुळे वर उल्लेख केल्याप्रमाणे त्यांना अतिरिक्त हक्क मिळतात आणि म्हणूनच काही विशिष्ट जबाबदाऱ्याही येतात.

खाली स्पष्ट केले आहे:

अ. सर्व सेवादायी संस्थांची कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या

ब. विशिष्ट सेवादायी संस्थांची कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या.

# ५.० सर्व प्रकारच्या सेवादायी संस्थांची समान कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या

## ५.१ पीडितेवर / तिच्या मुलांवर झालेल्या कौटुंबिक हिंसेची माहिती मिळाल्यावर त्याची दखल घेणे

✓ **माहिती देणारा त्रयस्थ किंवा पीडिता स्वतः असू शकते.**

फोनवरून, इ-मेलने, किंवा स्वतः येऊन इ.

↓

**दखल घेणे**

कौटुंबिक हिंसा 'झाली आहे,' 'होत आहे', किंवा 'होण्याची शक्यता आहे'

**अणीबाणीची परिस्थिती आहे का ते पडताळून पाहावे**

↓

अणीबाणी **असल्यास** सदर नियमांच्या **नियम 9** प्रमाणे कारवाई करावी:

**अ. घटनास्थळी जाण्यासाठी पोलिसांचे साहाय्य घ्यावे.**

**आ. तात्काळ सुरक्षा उपाय योजावेत - सुटका, वैद्यकीय मदत इ.**

**इ. डीआयआर आणि कलम 12 अन्वये न्यायदंडाधिकाऱ्यांकडे सुरक्षेसाठी अर्ज दाखल करावा.**

**सूचनाः** कायदेशीर कारवाईपूर्व किंवा ती चालू असताना किंवा नंतर जेव्हा कधी अणीबाणीचा प्रसंग येईल तेव्हा नियम 9 प्रमाणे कारवाई करावी.

**जर अणीबाणीची परिस्थिती नसेल तर सेवादायी संस्थेने खालील बाबी केल्या पाहिजेत:**

१. कलम 5 अन्वये माहिती पुरवावी.
२. पीडितेबरोबर योग्य ते सुरक्षा नियोजन करावे (नियम 8(1)), (4) पाहावा).
३. जर तिची इच्छा असेल तर डीआयआर (कलम 10(2)(a)) तयार करावा.
४. आवश्यकता असल्यास पीडितेची वैद्यकीय तपासणी करावी आणि वैद्यकीय तपासणीचा अहवाल मिळवावा.(कलम 10(2)(b))
५. पीडितेस गरज असल्यास तिला आश्रयगृहात आधार मिळतोय याची खात्री करून घ्यावी. (कलम 10(2)(c))
६. ती ज्या भागात राहत असेल त्या कार्यक्षेत्राच्या संरक्षण अधिकाऱ्यांकडे तिला पाठवावे.
७. आणि तिच्या सुरक्षिततेसाठी आणि संरक्षणासाठी अन्य काही साहाय्य हवे असल्यास तिला त्या संरक्षण अधिकाऱ्यांकडे पाठवावे.

संरक्षण अधिकारी किंवा न्यायदंडाधिकारी कौटुंबिक हिंसा पीडितेस साहाय्य करण्यासाठी/ मदत देण्यासाठी सेवादायी संस्थांकडे पाठवू शकतात.

कौटुंबिक हिंसा पीडितेस साहाय्य करण्यासाठी काय करायला पाहिजे याची सविस्तर माहिती खाली दिली आहे.

सेवादायी संस्थेस कसे कळेल की महिला 'पीडिता' म्हणून सदर कायद्याखाली मदत घेऊ शकेल?

तीन प्रश्नांची उत्तरे शोधा ......

१. महिलेवर '*कौटुंबिक हिंसा*' होत आहे का किंवा झाली आहे का ज्यामधे '*प्रतिवादीच्या*' वर्तनाने पीडितेस शारीरिक/ मानसिक/ भावनिक/ लैंगिक /आर्थिक दृष्ट्या अपाय / इजा/ छळ/ धमकी/ धोका आहे का ?

२. तिचे *प्रतिवादी*बरोबर '*कौटुंबिक नाते संबंध*' आहेत का / होते का?

३. ती '*सामाईक घरात*' राहत आहे का / राहत होती का?

वरील तीनही प्रश्नांची उत्तरे 'होय' असल्यास सदर कायद्याखाली मदत घेण्यास ती पात्र आहे.

सदर कायद्यानुसार *कौटुंबिक हिंसा* म्हणजे काय याची आपण पहिल्या भागात यापूर्वीच चर्चा केली आहे. त्याची उजळणी करूया की कौटुंबिक हिंसा म्हणजे ज्या व्यक्तीवर ती केली जाते तिला ती अपाय किंवा इजा करते मग ती हिंसा करणाऱ्या व्यक्तीने जाणून बुजून केलेली असो किंवा नसो. त्यात कौटुंबिक नातेसंबंधात असलेल्या व्यक्तीने केलेल्या शारीरिक, भावनिक, आर्थिक, आणि लैंगिक अशा सर्व प्रकारच्या हिंसेचा समावेश होतो.

यापुढे जाण्यापूर्वी आपण काही महत्त्वाच्या व्याख्या समजून घेऊया - जसे *प्रतिवादी, कौटुंबिक नातेसंबंध, सामाईक घर इ.*

## *सदर कायद्या*खालील काही महत्त्वाच्या व्याख्या

### ***कौटुंबिक नातेसंबंध* म्हणजे काय?**

*कौटुंबिक नातेसंबंध* म्हणजे जेव्हा -

- नातेसंबंधातील दोन व्यक्ती रक्ताच्या नात्याने, विवाहाने किंवा *विवाहसदृश नातेसंबंधा*मुळे किंवा दत्तकविधानामुळे नात्यात असतात
- दोन व्यक्ती सामाईक घरात राहतात किंवा एके काळी राहत होत्या
- किंवा कुटुंबातील सदस्य एकत्र कुटुंब म्हणून एकत्र राहत आहेत.

- **सदर कायद्यानुसार *प्रतिवादी* कोण असतो?**
- सदर कायद्याच्या कलम 2(q) च्या व्याख्येप्रमाणे प्रतिवादी म्हणजे कोणताही प्रौढ पुरुष जो पीडितेबरोबर कौटुंबिक नातेसंबंधात आहे आणि ज्याच्याविरुध्द तिने या कायद्याखाली मदतीची मागणी केलेली आहे.
- तथापि, प्रौढ स्त्री सुध्दा प्रतिवादी असू शकते फक्त ती पीडितेच्या वैवाहिक नातेसंबंधात किंवा विवाहसदृश नातेसंबंधात असली पाहिजे व ती नवऱ्याची किंवा पुरुष जोडीदाराची नातलग असली पाहिजे.(कलम 2(q)च्या Proviso प्रमाणे)
- तसेच अलिकडच्या न्यायालयीन निर्णया[1]प्रमाणे पीडितेबरोबर कौटुंबिक नातेसंबंधात असलेली कोणतीही स्त्री जरी ती प्रतिवादी नवऱ्याची/ पुरुष जोडीदाराची नातलग नसली तरी प्रतिवादी होऊ शकते.

**सामाईक घर म्हणजे काय?**

सदर कायद्याच्या कलम 2(s) अन्वये, सामाईक घर म्हणजे जिथे पीडिता कौटुंबिक नातेसंबंधात असताना एकटी अथवा प्रतिवादीसह राहत आहे किंवा राहत आली आहे/ होती. त्यात

- पीडितेच्या एकटीच्या किंवा पीडितेच्या आणि प्रतिवादीच्या भाड्याच्या किंवा स्वतःच्या घरात
- ज्यात दोघांच्या किंवा एकट्याच्या हक्क, नावे, किंवा हितसंबंध, भागीदारी आहे

अशा घराचा समावेश होतो. ते घर प्रतिवादी ज्याचा सदस्य आहे परंतु दोघांपैकी कोणाचाही त्यावर हक्क, नावे, हितसंबंध नाही अशा एकत्र कुटुंबाच्या मालकीचे आहे.

**विवाहसदृश नातेसंबंध म्हणजे काय?**

विवाहसदृश नातेसंबंध म्हणजे कायद्यानुसार सर्वसाधारण कायद्याप्रमाणे विवाह. तसेच (उच्च न्यायालयाच्या निकालानुसार) विवाहसदृश नातेसंबंध ओळखण्यासाठी न्यायालयीन निर्णयाने काही अटी दिल्या आहेत. त्यापैकी काही अटी खालीलप्रमाणे आहेतः

- त्यांच्या आजूबाजूचा समाज त्यांना ते जोडीदार असल्याप्रमाणे नवरा-बायको म्हणून ओळखतो.
- बराच काळ ते स्वेच्छेने एकत्र राहिलेले आहेत.
- त्या विवाहयोग्य वयाच्या प्रौढ व्यक्ती आहेत.
- ते असेही अविवाहित असल्याने कायदेशीर विवाह करण्यास योग्य आहेत..
- जेव्हा ते एकत्र राहायला सुरुवात करतात तेव्हा त्या स्त्रीला माहीत नसते की तो पुरुष आधीच विवाहित आहे.

[1] केस लॉ

## ५.२ पीडितेचे आत्मीयतेने स्वागत करणे, आणि सदर कायद्याचा वापर करण्यासाठी माहितीपूर्ण (ज्ञात) निर्णय घेण्यास साहाय्य करणे.

कौटुंबिक हिंसा पीडित महिला जर एखाद्या सेवादायी संस्थेकडे गेली किंवा तो (सदस्य) जर हिंसा घडत असताना तेथे हजर असला तर त्यांनी सदर कायद्याच्या कलम 5 अन्वये तिला माहिती देणे आवश्यक आहे. अशी तरतूद असणे याचाच अर्थ असा की महिलेस निवड करण्याचा तसेच माहितीपूर्ण (ज्ञात) निर्णय घेण्याच्या हक्काची दखल कायद्याने घेतली आहे.

**? पीडितेस माहितीपूर्ण (ज्ञात) निर्णय घेण्यास कसे साहाय्य कराल?**

**एखाद्या व्यक्तीचा/ पीडित महिलेचा निर्णय 'माहितीपूर्ण' (ज्ञात) आहे असे म्हणतात जेव्हा ........**

१. तिला माहिती असते (सदर कायद्याबाबत) -

   अ) तिच्या हक्कांविषयी

   ब) न्याय मिळवण्याच्या पर्यायांविषयी

   क) सदर कायद्याखाली उपलब्ध असलेल्या अनेक उपलब्धी/ सेवांविषयी

२. ती जे निर्णय घेईल, पर्यायांची निवड करेल, त्याच्या संभाव्य परिणामांची तिला जाणीव असते.

३. तिची त्या परिणामांना तोंड द्यायची किंवा ते हाताळायची तयारी असते.

**वरील बाबी लक्षात घेऊन पीडितेस माहितीपूर्ण (ज्ञात) निर्णय घेण्यास साहाय्य करण्यासाठी सेवादायी संस्थेने खालील गोष्टी कराव्यातः**

### ५.२.१ सदर कायद्याबाबत माहिती द्यावी.

✓ **कोणती माहिती द्यावी?**

पीडितेस माहितीपूर्ण (ज्ञात) निवड करण्याचा आणि त्यानुसार निर्णय घेण्याचा हक्क असतो हे सदर कायद्यास मान्य आहे. म्हणून सदर कायदा कलम 5 अन्वये संरक्षण अधिकाऱ्यांचे हे कर्तव्य आहे की त्याने पीडितेस सांगावे की तिला आणि तिच्या मुलांना कायद्यानुसार काय मिळेल.




✓ **माहिती कशी द्यावी?**

यासाठी सेवादायी संस्थेने खालील गोष्टी कराव्यातः

- सदर नियमांखालील फॉर्म ४ चा माहिती देण्यासाठी वापर करावा.
- तिला समजेल अशा भाषेत फॉर्म चारमधील मजकूर तिला समजावून सांगावा.
- तिला काही शंका आहेत का ते विचारावे आणि असल्यास त्यांचे निवारण करावे.

✓ **याशिवाय सेवादायी संस्था माहिती देण्यासाठी खालील गोष्टी करू शकेल.....**

- कायदेशीर कारवाईस प्रत्यक्षात **किती वेळ लागेल** त्याविषयी आणि कायद्याच्या कालमर्यादांविषयी सांगू शकेल.
- सेवादायी संस्था आणि कायद्याकडून **तिच्या काय अपेक्षा आहेत** ते विचारू शकेल आणि त्या अपेक्षा तर्कशुध्द आहेत का आणि सदर कायद्याच्या चौकटीत बसणाऱ्या आहेत का याचा अंदाज घेऊ शकेल.
- कायदा आणि सेवादायी संस्थांकडे (तिच्या अपेक्षांच्या संदर्भात) **देण्यासारखे काय आहे ते स्पष्ट** करू शकेल – उदा........
  - अधिनियमातील तरतुदींनुसार सेवादायी संस्थेस काय अधिकार आहेत
    - सदर कायदा काय करू शकतो आणि काय करू शकत नाही - (उदाः कायद्यानुसार तिला संरक्षण आदेश मिळू शकतो परंतु २४ तास संरक्षणासाठी माणूस देता येत नाही आणि तिने स्वतःहून काही सुरक्षेचे उपाय योजण्याची तयारी दाखवावी आणि त्याच वेळेस संरक्षण आदेश मिळवावा. सेवादायी संस्था तिला संरक्षण योजना तयार करण्यास साहाय्य करू शकेल.
    - तिला ही माहिती द्यावी की संरक्षण आदेशाचा भंग करणे हा सदर कायद्याखाली (कलम 31 अन्वये) गुन्हा आहे, तसे केल्यास प्रतिवादीवर फौजदारी कारवाई सुरू करता येते.

- जिल्हा महिला बालकल्याण विभागाने एक पुस्तिका तयार केली असून त्यात सदर कायद्यावरील माहिती दिली आहे. त्यात त्या विभागातील संरक्षण अधिकाऱ्यांचा संपर्क तपशील दिला असून आधार गृहे,समुपदेशन केंद्रे, आणि अन्य सेवादायी संस्थांची नावे आणि पत्ते तसेच पोलिस स्टेशनची माहिती दिली आहे. संरक्षण अधिकाऱ्यांनी त्यांच्याकडे साहाय्यासाठी येणाऱ्या महिलांना ही पुस्तिका द्यावी. परिशिष्ट ---- मध्ये नमुना पुस्तिका दिली आहे. जे संरक्षण अधिकारी या पुस्तिकेचा वापर करतील त्यांनी त्यातील माहिती वेळोवेळी अद्ययावत केली असल्याची खात्री करून घ्यावी.

## ५.२.२ सदर कायद्याखाली ती जी कारवाई करेल तिचे परिणाम काय होतील आणि त्यांना तोंड कसे द्यावे याचा विचार करण्यास तिला साहाय्य करावे.

यासाठी खाली दिलेल्या उदाहरणांप्रमाणे काही मुद्द्यांवर चर्चा करता येते ......

- प्रतिवादीस जेव्हा कळेल की तिने तक्रार केली आहे आणि सदर कायद्याखाली अर्ज दाखल केला आहे तेव्हा काय होईल? **हिंसेत वाढ होण्याची शक्यता आहे का**? आणि तसे असेल तर **सुरक्षेचे कोणते उपाय योजता येतील**?
- तिने सामाईक घरात राहण्यासाठी निवासाच्या आदेशासारखी काही **विशिष्ट आदेशांची मागणी केल्यास काय होईल?** निवासाच्या हक्कामध्ये असा **कोणता पर्याय आहे** की ज्यामुळे तिला अधिक चांगली सुरक्षितता मिळेल आणि जो अधिक योग्य ठरेल आणि का?
- आधार गृह, कायदेसाहाय्य , समुपदेशन आणि **अन्य सेवादायी संस्थांच्या सेवा तिला कोणत्या परिस्थितीत मिळू शकतील**?
- आणि पीडितेसाठी आणि तिच्या परिस्थितीसाठी असलेले विशेष अन्य प्रश्न.

**या प्रक्रियेमुळे तिला योग्य ती निवड करण्यास साहाय्य होईल.**

हे लक्षात घ्यायला हवे की तिच्या इतके अन्य कोणीच तिच्या परिस्थितीचा अंदाज घेऊ शकत नाहीत. संरक्षण अधिकाऱ्यांनी केस न्यायालयात दाखल करण्याविषयी तिला जी भीती वाटते त्याविषयी, तसेच तिच्यावर होणाऱ्या परिणामांची चर्चा करावी त्यामुळे तिला त्यावर मात करता येईल. संरक्षण अधिकाऱ्यांनी त्यांचे स्वतःचे मत पीडितेवर लादू नये किंवा कोणत्याही प्रकारे तिला अती खात्री देऊ नये.

## ५.३ 'कौटुंबिक घटनेचा अहवाल' - *डीआयआर*- तयार करावा

नियम 5(2) नुसार फॉर्म 1 मध्ये कलम 10(2)(a) अन्वये सेवादायी संस्थेने 'कौटुंबिक घटनेचा अहवाल' - *डीआयआर* तयार करावा.

### ५.३.१ 'कौटुंबिक घटनेचा अहवाल'- डीआयआर म्हणजे काय?

| **काय आहे** | **काय नाही** |
| --- | --- |
| • पीडितेने कौटुंबिक हिंसेच्या तक्रारीची संरक्षण अधिकाऱ्यांकडे (किंवा सेवादायी संस्थेकडे) केलेली नोंद<br>• ती सदर कायद्यामधील नियम 5(1) अन्वये 'फॉर्म १' मध्ये केली जाते. | • संरक्षण अधिकाऱ्यांनी केलेल्या "चौकशीचा" अहवाल नाही<br>• कायदेशीर विवादप्रक्रिया सुरू करणारा दस्तऐवज नाही |




***डीआयआर*मध्ये पीडितेच्या परिस्थितीचे आणि तिचे सर्वंकष चित्र दिसून येते.**

## ५.३.२ *डीआयआर* कसा तयार करावा?

✓ **पीडितेस खालील माहिती द्यावीः**

- डीआयआर म्हणजे काय, त्यातील मजकुराचे स्वरूप, आणि
- ती तोंड देत असलेल्या कौटुंबिक हिंसेचे गांभीर्य न्यायदंडाधिकाऱ्यांच्या मनावर ठसवण्यासाठी डीआयआरचे असलेले महत्त्व
- कौटुंबिक हिंसा ज्या ठिकाणी घडली त्या न्यायकक्षेतील संबंधित सेवादायी संस्था, पोलिस आणि न्यायदंडाधिकारी या सर्वांना डीआयआरच्या प्रती सादर केल्या जातील.

✓ **अचूक राहा**

- पीडिता तिचा जो अनुभव सांगते त्या आधारावर डीआयआर भरला जात आहे याची खात्री करून घ्यावी. कुठलीही बाब गृहीत धरू नका,परंतु कौटुंबिक घटनेची नोंद करताना सर्व तपशील बरोबर आहे का याची खात्री करून घ्यावी. सदर नियमांमध्ये दिलेला फॉर्म एक भरावा.

### *डीआयआर* फॉर्म १ (कौटुंबिक हिंसेचा अहवाल) कसा भरावा?

कृपया परिशिष्ट २ मधील डीआयआर फॉर्म १ पाहावा.

- **अनुक्रमांक १,२,३** हे फॉर्ममध्ये विचारल्याप्रमाणे भरावेत.
- **अनुक्रमांक ४** हिंसेच्या प्रत्येक प्रकारासाठी दिलेल्या रकान्यात विचारल्याप्रमाणे शारीरिक, लैंगिक, शाब्दिक, किंवा भावनिक, आर्थिक, हुंड्याशी संबंधित आणि अन्य कौटुंबिक हिंसेची कृत्ये घालावीत.
    - कोर्टाच्या नजरेस आणून देण्याची माहिती ठळकपणे दर्शवण्यासाठी अभिप्रायाच्या (रिमार्कस्) रकान्याचा वापर करावा- उदाः एखाद्या विशिष्ट प्रसंगाचा पीडितेवर झालेला परिणाम किंवा त्याची तीव्रता, त्याची वारंवारिता, किंवा त्याचा जीवाला असलेला धोका किंवा त्या प्रसंगात सामील असलेले अन्य लोक इ.
    - अनुक्रमांक चारमधील उपविभाग पाचमध्ये कौटुंबिक हिंसेच्या कृत्यांविषयी अन्य माहिती लिहावी उदाः मुलांवरील,पीडितेच्या आई- वडिलांवरील, तिला पाठिंबा देणाऱ्यांवरील हिंसक कृत्ये इ. ती कोर्टाच्या नजरेस आणून द्यावीत आणि अभिप्रायाच्या रकान्यात हिंसेचा मुलांच्या भावनिक आरोग्यावर, शाळेतील प्रगतीवर, शारीरिक आरोग्यावर झालेला परिणाम आणि अन्य माहिती अशी नोंद करावी.

- **अनुक्रमांक ५** फॉर्ममध्ये विचारल्याप्रमाणे भरावा.
- **अनुक्रमांक ६**
  - रकाना क्र. २ खाली 'तुम्हाला गरज असलेले आदेश' याखाली कलम 18 अन्वये संरक्षण आदेशास नेहमी 'हो' असे लिहावे.
    - रकाना क्र. ४ खाली 'अन्य' याखाली कोणत्या प्रकारचा आदेश ते विशेषत्वाने लिहावे. उदा-
      - संरक्षण आदेशात - आर्थिक, भावनिक, लैंगिक, शारीरिक छळ होतो का ते विशेषत्वाने लिहावे–पीडितेस आर्थिक छळापासून आणि भावनिक छळापासून संरक्षण असा संरक्षण आदेश हवा असतो.
      - निवासाच्या आदेशात - भाडे हवे आहे का किंवा सामाईक घराच्या काही भागाचा वापर करायचा आहे का किंवा अन्य काही हवे असल्यास तसा विशेष उल्लेख करावा.
      - पोटगीच्या आदेशात - किती रक्कम कोणासाठी हवी आहे त्याचा विशेष उल्लेख असावा
      - ताबा आदेशात - पीडितेस मुलाचा किंवा मुलांचा ताबा हवा आहे का किंवा त्यांना भेटण्यास जाण्याचा हक्क हवा आहे का ते लिहावे.
- **अनुक्रमांक ७** यात तुम्हाला हव्या असलेल्या साहाय्याविषयी रकान्यात विचारल्याप्रमाणे लिहावे आणि कोणत्या स्वरूपाचे साहाय्य हवे आहे ते लिहिले असल्याची खात्री करावी.

### ? भूतकाळात घडलेल्या कौटुंबिक हिंसेच्या घटनेची तारीख, वार, वेळ व स्थान पीडितेस आठवत नसेल तर काय करावे ?

तिला ज्याची खात्री आहे असा तपशील लिहावा.
पीडितेस नुकतीच घडलेली घटना आठवत असेल परंतु भूतकाळातील घटना आठवणार नाही अशा वेळेस, तिला जे नक्की आठवते त्याविषयी तपशीलवार लिहावे आणि अभिप्रायाच्या रकान्यात अशा हिंसक प्रसंगांची साधारण वारंवारिता आणि पूर्वी असे किती वेळा घडले ते लिहावे.

अनुक्रमांक ६ भरण्यासाठी सदर कायद्याखाली कोणते आदेश मिळवता येतात व त्यांचे महत्त्व काय आहे हे आपण समजून घेऊया.

## ५.४ सदर कायद्याखाली कोणते आदेश मिळवता येतात?

सदर कायद्याखाली मिळवता येणारे आदेश खालील आकृतीत दर्शवले आहेत. कलम 18 अन्वये मिळणारा संरक्षणाचा आदेश म्हणजेच 'हिंसा थांबवा आदेश' हा सदर कायद्याचा प्राणच आहे. कलम 19 ते 21 अन्वये मिळणारे अन्य सर्व आदेश म्हणजे कौटुंबिक हिंसा चालू नाही, होणार नाही आणि पुन्हा केली जाणार नाही याची खात्री देणारा दिलासा किंवा इलाज आहे.




कलम 18 ते 22 खाली संरक्षणासाठी आणि साहयासाठी अंतरिम आणि एकतर्फी आदेशही मिळवता येतात.

### ५.४.१ संरक्षण आदेश कलम 18

- संरक्षण आदेश म्हणजे 'हिंसा थांबवा' आदेश, म्हणजेच शारीरिक, भावनिक, आर्थिक किंवा लैंगिक अशी कोणत्याही प्रकारची हिंसा थांबवणे.
- त्याचा फक्त चालू असलेली हिंसा थांबवण्याशी संबंध नसून कोणत्याही प्रकारची हिंसा पुन्हा होऊ नये, किंवा होऊच नये याच्याशी असतो.

- कलम 18 मध्ये विशेषत्वाने दाखवलेले कोणतेही आदेश न्यायदंडाधिकारी देऊ शकतात, त्यापैकी काही फॉर्म २ च्या अनुक्रमांक ३(१) मध्ये दिले आहेत.
- हिंसेच्या कृतीविषयीचे विशेष आदेश जे फॉर्म २ च्या अनुक्रमांक ३(१) मध्ये दिलेले नाहीत त्यांचीसुध्दा 'अन्य इतर आदेशात' मागणी करता येते.

**पूर्वसूचनाः** सदर कायद्याच्या कलम 3 चा संदर्भ पाहावा- आणि विनंती तयार करण्याकरता कौटुंबिक हिंसेच्या व्याख्येचा वापर करा. त्यामुळे सर्व प्रकारच्या हिंसेसाठी संरक्षण आदेश खात्रीपूर्वक मिळेल आणि विनंती केलेल्या साहाय्याचे समर्थन होईल.

आधी दिलेल्या सूचीत घालता येतील अशी विनंतींची काही उदाहरणे -

- *'प्रतिवादीस कोणत्याही प्रकारची कौटुंबिक हिंसा करण्यापासून प्रतिबंध'* करणाऱ्या साधारण आदेशाची विनंती करता येते.

काही विशिष्ट आदेशांची सुध्दा विनंती करता येते -

- *"पीडितेस दैनंदिन घरगुती गरजांपासून आणि तिच्या पोटगीच्या हक्कापासून वंचित राहावे लागते म्हणून प्रतिवादीस आर्थिक छळ करण्यास प्रतिबंध करणे"*
- *"पीडितेच्या घरकामावर सतत टीका करणे व तिच्या आई-वडिलांना शिव्या देणे या प्रतिवादी करत असलेल्या भावनिक छळास प्रतिबंध करणे."*
- *"मुलीवर विवाहाची जबरदस्ती करण्यापासून आई-वडिलांना थांबवणे"*

## कौटुंबिक हिंसेच्या प्रत्येक केसमध्ये संरक्षण आदेश मिळणे का महत्त्वाचे आहे त्याची पाच कारणेः

१. कलम 18 अन्वये पास केलेला संरक्षण आदेश जोपर्यंत पीडिता न्यायदंडाधिकाऱ्यांकडे विनंती करून **मागे घेत नाही तोपर्यंत तो वैध असतो आणि लागू असतो.** म्हणजेच जोपर्यंत पीडितेस सुरक्षित वाटत नाही आणि प्रतिवादीची हिंसक वागणूक/ कृत्ये थांबली आहेत असे वाटत नाही तोपर्यंत तो आदेश लागू असतो.

२. संरक्षण आदेश असा विश्वास निर्माण करतो / वाढवतो की -

   अ. महिलेस (आणि तिच्या मुलांना) हिंसामुक्त, शांततापूर्ण आणि सन्मानपूर्वक जीवन जगण्याचा हक्क आहे आणि

   आ. कौटुंबिक हिंसा ही अशी घटना आहे की ती सहन केली जाऊ नये आणि त्यासाठी त्या महिलेस सदर कायद्याखाली इलाजांची मागणी करण्याचा हक्क आहे

३. पीडितेस हिंसा थांबायला हवीच असते. आणि तसे निर्देश सर्वोच्च अधिकाऱ्याने दिल्यामुळे, प्रतिवादी हिंसा थांबवण्याचा निर्देश पाळण्याची / ऐकण्याची शक्यता वाढते.

४. संरक्षण आदेशाचा भंग केल्यास तो सदर कायद्याच्या कलम *31* अन्वये गुन्हा असून त्यासाठी एक वर्षापर्यंत कैद आणि/ किंवा २०,००० रु. पर्यंत दंड ही शिक्षा आहे. शिक्षेच्या भीतीमुळे प्रतिवादी हिंसा थांबवण्याची शक्यता वाढते.
५. संरक्षण आदेशाचा भंग केल्यास 31 वे कलम लागू करणे सोपे आहे, कारण पीडितेचे म्हणणे साक्षपुरावा म्हणून पुरेसा आहे.

## ५.४.२ निवासाचे आदेश - कलम 19

सदर कायद्याच्या कलम 17 अन्वये कौटुंबिक नातेसंबंधातील प्रत्येक महिलेस त्या घरावर तिचा हक्क, तिचे नाव,किंवा मिळणारा लाभ असेल किंवा नसेल तरीही सामाईक घरात राहण्याचा हक्क आहे.

अशा एकत्रित घरात तिला प्रवेशास मनाई केली तर तो आर्थिक छळ होतो आणि ती कौटुंबिक हिंसा होते. संदर्भ कलम 3(4)(c)

स्वतःचे किंवा भाड्याचे कुठलेही घर नेहमी घरातील मुख्य व्यक्तीच्या अनेकदा पुरुषाच्या नावे असते असे हे कलम मानते. मालमत्ता कायद्यानुसार ज्या कुटुंब सदस्याचा हिस्सा त्यात नाही अशा सदस्यास घरात प्रवेश द्यायचा की नाही ते त्याच्या हातात असते. अशा परिस्थितीत, स्त्रिया सर्वात जास्त असहाय असतात आणि याबाबत कायदा संवेदनशील आहे.

प्रतिवादीशी असलेल्या नातेसंबंधांमुळे सदर कायद्याच्या कलम 17 अन्वये पीडितेस सामाईक घरावर कायदेशीर हक्क सांगता येतो. जरी तिच्या किंवा तिच्या नवऱ्याच्या नावे ते घर नसले तरी तिला त्या घरात राहण्याचा हक्क असतो. तिला त्या सामाईक घरातून काढता येत नाही किंवा घराच्या कुठल्याही भागातून वगळता येत नाही.

त्यात पुढे अशीही तरतूद आहे की कौटुंबिक नातेसंबंधातील कुठल्याही स्त्रीस सामाईक घरातून काढता येत नाही, याचा अन्वयार्थ असा की जरी ती स्त्री जाब देणारी असली तरी तिला काढता येत नाही. ही तरतूद महत्त्वाची आहे कारण पितृसत्ताक समाजरचनेत ती स्त्रीची असहायता लक्षात घेते आणि त्यामुळे प्रत्येक स्त्रीला सामाईक घरात राहण्याचा अधिकार आहे यास पुष्टी मिळते.

हा हक्क निवासी हक्कासह अर्थपूर्ण रीतीने बजावला जावा यासाठी पीडिता संरक्षण आदेशाची मागणी करू शकते आणि त्याचा भंग केल्यास तो सदर कायद्याच्या कलम 31 अन्वये दंडनीय अपराध समजला जातो.

| **कौटुंबिक हिंसेस प्रतिबंध किंवा त्यापासून संरक्षण मिळावे या हेतूने काही निवासी आदेश काढले जातात त्यात खालील बाबींचा समावेश होतो.** |
|---|

१. **बंदी घालणारे आदेश** प्रतिवादीस किंवा त्याच्या नातेवाईकांस खालीलपैकी एका किंवा अनेक गोष्टींपासून थोपवणे किंवा बंदी घालणे

- जाब देणारा कायदेशीर रित्या घराचा मालक / भाडेकरू किंवा अन्य काही असला नसला तरी पीडितेचे सामाईक घरातून सामान बाहेर काढणे किंवा तिला हाकलून देणे. (19)(1)(a)
- पीडिता राहत असलेल्या सामाईक घराच्या कुठल्याही भागात प्रवेश करणे (19)(1)(c)
- सामाईक घरातून वेगळं काढणे, किंवा ते विकून टाकणे किंवा ते गहाण टाकणे (19)(1)(d)
- त्याने सामाईक घरावरील अधिकार सोडून देणे (19)(1)(e)

२. प्रतिवादीने सामाईक घरातून बाहेर पडण्याचा आदेश (19)(1)(b). समाजातील स्त्रियांच्या बाजूने कायदा संवेदनशील असल्यामुळे जरी ती स्त्री जाब देणारी असली तरी तिला सामाईक घरातून कलम (19)(1) अन्वये काढता येत नाही.

३. अन्य आदेश

- कौटुंबिक हिंसेस प्रतिबंध व्हावा यासाठी न्यायदंडाधिकारी प्रतिवादीकडून तारणासहीत किंवा तारणाशिवाय हमीपत्र लिहून घेऊ शकतील.
- संरक्षण मिळण्यासाठी पोलिसांना आदेश देणे किंवा पीडितेच्या वतीने तिला किंवा व्यक्तीला निवासी आदेशाची अंमलबजावणी करण्यास साहाय्य करणे.

  सूचनाः पीडितेने तिच्या अर्जात पोलिसांना अशा दिल्या जाणाऱ्या निर्देशांची गरज असल्याचे नमूद करावे तसेच त्यात घरास कुलुप असल्यास ते तोडून घरामध्ये प्रवेश करण्यासाठी साहाय्य करण्यास सांगावे.
- संरक्षण आदेशाची अंमलबजावणी करण्यास पोलिसांना आदेश द्यावे.
- पीडितेला किंवा तिच्या मुलांना त्यांचा निवासावर हक्क दाखवताना त्यांना संरक्षण देण्याची अतिरिक्त जबाबदारी पोलिसांवर टाकणारे अन्य आदेश द्यावे.

**सामाईक घरात राहण्याचा हक्क पीडितेस मिळावा यासाठी पर्यायी आदेशात खालील बाबींचा समावेश होतो**

- प्रतिवादीस पीडितेसाठी राहण्याची सामाईक घरासारखीच पर्यायी व्यवस्था करण्याचा आणि गरज पडल्यास त्याचे भाडे भरण्याचा आदेश (19)(1)(f)
- आर्थिक गरजा आणि साधनांची परिपूर्ती करण्यासाठी प्रतिवादीवर भाडे भरण्याचा किंवा अन्य पैसे देण्याचा आदेश.

## ५.४.३ आर्थिक आदेश - कलम 20

कौटुंबिक हिंसेचे पीडितेवर परिणाम होतात, तिच्या कुटुंबावर अल्पकालीन तर समाज, राज्य आणि राष्ट्रावर दीर्घकालीन परिणाम होतात.

**नोंद घेण्यासारखे महत्त्वाचे मुद्दे**

- कौटुंबिक हिंसेमुळे होणाऱ्या आर्थिक नुकसानीविषयी सदर कायदा संवेदनशील आहे.
- कौटुंबिक हिंसेच्या व्याख्येनुसार (कलम 3), आर्थिक नुकसान किंवा वंचितता ही आर्थिक छळाच्या प्रकारातील हिंसा मानली जाते.
- पीडितेस आणि तिच्या मुलांना आर्थिक छळापासून (कौटुंबिक हिंसेचा प्रकार) संरक्षण देण्यासाठी आर्थिक साहाय्याचे आदेश दिले जातात.

प्रतिवादीने खालील बाबींसाठी आर्थिक निर्देश देण्याचा अधिकार सदर कायद्यानुसार न्यायदंडाधिकाऱ्यांस आहे -

- पीडितेवर वैद्यकीय उपचारासाठी
- पीडिता नोकरीवर जाण्यास असमर्थ असल्यामुळे रोजगार गेला म्हणून
- मालमत्तेचे नुकसान आणि हानी/ तोटा भरून काढण्यासाठी
- पीडितेकडून कोणतीही मालमत्ता काढून घेतल्यामुळे आर्थिक नुकसान झाले म्हणून
- सुरक्षेचे उपाय योजण्यामुळे आलेला खर्च –उदाः सुरक्षित जागी प्रवास करून जाणे, हॉटेलात राहणे, आणि फोन करणे यावरील खर्च झाले असतील तर
- पोटगी, जरी वैयक्तिक कायद्यासह अन्य कुठल्याही कायद्याखाली, किंवा फौजदारी दंड संहितेच्या कलम १२५ खाली पीडितेस आणि तिच्या मुलांस पोटगी मिळत असली किंवा तसा आदेश मिळाला असला, तरी देखील
- कौटुंबिक हिंसेमुळे पीडितेस आणि तिच्या मुलांना आलेला अन्य कुठलाही खर्च किंवा नुकसान झाले असल्यास.

**अर्ज तयार करण्याच्या टप्प्यावर हे लक्षात ठेवून संरक्षण अधिकारी महिलेला वरीलपैकी कोणत्याही आर्थिक आदेशाची मागणी करण्यास सुचवू शकतात.**

**कलम 20 पीडितेच्या आणि तिच्या मुलांच्या राहणीमानाचे महत्त्व मानते**; आणि त्यानुसार न्यायदंडाधिकाऱ्यांस खालील बाबी ठरवण्याचा अधिकार असतो-

- राहणीमानाच्या दर्जावर आधारित **साहाय्याच्या रकमेचे प्रमाण**
- **पोटगी कशी दिली जावी** - एकरकमी की दरमहा
- विशिष्ट **कालावधी** ज्यात आर्थिक साहाय्य दिले जावे

त्याप्रमाणे न्यायदंडाधिकारी आर्थिक साहाय्याचा आदेश देऊ शकतात ज्यात ते विशेषत्वाने रकमेचे प्रमाण, पैसे देण्याची पध्दत, कालावधी, आणि अन्य तपशील नमूद करू शकतात.

जर प्रतिवादीने आर्थिक आदेशाची परिपूर्तता केली नाही तर न्यायदंडाधिकारी त्याच्या मालकास, कर्जदारास प्रतिवादीच्या पगारातून / रोजगारातून किंवा त्याच्या खात्यातून पैसे थेट पीडितेस देण्याचा निर्देश देऊ शकतात.

### ५.४.४ ताबा आदेश- कलम 21

सदर कायद्याच्या कलम 2(b) अन्वये बालक म्हणजे अशी कोणतीही व्यक्ती जी अठरापेक्षा कमी वयाची आहे, या व्याख्येत पीडितेच्या दत्तक, सावत्र, किंवा मानलेल्या मुलांचा समावेश होतो.

आपल्या पितृसत्ताक समाजातील स्त्रियांचे असलेले स्थान विचारात घेता सदर कायद्याच्या कलम 21 अन्वये खालील कारणांकरता ताबा आदेश देतो -

१. मुलांचे कौटुंबिक हिंसेपासून संरक्षण करणे
२. पीडितेने कुटुंबाच्या हिंसक नातेसंबंधात राहून छळ सहन करावा यासाठी मुलांना एखाद्या साधनासारखे वापरले जाऊ नये याची खात्री करता येणे.

पीडितेस मुलांचा तात्पुरता ताबा कलम 21 अन्वये ताबा आदेशाव्दारे दिला जातो. कायमस्वरूपी ताबा (वादाच्या प्रसंगी) मिळवण्याकरता पीडिता किंवा प्रतिवादीस त्यांना लागू असलेल्या "*गार्डियनशिप अँड वॉर्ड अॅक्ट*" किंवा वैयक्तिक कायद्याची मदत घ्यावी लागते.

न्यायदंडाधिकाऱ्यांना भेटण्याची परवानगी देण्याचा, तसेच प्रतिवादीने मुलांना कसे, कुठे आणि कधी भेटावे ह्याची विशेष व्यवस्था करण्याचा अधिकार आहे. तथापि, न्यायदंडाधिकाऱ्यांना असे वाटले की असे भेटणे अपायकारक आहे तर मुलांच्या सर्वोत्तम हिताचा विचार करून ते अशा भेटींची परवानगी नाकारू शकतात.

तात्पुरत्या ताब्याची केस ठरवताना कोर्ट मुलांच्या / मुलाच्या सर्वोत्तम हिताचे काय आहे त्याचा विचार करते. 'सर्वोत्तम हिताचे' निकष विचारात घेताना मुलांच्या मनो-शारीरिक निरोगी वाढीसाठी आणि निगेसाठी जे घटक आवश्यक आहेत त्यांचा अधिक विचार केला जातो, मात्र आर्थिक आणि भौतिक बाबींचा विचार फारसा केला जात नाही.

*लॉयर्स कलेक्टिव* (नवी दिल्ली) संस्थेने संरक्षण अधिकाऱ्यांसाठी तयार करून प्रकाशित केलेल्या मार्गदीपिकेतील मुलाच्या 'सर्वोत्तम हिताचे' मूल्यमापन करणाऱ्या प्रश्नांची सूची खाली दिली आहेः

- मुलाच्या कल्याणाची अधिक चांगली काळजी आणि विचार कोण करेल?
- मूल अधिक आनंदात कुठे असणे शक्य आहे?
- मुलाच्या मानसिक आणि शारीरिक विकासाची आणि सुखाची काळजी अधिक चांगली कोण घेऊ शकतो?

- अधिक चांगले शिक्षण देण्याची आणि अहोरात्र मुलाची जोपासना करण्याची इच्छा, निश्चय, कल्पना आणि क्षमता कोणात असते?
- जेव्हा मुलास प्रेम, माया, काळजी, समुपदेशन, आणि संरक्षण हवे असते तेव्हा त्याला कोण उपलब्ध असावे?

### ५.४.५ भरपाईचा आदेश - कलम 22

पीडितेस शारीरिक इजा, मानसिक छळ, आणि अन्य भावनिक त्रासांमुळे जी वेदना सहन करावी लागते त्याची भरपाई करून घेण्याच्या पीडितेच्या हक्काची दखल *सदर कायद्या*मार्फत घेतली जाते.

कलम 22 अन्वये अशी दखल घेतली जाते की कौटुंबिक हिंसेमुळे पीडितेचे जे नुकसान होते ते प्रत्यक्ष आर्थिक नुकसानीपेक्षा कित्येक पटीने अधिक असते. म्हणून या कलमाखालील भरपाईचे आदेश हे कलम 20 मधील आर्थिक आदेशाहून वेगळे आहेत.

दुसऱ्या शब्दात सांगायचे झाले तर आर्थिक आदेश जरी मागितला/ दिला असेल तरी देखील भरपाईचा आदेश मागता/ देता येतो.

पीडितेने केलेल्या अन्य कोणत्याही दिवाणी कायद्याखाली केलेल्या दाव्याव्यतिरिक्त ह्या दाव्यासाठी तिला अर्ज करता येतो.

जर तिला अन्य दिवाणी कायद्यात भरपाई मिळाली असेल तर फॉर्म २ च्या अनुक्रमांक ३(४) मध्ये तशी माहिती दिली आहे ना, याची खात्री संरक्षण अधिकाऱ्यांनी करून घेतली पाहिजे.

किती प्रमाणात इजा झाली आहे किंवा परिस्थितीचे मूल्यमापन कोर्टाकडून झाल्यावरच भरपाईची रक्कम ठरवली जाते.

### ५.४.६ अंतरिम आणि एकतर्फी आदेश - कलम 23

कौटुंबिक हिंसेचा धोका असलेल्या महिलेच्या **तातडीच्या** गरजांचा विचार करता हे दोन आदेश अतिशय महत्त्वाचे आहेत.

दुसऱ्या शब्दात, अशा आदेशांच्या तरतुदीमुळे कौटुंबिक हिंसा त्वरित बंद होते आणि तो एक तात्काळ प्रतिबंधाचा उपाय ठरतो.

या तरतुदीमुळे पीडितेस कारवाईत कमी धोका असतो किंवा अजिबात धोका नसतो. या तरतुदीविषयी या प्रक्रियेच्या खालील सातव्या पायरीत अधिक स्पष्टीकरण दिले आहे.

## अंतरिम आदेश म्हणजे काय?

'अंतरिम आदेश' म्हणजे न्यायलयीन कारवाई चालू असतानाच्या काळात अंतिम आदेश देण्याआधीचा दिलेला आदेश. ('अंतिम आदेश' हा न्यायालयीन कारवाईचा निकाल असतो) या दिवाणी स्वरूपाच्या कायद्याखाली पीडितेस आणि तिच्या मुलांना न्यायालयीन कारवाईच्या काळात कौटुंबिक हिंसेपासून अपाय होऊ नये म्हणून त्याचा प्रतिबंध करण्यासाठी अंतरिम आदेशाची तरतूद असते.

## अंतरिम आदेशाची विनंती कधी करता येते?

जर पीडितेच्या परिस्थितीनुसार तिला हिंसेपासून मुक्ती हवी असेल किंवा हिंसेच्या पुनरावृत्तीस आळा घालायचा असेल तर सदर कायद्याच्या कलम 23 अन्वये संरक्षण, आणि /किंवा निवास, आर्थिक साहाय्यासाठी तसेच ताबा मिळण्यासाठी अंतरिम आदेशाची मागणी करता येते.

## अंतरिम आदेश कसा मिळवला जातो?

कलम 12 खाली लिहिलेल्या अर्जात हिंसेस बळी पडलेल्या पीडितेस असलेल्या धोक्याचा किंवा धमकीचा उल्लेख स्पष्टपणे केल्यास अंतरिम आदेशाची मागणी करता येते. स्वतंत्र अर्जाची आवश्यकता नाही.[2]

शपथपत्राच्या किंवा तोंडी विवादाच्या आधारावरसुध्दा अंतरिम आदेश न्यायदंडाधिकाऱ्यांना देता येतो. त्याचप्रमाणे फॉर्म ३ (परिशिष्ट ३ पाहा) प्रमाणे माहिती भरून अंतरिम आदेश मिळवण्याकरता त्याचा उपयोग करता येतो. फॉर्म ३ कसा भरला जावा हे या मार्गदीपिकेत पुढे स्पष्ट केले आहे.

## न्यायदंडाधिकारी अंतरिम आदेश कधी देऊ शकतात?

न्यायालयीन कारवाई चालू असताना कोणत्याही वेळी अंतरिम आदेश देता येतो.

जर न्यायदंडाधिकाऱ्यांना तात्काळ साहाय्याची गरज आहे असे लक्षात आले आणि पीडितेने जरी तशी विनंती केलेली नसली तरी ते अंतरिम आदेश देऊ शकतात.

(फॉर्म ३ मधील) कलम 12 खाली केलेल्या अर्जासोबत असलेल्या शपथपत्राच्या आधारे, अंतरिम आदेश दिला जाऊ शकतो, इतकेच नव्हे तर प्रतिवादीवर नोटीस बजावण्याच्या

[2] Vishal Damodar Patil vs. Vishakha Vishal Patil 2009 CrLJ 107 - मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार

आधी किंवा प्रतिवादी कोर्टात येण्याच्याही आधी तो दिला जाऊ शकतो. यास 'एकतर्फी अंतरिम आदेश' असे म्हणतात.

### एकतर्फी आदेश म्हणजे काय?

एकतर्फी आदेश म्हणजे जो प्रतिवादीस आगाऊ नोटीस न देता किंवा त्याच्या अनुपस्थितीत दिला जातो त्याला एकतर्फी आदेश म्हणतात. पीडितेच्या अर्जावरून सकृद्दर्शनी असे दिसून आले की प्रतिवादी कौटुंबिक हिंसा करत आहे किंवा तसे करण्याची शक्यता आहे तर एकतर्फी आदेश दिला जातो.

प्रतिवादी नोटीस बजावूनही कोर्टात हजर होऊ शकला नाही किंवा त्याने त्यास नकार दिला तरी हे आदेश देता येतात.

एकतर्फी आदेश हे अंतरिम अथवा अंतिम स्वरूपाचे असतात.

### एकतर्फी आदेश कसे मिळवले जातात?

एकतर्फी आदेशासाठी (अंतरिम किंवा अंतिम) अर्ज करताना शपथपत्राचा वापर करावा. हे शपथपत्र *पीडब्ल्यूडीव्हीआर* नियम 6(4) मध्ये विहित केल्याप्रमाणे असावे, त्यावर ज्यांनी सदर कायद्याच्या कलम 12 अन्वये जबानीदार[3] म्हणून अर्ज केला आहे अशांनी म्हणजे पीडितेने किंवा तिच्या वतीने अन्य व्यक्तीने स्वाक्षरी करावी.

नोंदः कलम 28(2) न्यायदंडाधिकाऱ्यांना स्वतःची पध्दत ठरविण्याचा अधिकार देते. या अधिकाराचा वापर करून कोर्ट एकतर्फी आदेश देऊ शकतात आणि संरक्षण अधिकाऱ्यांनी तो अंमलात कसा आणावा याविषयी निर्देश देऊ शकतात.

## ५.५ डीआयआर फॉर्म १ भरल्यानंतर काय करावे?

- **डीआयआर परत एकदा वाचावा** आणि त्यातील मजकुराशी पीडिता सहमत आहे तसेच तिला तो कळला आहे ना याची खात्री करून घ्यावी.
- पीडितेने किंवा तक्रारदाराने **डीआयआरवर स्वाक्षरी केली** आहे आणि सेवादायी संस्थेने सुध्दा प्रतिस्वाक्षरी केली आहे याची खात्री करून घ्यावी.
- **डीआयआरच्या प्रती** न्यायदंडाधिकाऱ्यांना, आणि संरक्षण अधिकाऱ्यांना तपशिलासह **सादर केल्या जातील** याची पीडितेस / तक्रारदारास **माहिती द्यावी.**

---

[3] शारीरिक अथवा मानसिक धक्क्यामुळे जर पीडिता स्वाक्षरी करण्याच्या अवस्थेत नसेल तर तिच्या वतीने अन्य कोणी किंवा ती स्वतःच 'जबानीदार' असते. शपथपत्रातील मजकूर जबानीदाराच्या ज्ञानाप्रमाणे आणि माहितीप्रमाणे सत्य आहे असे खरेपणाचे प्रमाणपत्रसुध्दा द्यावे लागते.

- **पीडितेस डीआयआरची प्रत निःशुल्क द्यावी** आणि तिला असा सल्ला द्यावा की जेव्हा आणि जर तिला पोलिसांकडे आणि संरक्षण अधिकाऱ्यांकडे जाण्याची गरज भासेल/भासली तेव्हा तिने ती प्रत त्यांना दाखवावी.
- कौटुंबिक हिंसेची घटना जिथे घडली आहे असा आरोप आहे त्या न्यायकक्षेच्या अखत्यारीत असलेल्या न्यायदंडाधिकाऱ्यांना (कोर्टातील नाझरांच्या मार्फत), आणि संरक्षण अधिकाऱ्यांना **डीआयआरच्या प्रती दिल्या** जाव्यात.
- जरी पीडितेने सदर कायद्याच्या कलम 12 अन्वये अर्ज केला नसला किंवा तिला करायचा नसला तरी जिथे हिंसा घडली त्या न्यायकक्षेच्या अखत्यारीत येणाऱ्या न्यायदंडाधिकाऱ्यांकडे आणि संरक्षण अधिकाऱ्यांकडे डीआयआरची प्रत देणे आवश्यक आहे.
- पीडितेकडून तसेच वरील **अधिकाऱ्यांकडून पोचपावती** घेऊन ती रेकॉर्ड म्हणून ठेवावी.
- प्रत्येक पीडितेच्या **स्वतंत्र फायलीत** संबंधित कागदपत्रांच्या प्रतींसह डीआयआरची प्रत जपून ठेवावी.
- त्या महिलेस कोणत्याही वेळेस मदत केली जाईल अशी **खात्री द्यावी**.

**कृपया नोंद घ्यावी : कौटुंबिक हिंसेच्या न्यायालयीन कारवाईचा निर्णय देताना न्यायदंडाधिकारी डीआयआरमधील माहिती विचारात घेतात. (कलम 12- प्रोविजो (अनिवार्य अट)**

**? न्यायदंडाधिकाऱ्यांना आणि संरक्षण अधिकाऱ्यांना डीआयआरच्या प्रती सादर करण्यामागे काय हेतू असतो?**

न्यायदंडाधिकाऱ्यांना आणि संरक्षण अधिकाऱ्यांना डीआयआरच्या प्रती प्रामुख्याने रेकॉर्ड ठेवण्यासाठी सादर करणे आवश्यक असते. त्यातील कौटुंबिक हिंसेचा इतिहास माहीत झाल्यामुळे पीडिता नंतर जेव्हा त्यांच्याकडे **तात्काळ मदतीसाठी, तक्रार करण्यासाठी, एफआयआर दाखल करण्यासाठी**, आधार मागण्यासाठी, कायद्याची मदत मागण्यासाठी, समुपदेशन आणि अन्य कारवाई करण्यासाठी जाते तेव्हा त्यांना तिला योग्य प्रकारे मदत करणे शक्य होते. म्हणून डीआयआरमध्ये रेकॉर्ड ठेवण्याची जी पध्दत आहे ती अनुसरणे महत्त्वाचे आहे कारण त्यामुळे ते रेकॉर्ड सहज उपलब्ध होते.

## ५.६ सुरक्षा नियोजन तयार करणे

सेवादायी संस्थांनी असे सुरक्षा नियोजन तयार करावे की ज्यायोगे कौटुंबिक हिंसा पीडिता सुरक्षित राहील आणि हिंसा होणार नाही किंवा तिची पुनरावृत्ती होणार नाही. सेवादायी संस्था सुरक्षा नियोजन तयार करण्यासाठी त्यांची स्वतःची पध्दत वापरू शकतात. तसेच सदर कायद्याचे फॉर्म ५ (परिशिष्ट ४ पाहा) - सुरक्षा नियोजन - धोक्याचा अंदाज घेण्याचे साधन म्हणून वापरू शकतात. विशेषतः तिने सदर कायद्याखाली तक्रार केली असल्यास तिला धोका संभवतो आणि त्यानुसार ते सुरक्षेचे उपाय योजू शकतात.

### ५.६.१ सुरक्षा नियोजन म्हणजे काय?

कौटुंबिक हिंसेतून वाचलेल्या महिलांबरोबर काम करणाऱ्या संघटना आणि समुपदेशक यांची सुरक्षेसाठी नियोजन आखणे ही नेहमीची पध्दत आहे.
त्याचे दोन घटक असतात-

१. त्या महिलेच्या परिस्थितीत भयाचा भाग किती आहे याचा अंदाज घेण्याचे काम धोक्याचे मूल्यमापन करणारा घटक करतो.
२. सुरक्षेसाठी काही ठोस आणि व्यवहार्य उपाय महिलेबरोबर ठरवावे लागतात म्हणजे त्या उपायांचा ती महिला उपयोग करू शकते. संरक्षण आदेश मिळवणे हा एक सुरक्षेसाठी कायदेशीर उपाय आहे.

**कृपया नोंद घ्यावी: फॉर्म ५ मधील सुरक्षा नियोजनात काही विशिष्ट कायदेशीर उपाय आहेत उदाः सुरक्षेसाठी न्यायदंडाधिकाऱ्यांकडून संरक्षण आदेश तसेच अन्य आदेश मिळवणे. आवश्यकता असल्यास फॉर्म १ भरून तो न्यायदंडाधिकाऱ्यांकडे आदेश मिळवण्यासाठी सादर करता येतो.**

सुरक्षा नियोजन हे महत्त्वाचे असते कारण त्यामुळे नियंत्रणाची भावना आणि स्व-संरक्षणाची प्रेरणा निर्माण होण्यास साहाय्य होते. “माझी सुरक्षा ही माझी स्वतःचीदेखील जबाबदारी आहे” या विश्वासावर ती आधारलेली असते

तांत्रिक दृष्ट्या सदर कायद्याखाली ‘सुरक्षा योजना’ फॉर्म ५ मध्ये पीडितेच्या सल्ल्यानेच तयार केली जाते. ती खालील गोष्टी ओळखून त्यांची नोंद करण्याकरता वापरली जावी -

१. हिंसेची घटना घडताना पीडित महिला स्वतःचे संरक्षण कोणत्या मार्गांनी करू शकते किंवा ती हिंसक घटना घडण्याची शक्यता असल्यास त्यापासून होणाऱ्या अपायाचा धोका कसा कमी करू शकते.

**आणि**

२. तिला हिंसेपासून संरक्षण मिळण्याकरिता तिने कोर्टाच्या कोणत्या आदेशाची विनंती करावी.

खालील आकृतीत दर्शवल्याप्रमाणे फॉर्म पाचच्या अ ते इ या पाच रकान्यातील तपशील भरला जावा.

| अ | ब | क | ड | इ |
|---|---|---|---|---|
| प्रतिवादीकडून **होणारी हिंसा** (**अनेक प्रकार**) | 'अ' रकान्यात उल्लेखिलेल्या हिंसेचे पीडित **महिलेवर झालेले/ होणारे परिणाम** | 'अ' रकान्यात उल्लेखिलेल्या हिंसेविषयी **पीडितेस वाटणारी चिंता किंवा भीती** | **सुरक्षेसाठी उपाय** (ती महिला सुरक्षेसाठी कोणते उपाय करू शकते) | **कोर्टाकडून कोणते आदेश मिळावेत** |

## ५.६.२ फॉर्म ५ नुसार सुरक्षा नियोजन कसे करावे?

- 'अ', 'ब' आणि 'क' रकान्यातील माहिती **धोक्याचे मूल्यमापन** करायला उपयोगी पडते.

  - **धोक्याचे मूल्यमापन कसे करावे**

  धोक्याची नोंद घेण्यासाठी 'क' हा रकाना आहे.

  <u>हिंसेचा धोका दर्शवणारे काही निदर्शक खालीलप्रमाणेः</u>

    - हिंसेची वारंवारिता
    - गेल्या काही वर्षात हिंसेत झालेली वाढ आणि तिची तीव्रता
    - काळाबरोबर फक्त पीडितेवरच नव्हे तर तिच्या मुलांवर आणि तिला पाठिंबा देणाऱ्यांवरही हिंसा
    - वस्तू किंवा शस्त्रांचा वापर
    - पीडितेचा आत्महत्येचा प्रयत्न; तिला आलेले नैराश्य, निराश, अतिशय रागात आणि स्वतःला किंवा दुसऱ्यांना अपाय / इजा करण्याची भाषा
    - प्रतिवादीची आत्महत्येची धमकी किंवा तसे प्रयत्न
    - पूर्वी खून करण्याची धमकी किंवा तसे प्रयत्न

- वेळी- अवेळी घरात कोंडून ठेवल्याचा किंवा घरातून हाकलून दिल्याचा पूर्वानुभव
- हिंसेची वेळ आणि स्थळ - हिंसा रात्रीच्या वेळी घडली का किंवा आजूबाजूस कोणी नसताना दारू प्यायल्यावर किंवा दारू न पिताही घडली का
- प्रतिवादीची वस्तूंची फेकाफेक करण्याची तसेच दंगा करण्याची आणि प्राण्यांना इजा करण्याची सवय

➢ 'ड' रकान्यात महिलेने स्वतःच्या सुरक्षेसाठी **कोणते उपाय योजावेत** हे लिहिले जाते.

- **सुरक्षा उपाय कसे ठरवावेत**

पीडिता जरी प्रतिवादीबरोबर राहत असली किंवा नसली तरी कोणत्या ठिकाणी असताना हिंसेची शक्यता कधीही असू शकते, त्या ठिकाणी ती सुरक्षेसाठी कोणते उपाय करू शकते हे ती संरक्षण अधिकाऱ्यांबरोबर चर्चा करून ठरवू शकते. ड रकाना तिला यासाठी साहाय्य करू शकतो.

<u>पीडितेबरोबर जे काही उपाय योजता येतील त्यांची उदाहरणे खाली दिली आहेतः</u>

- तुमच्या अंतर्मनावर विश्वास ठेवा आणि हिंसेची जरा जरी शक्यता वाटली तरी सावध राहा.
- महत्त्वाचे कागदपत्र सुरक्षित जागी ठेवा
- अशा अणीबाणीच्या काळात ती ज्यांच्याकडे साहाय्यासाठी जाऊ शकते त्यांचे फोन नंबर हाताशी ठेवा किंवा लक्षात ठेवा अगदी जवळच्या पोलिस चौकीचे सुध्दा.
- उपलब्ध असल्यास मोबाईल फोन हाताशी ठेवा.
- प्रवास किंवा जेवणखाणासाठी काही पैसेसुध्दा हाताशी ठेवा.
- आधार देणाऱ्या मैत्रिणी, शेजारी, कुटुंबीय सर्वांना हिंसेसंबंधी सांगा आणि त्यांचे साहाय्य घ्या उदाः छळ करणाऱ्याने जर हिंसेची धमकी दिली तर साहाय्यासाठी जोरात आरडाओरडा करा.
- अपेक्षित हिंसक प्रसंग आल्यास तात्पुरते का होईना तेथून निघून जाण्यासाठी एखादी सुरक्षित जागा निवडून ठेवा.
- अपाय किंवा इजा करू शकणाऱ्या वस्तू किंवा शस्त्रे उदाः सुरे, कोयता, केरोसीन (रॉकेल) यासारख्या वस्तू सहज हाताशी येणार नाहीत अशा जागी ठेवा.

- सुरक्षेसाठी पीडितेस हिंसा होत असलेले स्थळ सोडून जाण्याची गरज भासली तर तिने मुलांना कसे न्यायचे, तिचे कागदपत्र, कपडे आणि कधी जायचे ती वेळ असे सर्व नियोजन करून काय करायचे ते ठरवावे.

➢ 'इ'' रकान्यानुसार पीडितेस आणि संरक्षण अधिकाऱ्यांना विचार करण्यास तसेच तिच्या सुरक्षेसाठी न्यायालयाकडे कोणत्या आदेशाची विनंती करावी ते ठरविता येते.

**? फॉर्म ५ प्रमाणे तयार केलेले सुरक्षा नियोजन न्यायदंडाधिकाऱ्यांकडे सादर करण्याची गरज आहे का?**

- सुरक्षा योजना न्यायदंडाधिकाऱ्यांना सादर करणे बंधनकारक नाही. सुरक्षा नियोजन एकदा न्यायालयात सादर केले की केस फाईल केल्यावर ती प्रतिवाद्यासही पाहता येते. स्वतःच्या सुरक्षेसाठी ती घेणार असलेले खबरदारीचे उपाय त्यालाही कळतात (फॉर्म ५ रकाना 'ड' मधे लिहिलेले) *उदाः मोबाईल हाताशी ठेवणे, शेजाऱ्यांची मदत घेणे, शस्त्रांसारख्या वस्तु लपवून ठेवणे इ.* या गोष्टी त्याला कळल्यास तो या माहितीचा दुरुपयोग करेल आणि तिची योजना उधळून लावू शकेल. जर सुरक्षा नियोजन न्यायदंडाधिकाऱ्यांकडे सादर करायचेच असेल तर ही माहिती त्यात लिहू नये.

- हिंसेची तीव्रता आणि कौटुंबिक हिंसेस आळा घालण्यासाठी विशिष्ट आदेशांची गरज आणि निकड आहे हे न्यायदंडाधिकाऱ्यांस पटवून देण्यासाठी फॉर्म ५ मधील सुरक्षा नियोजनाचा उपयोग होऊ शकतो. त्याच्या उपयोगाची काही उदाहरणे खाली दिलेली आहेत.

## ५.६.३ सुरक्षा नियोजनाबद्दल लक्षात ठेवण्याचे काही महत्त्वाचे मुद्दे

- सदर कायद्याखाली आदेश मिळवण्याकरता सुरक्षा नियोजन ही पूर्वअट नाही.
- सुरक्षा नियोजन न्यायदंडाधिकाऱ्यांना सादर करणे अनिवार्य नाही, ते प्रामुख्याने पीडिता आणि संरक्षण अधिकारी यांच्या उपयोगासाठी आहे.
- तथापि, न्यायदंडाधिकाऱ्यांवर काही ठरावीक पध्दतीच्या आदेशांची गरज आणि निकड ठसवली जावी यासाठी संरक्षण अधिकारी फॉर्म पाचमध्ये सुरक्षा नियोजन सादर करू शकतात.
- कारवाईपूर्व अथवा कारवाई चालू असताना किंवा आदेश दिले गेल्यानंतरसुध्दा कोणत्याही वेळी सुरक्षा नियोजन तयार करता येते.

## ५.६.४ सर्वोत्तम पध्दत – सदर कायद्याखाली सुरक्षा नियोजन कसे अमलात आणता येते.

न्यायदंडाधिकाऱ्यांकडून योग्य आदेश लवकर मिळवता यावेत यासाठी सुरक्षा नियोजन कसे अमलात आणावे याची दोन उदाहरणे खाली दिली आहेत.

१. कायदेशीर कारवाईच्या कालावधीत संरक्षण अधिकाऱ्यांनी सुरक्षा नियोजनाच्या फॉर्म ४ चा उपयोग कसा केला याचे उदाहरण खाली दिले आहे.

ग्रामीण रुग्णालयात रूपाली 'एएनएम' म्हणून आरोग्य खात्यात काम करते, नवऱ्याने तिच्यावर केलेल्या हिंसेच्या घटनेनंतर ती संरक्षण अधिकाऱ्यांकडे गेली व तिने सदर कायद्याखाली संरक्षण आणि उपायांची मागणी केली.

त्यानंतर ती तिच्या पाच वर्षांच्या मुलासह नवऱ्यापासून स्वतंत्र राहू लागली. तिला लग्न मोडायचे नव्हते, तिला फक्त हिंसा थांबवायची होती. तिने डीआयआर आणि कलम 12 खाली अर्ज दाखल केला तसेच सुरक्षेच्या आणि मुलाच्या देखभालीच्या खर्चासाठी अंतरिम आदेशाची विनंती केली. ती स्वतंत्र राहू लागल्यावर तिचा नवरा तिचा पाठलाग करू लागला, आणि तिच्या सहकाऱ्यांना तसेच चहावाल्यालासुध्दा तिचे चारित्र्य चांगले नाही असे सांगू लागला.

*कायदेशीर कारवाईच्या कालावधीत सेवादायी संस्थेने संरक्षण अधिकाऱ्यांची मदत घेऊन होत असलेला पाठलाग सुनावणीच्या वेळी कोर्टाच्या निदर्शनास आणला आणि अंतरिम आदेशाची मागणी केली. तरी देखील अंतरिम आदेश दिला गेला नाही. संरक्षण अधिकाऱ्यांच्या सल्ल्यानुसार रुपालीने फॉर्म ५ भरला व कोर्टात सादर केला.*

**या सुरक्षा नियोजनातून तिला असलेला धोका स्पष्टपणे दिसून आला आणि न्यायदंडाधिकाऱ्यांनी विनाविलंब सुरक्षेसाठी अंतरिम आदेश दिला आणि तिच्या नवऱ्याला पाठलाग करण्याची तसेच तिच्या कामाच्या ठिकाणी जाण्याची मनाई करण्यात आली.**

२. संरक्षणाचा आदेश आणि साहाय्यासाठीचे अन्य आदेश कसे योग्य आहेत हे दर्शवण्यासाठी न्यायदंडाधिकाऱ्यांनी सुरक्षा योजनेचा कसा वापर केला हे खालील उदाहरणांवरून लक्षात येते.

मंगल आणि राजेंद्रचा आंतरजातीय विवाह दोन्ही कुटुंबीयांच्या मनाविरुध्द होता. सात वर्षांच्या कालावधीत राजेंद्र मरण पावला. त्याच्या मागे मंगल आणि तीन लहान मुले होती. मंगलने तिच्या सासू-सासऱ्यांबरोबर एकत्र कुटुंबाच्या सामाईक घरात ज्यात राजेंद्रचासुध्दा कायदेशीर वाटा होता त्यात राहण्याची परवानगी द्यावी असे सांगायचा प्रयत्न केला. परंतु तिच्या सासू-सासऱ्यांनी परत घरात यायचा प्रयत्न केला तर गंभीर परिणामांना तोंड द्यावे लागेल असे धमकावले आणि छळ केला.

सदर कायद्याखाली मंगलने संरक्षण आणि निवासाच्या आदेशासाठी केस दाखल केली. जेव्हा केसची सुनावणी चालू होती तेव्हा न्याय**दंडाधिकाऱ्यांनी मंगल आणि तिच्या मुलांसाठी सुरक्षा योजना बनवण्याचा संरक्षण अधिकाऱ्यांना निर्देश दिला**.

हिंसेचा तपशील, आणि सुरक्षा नियोजनात दर्शवलेल्या भावनिक, आर्थिक हिंसेच्या धोक्याच्या नोंदी आणि सामाईक घराच्या मालकी हक्कांपासून वंचित करणे आणि जीवाला धोका असणे, या आधारावर न्यायदंडाधिकाऱ्यांनी संरक्षण अधिकाऱ्यांना गृहभेट देऊन एकत्रित कुटुंबाच्या राहत्या घरात मंगलला वापरता येईल असा स्वतंत्र भाग देता येतो का ते तपासण्याचा निर्देश दिला.

संरक्षण अधिकाऱ्यांच्या अहवालाच्या साहाय्याने न्यायदंडाधिकाऱ्यांनी पहिल्या मजल्यावरच्या दोन खोल्या मंगल आणि तिच्या मुलांना वापरण्यासाठी देण्यात याव्यात असा 'निवासाचा आदेश' दिला त्याचबरोबर प्रतिवादीपासून कौटुंबिक हिंसेच्या बाबतीत संरक्षण मिळावे असा 'संरक्षण आदेशही' दिला. संरक्षण अधिकाऱ्यांच्या अहवालानुसार आता घराचा ताबा मिळून चार वर्षे झाली, मंगल तिच्या मुलांसह शांततेने राहात आहे.

ही खरी घडलेली उदाहरणे आहेत (फक्त नावे बदलली आहेत) यात वापरलेल्या सुरक्षा नियोजनातून संरक्षण आदेश, साहाय्यासाठीचे विशिष्ट आदेश आणि अन्य संबंधित साहाय्य किती गरजेचे आणि निकडीचे आहे याचे समर्थन होते.

## ५.७ सेवादायी संस्थांनी इतर सहभागी यंत्रणांबरोबर समन्वयाने काम करावे.

सदर कायद्याखाली कौटुंबिक हिंसा पीडितेस उपलब्ध असलेल्या बहुस्तरीय आधारांपैकी सेवादायी संस्था ही सर्वात महत्वाची भूमिका वठवणारी आहे. सर्वांच्या समन्वयित प्रयत्नाने पीडिता कौटुंबिक हिंसा थांबवू शकते आणि स्वतःच्या पायांवर उभे राहू शकते. त्यासाठी सेवादायी संस्था खालील गोष्टी करू शकेलः

१. इतर सहभागी यंत्रणा माहीत असणे आणि त्यांची यादी तयार करणे उदाः ....

   अ. <u>संरक्षण अधिकारी</u> -- कोणत्याही तातडीच्या संरक्षण आणि न्यायालयाशी संबंधित बाबींविषयी न्यायालयीन कारवाई चालू असताना आणि नंतर देखील पीडित महिलेस आधार मिळवण्यासाठी.

   आ. <u>पोलिस अधिकारी, पोलिस स्टेशन्स,</u> आणि पोलिस खात्याच्या अखत्यारीत येणाऱ्या दक्षता समिती इ. सारख्या अन्य सेवा

   इ. <u>वैद्यकीय सुविधा</u> - कौटुंबिक हिंसा पीडितेची वैद्यकीय तपासणी करून तिच्या तपासणीचा वैद्यकीय अहवाल मिळवण्यासाठी (कलम 10(2)(b)).

   ई. <u>आधार गृहे</u> – कौटुंबिक हिंसा पीडितेस आवश्यक तेव्हा आधार घेता येईल याची खात्री करण्यासाठी राज्य शासनाने सूचित केलेली त्याचप्रमाणे सेवादायी संस्था म्हणून नोंद झालेली आधार गृहे कलम (10(2)(c)).

   उ. <u>त्या विभागातील कोणतीही अन्य सेवादायी संस्था</u> – मुलांना आर्थिक साहाय्य तसेच वसतिगृहाची सुविधा पुरवणारे इ.

२. ज्यांची सेवा पीडितेस उपयोगी ठरेल, अशा सेवादायी संस्था म्हणून नोंद झालेल्या अथवा न झालेल्या संघटना / किंवा तज्ज्ञांची, संस्थांची/ व्यक्तींची यादी तयार करणे व पीडितेस त्यांची माहिति देणे / संदर्भ देणे / पाठवणे.

**कृपया नोंद घ्यावीः** सदर कायद्याखाली सेवादायी संस्था म्हणून नोंद केल्यास त्यांना त्यांच्या संस्थेच्या स्वतःच्या अधिकार / उद्दिष्टांप्रमाणे अन्य सेवा द्यायच्या असल्यास ते देऊ शकतात; त्याला कुठल्याही मर्यादा नाहीत.

३. संस्थेच्या स्वतःच्या उद्दिष्टांप्रमाणे कोणतीही अन्य कृती करणे - सेवा समाजापर्यंत पोचणे, जाणीव जागृती करणे, पीडितेस आधार देणारा गट तयार करणे इ. जेणे करून पीडिता सुरक्षित राहून तिचे संरक्षण होईल.

## विशिष्ट सेवादायी संस्थांची कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या.

*सदर कायद्याने* वैद्यकीय सुविधा, आधार गृहे, आणि समुपदेशक यांच्यासाठी काही विशिष्ट कर्तव्ये नेमून दिली आहेत.

अधिसूचित केलेल्या किंवा अर्ज प्रक्रियेतून नोंद झालेल्या वैद्यकीय सुविधेची भूमिका समजून घेण्यासाठी स्वतंत्र मार्गदीपिका तयार करण्यात आली आहे - कृपया अधिक माहितीसाठी तिचा संदर्भ घ्यावा.

## ६.० आधार गृहांची भूमिका

### ६.सदर कायद्याखाली आधार गृहांची नियुक्ती कशी केली जाते?

**अधिसूचनेमार्फत नियुक्ती केली जाते -** शासनाच्या विविध योजनांमार्फत चालवली गेलेली किंवा अनुदानित असलेली महाराष्ट्र शासनाच्या महिला आणि बालविकास खात्याने अधिसूचित केलेली अनेक आधार गृहे आहेत.

**अर्जामार्फत किंवा कलम 10 अन्वये नोंदणीमार्फत नियुक्ती केली जाते** – कौटुंबिक हिंसापीडित महिलांना राहण्यासाठी आधार गृहे अथवा वसतिगृहे चालवणाऱ्या स्वयंसेवी संस्था किंवा संघटना स्वतःची 'सेवादायी संस्था' म्हणून नोंदणी करू शकतात. ('एखादी संस्था स्वतःची सेवादायी संस्था म्हणून नोंदणी कशी करू शकते'- या भागात याची प्रक्रिया स्पष्ट केली आहे.)

ज्या आधार गृहांनी सदर कायद्याखाली सेवादायी संस्था म्हणून नोंद करून घेण्यासाठी अर्ज केला असेल त्यांना राज्य किंवा केंद्र शासनाच्या नियामक मंडळाचा परवाना असावा लागतो आणि काही विशिष्ट अटी पूर्ण कराव्या लागतात- उदाः त्या आधार गृहांचे क्षेत्रफळ, पुरेशी जागा, खोल्यांची संख्या आणि त्यांचे क्षेत्रफळ, रहिवासिनींसाठी कमीतकमी टेलिफोनची सुविधा, नजीक असलेली वैद्यकीय सुविधा आणि डॉक्टरांच्या भेटी. महाराष्ट्र शासनाच्या महिला आणि बाल विकास विभागाकडून याबाबत तपशील मिळवता येतो.

## ६.२ आश्रयाची मागणी कोण करू शकते?

अधिनियमाखाली अधिसूचित केलेल्या आणि नोंदणी केलेल्या आधार गृहात कौटुंबिक हिंसा पीडिता स्वतः आधार मिळण्यासाठी  किंवा संरक्षण अधिकारी किंवा सेवादायी संस्था तिला आधार मिळवून देण्यासाठी विनंती करू शकतात आणि अधिनियमाच्या कलम 6 अन्वये आधार गृहांनी आधार देणे बंधनकारक असते; म्हणजेच ते आधार देण्यास नकार देऊ शकत नाहीत.

**आधार गृहात आधार मिळण्याची कोण विनंती करू शकतो - खालील आकृती पाहा**




कौटुंबिक हिंसेस तोंड देणारी महिला जर थेट आधार गृहात आली, तर तिच्या बाबतीत या मार्गदीपिकेच्या अनुक्रमांक 5 - ‘सर्व प्रकारच्या सेवादायी संस्थांची समान कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या’ - मध्ये दिलेल्या कर्तव्यांचे आधार गृहास पालन करावे लागेल - म्हणजे पीडितेस सदर कायद्याची माहिती देण्यापासून ते थेट आधारासाठी अन्य सहभागींशी संबंध प्रस्थापित करून देण्यापर्यंत किंवा कायदेशीर कारवाई पर्यंत तिला साहाय्य करावे लागेल.

## ६.३ आधार गृहांनी कोणत्या माध्यमातून आणि  कोणत्या प्रकारे केलेली विनंती स्वीकारावी?

कौटुंबिक हिंसा पीडिता सर्वात प्रथम थेट आधार गृहात गेली तर तो तिने पहिला संपर्क साधला असे ठरेल. आधार गृहाच्या सर्वसाधारण पध्दतीप्रमाणे ते तिच्याकडून लेखी स्वरूपात विनंतीचा अर्ज घेतील.

संरक्षण अधिकारी किंवा अन्य कोणत्याही सेवादायी संस्थांकडून पीडितेस आधार गृहात आधार  देण्यासंबंधी लेखी स्वरूपात आधार गृहे अर्ज स्वीकारतील आणि त्यात असा स्पष्ट

उल्लेख केलेला असेल की सदर कायद्याच्या कलम 6 (नियम 16(1)) अन्वये आधार मागितलेला आहे. पीडितेस आधार गृहात आधार मिळवण्यासाठी लेखी स्वरूपात विनंती अर्ज करणे बंधनकारक **नाही.**

जर पीडितेस आधार द्यावा म्हणून सेवादायी संस्थेने विनंती केली तर त्या पत्रासोबत डीआयआरची प्रत असेल किंवा नसेलही.

जर पीडितेस आधार द्यावा म्हणून संरक्षण अधिकाऱ्यांनी विनंती केल्यास त्या पत्रासोबत त्यांनी तयार केलेली डीआयआरची प्रत असलीच पाहिजे. (नियम 16(2)).

तथापि, आधार मागण्यासाठी लेखी विनंती करण्याआधी संरक्षण अधिकाऱ्यांनी जर डीआयआर तयार केला नसला तरी आधार गृहे आधार देणे **नाकारू शकत नाहीत.** कौटुंबिक हिंसेच्या धक्क्यामुळे अणीबाणीच्या प्रसंगी जर ती पीडिता डीआयआर तयार करण्यास आवश्यक अशी माहिती देऊ शकत नसेल तर किंवा वेळेअभावी असे घडू शकते. (नियम 16(2) प्रोव्हिजो (अनिवार्य अट) पाहा).

## ६.४ कौटुंबिक हिंसा पीडितेस आधार गृहात ठेवल्यानंतर काय करावे?

जर संरक्षण अधिकाऱ्यांनी कौटुंबिक हिंसा पीडितेस आधार गृहास विनंती करून आधार उपलब्ध करून दिला तर सदर कायद्याच्या कलम 9(1)(f) अन्वये तिला तेथे ठेवल्याचा अहवाल तयार करणे हे त्यांचे कर्तव्य ठरते, ज्या पोलिस स्टेशनच्या आणि न्यायदंडाधिकाऱ्यांच्या अखत्यारीत पीडितेने सदर कायद्याखाली जिथे अर्ज दाखल केला आहे किंवा करणार असेल तेथे तो अहवाल द्यावा लागतो.

जर तिची इच्छा नसेल तर ती आधार गृहात राहत आहे ही माहिती आधार गृहाने हिंसा करणाऱ्या व्यक्तीस देऊ नये आणि तिची ओळख उघड करू नये. (नियम 16(3)).

# ७.० सदर कायद्याखालील -समुपदेशकाची भूमिका

## ७.१ समुपदेशक कोण असते?

कलम 14 मध्ये समुपदेशकाची व्याख्या दिली आहे. समुपदेशक हे सेवादायी संस्थेचे (सदर कायद्याखाली नोंद झालेल्या) समुपदेशनातील अनुभवी आणि प्रशिक्षित सदस्य असतात आणि त्यांच्याकडे न्यायदंडाधिकारी प्रतिवादीस किंवा पीडितेस अर्ज दाखल केल्यानंतरच्या कोणत्याही टप्प्यावर एकत्र किंवा एकट्याला समुपदेशनासाठी पाठवू शकतात.

**या मार्गदीपिकेपुरते आणि त्यात स्पष्टता येण्यासाठी आपण या समुपदेशकास सदर कायद्याखालील- समुपदेशक असे म्हणूया.**

संरक्षण अधिकाऱ्यांनी दिलेल्या समुपदेशकांच्या सूचीतून न्यायदंडाधिकारी सदर कायद्याखालील- समुपदेशकाची नियुक्ती करू शकतात.

पीडितेने कलम 12 खाली अर्ज दाखल केल्यावरच आणि एखाद्या विशिष्ट अर्जाच्या बाबतीतच समुपदेशन करण्याचा न्यायदंडाधिकाऱ्यांनी निर्देश दिल्यावरच सदर कायद्याखालील-समुपदेशकाची भूमिका सुरू होते.

याचा अर्थ असा आहे की कारवाई पूर्व काळात किंवा कारवाई चालू असतानासुध्दा जर कोणीतीही व्यक्ती स्वतःहून समुपदेशनासाठी आली तर तिला समुपदेशन करता येते.

दुसऱ्या शब्दात सांगायचे तर **समुपदेशनाचे काम करणारी व्यक्ती दुहेरी भूमिका करते - एक सर्वसामान्य समुपदेशकाची आणि दुसरी - सदर कायद्याखालील समुपदेशकाची, परंतु त्याच अर्जासाठी नव्हे.**

सदर कायद्याखालील-समुपदेशकाची सेवा मिळवता यावी यासाठी संबंधित सेवादायी संस्थेने (ज्याची समुपदेशक सदस्य असते) याची खात्री करून घ्यावी की संरक्षण अधिकाऱ्यांकडे समुपदेशकांची सूची आहे आणि ती सूची न्यायदंडाधिकाऱ्यांकडे/ न्यायालयाकडे पाठवली आहे. (नियम 13 प्रमाणे)

## ७.२ अर्जानुसार कायदेशीर कारवाईत 'सदर कायद्याखालील-समुपदेशक' म्हणून कोणाची नेमणूक करता येते?[4]

१. समुपदेशकाच्या सूचीतील व्यक्ती (जे सेवादायी संस्थांपैकी सदस्य असतात) ज्यांना संरक्षण अधिकाऱ्यांनी न्यायदंडाधिकाऱ्यांकडे पाठवले आहे, अशी व्यक्ती.
२. शक्यतो सदर कायद्याखालील-समुपदेशक महिला असावी (नियम 13(3)).
३. वादग्रस्त अर्जाशी संबंधित किंवा त्यात हितसंबंध असलेल्या किंवा कोणत्याही एका पक्षाशी नाते असलेल्या समुपदेशकाची त्या विशिष्ट अर्जासाठी सदर कायद्याखालील-समुपदेशक म्हणून नेमणूक केली जाऊ शकत नाही.
४. प्रतिवादीच्या चालू अर्जावरील किंवा अन्य कायद्याच्या खटल्यातील वकील असलेल्या कोणाचीही नेमणूक केली जाऊ शकत नाही.

## ७.३ सदर कायद्याखालील-समुपदेशकाने अनुसरावयाची कायदेशीर पध्दत

सदर कायद्याखालील-समुपदेशकाने नियम 14 मध्ये दिलेली समुपदेशनाची पध्दत अनुसरणे आणि ती देखील न्यायालयाच्या किंवा संरक्षण अधिकाऱ्यांच्या पर्यवेक्षणाखाली अनुसरणे बंधनकारक आहे. या प्रक्रियेची माहिती देणारा तक्ता (फ्लो-चार्ट) खाली दिला आहे.

---

[4] सदर कायद्याखालील-समुपदेशक म्हणून नेमणूक करण्यासाठी त्याची कमीतकमी गुणवत्ता आणि अनुभव काय असावा यासाठी महाराष्ट्र राज्य शासनाचे स्वतःचे नियम आहेत

**सदर कायद्याखालील-समुपदेशकाने अनुसरावयाच्**



हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे की जर कौटुंबिक हिंसा पीडितेस समझोता (सलोखा/ समेट किंवा विभक्त होण्यासाठी) हवा असेल तरच पाचवा टप्पा घडून येतो आणि समुपदेशनाची प्रक्रिया त्या दिशेने जायला हवी.

तथापि, त्याचा असाही अर्थ होतो की जरी पीडितेस समझोता नको असला तरी न्यायदंडाधिकारी तिला समुपदेशनासाठी पाठवू शकतात. समुपदेशन प्रतिवादीचे किंवा पीडितेचेसुध्दा असू शकते. प्रत्यक्षात असे दिसून येते की आलेल्या अर्जांपैकी जास्त अर्ज समुपदेशनासाठी पाठविले जात नाहीत मात्र बरेच अर्ज मध्यस्थीसाठी पाठवले जातात.

आपण हे लक्षात घेतले पाहिजे की दोन व्यक्तींच्या वादात किंवा मतभेदात समझोता घडून आल्यास ते समुपदेशनाच्या फलितांपैकी एक फलित असते ( नियम 14(7) संदर्भ पाहा) आणि समुपदेशनाचे ते एकमेव फलित **नसते**. केवळ बोलणी करून (negotiation) समझोता घडवून आणणे ही **मध्यस्थी** असते, समुपदेशन नसते.

आपण 'सदर कायद्याखालील-समुपदेशन' आणि 'मध्यस्थी' यात काय फरक आहे ते पाहूया.

## ७.४ 'सदर कायद्याखालील-समुपदेशन' (काऊन्सेलिंग) आणि 'मध्यस्थी' (मिडिएशन) यात काय फरक आहे?

सदर कायद्याच्या नियम 14 मध्ये असलेल्या समुपदेशन पध्दतीचा अभ्यास केल्यास असे स्पष्टपणे नमूद केलेले दिसून येते की

१. जर कौटुंबिक हिंसा पीडितेची इच्छा असेल तरच फक्त समझोत्याचा प्रयत्न केला जातो. (नियम 14(7)).
२. कौटुंबिक हिंसा पुन्हा घडणार नाही याची खात्री हमीपत्रातून घेतली जाण्यावर समझोता करताना भर दिलेला असतो (नियम 14(3) आणि 14(6)).

**याचाच अर्थ असा की कौटुंबिक हिंसेचे समर्थन होऊच शकत नाही या विश्वासावर सदर कायद्याचे समुपदेशन आधारलेले आहे.**

दुसऱ्या शब्दात, जाब देणारा हिंसा करणार नाही किंवा हिंसेची पुनरावृत्ती होणार नाही ह्याची खात्री देणे हे सदर कायद्यातील-समुपदेशनाचे उद्दिष्ट आहे. जर दोन्ही पक्षात वाद आणि मतभेद असतील आणि त्यांच्यात समझोता घडून येणे शक्य नसेल तर समुपदेशनामुळे समझोता घडून येणार नाही.

मध्यस्थी वेगळी असते.

मध्यस्थीमध्ये समझोता करताना उद्दिष्ट वेगळे असते, त्यात हिंसा न करण्याची हमी घेतली जातेच असे नाही - ती मध्यस्थी करणाऱ्याच्या तारतम्यावर अवलंबून असते.

याचा अर्थ असा नाही की मध्यस्थी करताना प्रतिवादीकडून हिंसेची पुनरावृत्ती होणार नाही अशी हमी घेतली जात नाही परंतु सदर कायद्याखालील-समुपदेशकावर जसे ते बंधनकारक असते तसे मध्यस्थावर बंधनकारक **नसते**. परंतु सदर कायद्यामध्ये 'मध्यस्थी' संदर्भात कोणतीही खास अशी तरतूद नाही (आणि म्हणून नियम देखील नाही). कलम २८ अन्वये न्यायदंडाधिकारी त्यांची स्वतःची पध्दत विकसित करण्यासाठी आणि ती अनुसरण्यासाठी स्वतःचा अधिकार वापरू शकतात म्हणून ते त्या अर्जाच्या बाबतीत मध्यस्थी करण्याचा निर्देश देऊ शकतात. मुंबई उच्च न्यायालयाच्या मध्यस्थीच्या नियमान्वयेसुध्दा मध्यस्थी करता येते.

**प्रामुख्याने, समुपदेशन आणि मध्यस्थी - या पध्दतीत दृष्टिकोनात, उद्देशात आणि प्रक्रियेत फरक आहे.**

सदर कायद्याखालील-समुपदेशन हे स्त्रीवादी समुपदेशनाच्या तत्त्वांशी समांतर आहे.[5] नियम 14(1) आणि नियम 14(6) यांचा **भर प्रामुख्याने पीडित महिलेपेक्षा प्रतिवादीवर आहे** त्यामुळे तो हिंसा करत नाही किंवा त्याची पुनरावृत्ती करत नाही याची खात्री त्याने द्यायची असते. यातून असे ध्वनित होते की **समुपदेशक प्रतिवादीस कौटुंबिक हिंसेची सुरुवात कशी झाली त्याचे मूळ कारण काय आहे याचा विचार करायला लावून त्याचा त्याला शोध घ्यायला लावतात** (समुपदेशकाने आंतरिक घटक - दृष्टिकोन, विचारसरणी, भावना, आणि वर्तन या बाबींवर भर द्यावा). पीडितेस राहण्यासाठी जागा देणे, किंवा

[5]CEHAT (सेहत), मुंबई, या सामाजिक संस्थेने लिहिलेले - कौटुंबिक हिंसेचा सामना करणाऱ्या महिलांचे समुपदेशन करण्याकरिता नैतिक मार्गदर्शक तत्वे पाहा
http://www.cehat.org/cehat/uploads/files/Ethical%20Guidelines%20for%20Counselling%20MARATHI.pdf

तिला पोटगी देणे यांसारख्या बाह्य बाबींची पूर्तता करण्याबरोबरच आंतरवैयक्तिक संबंधातील दृष्टिकोन, विचारसरणी, आणि वर्तन या बाबींमध्ये परिवर्तन घडवून आणण्यास साहाय्य होते. या प्रकारच्या समुपदेशनामुळे एकमेकांशी संवाद करण्याची गुणवत्ता सुधारते तसेच पीडिता आणि हिंसा करणाऱ्या व्यक्तीमधील नातेसंबंधही सुधारतात आणि त्यामुळे सौहार्दपूर्ण वातावरणात समेट घडून किंवा विभक्त होऊन समझोता घडून येतो.

मध्यस्थी करताना पीडिता आणि प्रतिवादीवर सारख्याच प्रमाणात भर दिलेला असतो. यात बोलणी करण्याचा उद्देश समझोता व्हावा हा असतो. याचा अर्थ असाही होतो की पीडितेसह दोन्ही पक्षांनी काही प्रमाणात तडजोड करणे अपेक्षित असते. म्हणून अशा प्रकारच्या हस्तक्षेपात पीडिता **'हिंसा नको' या तिच्या भूमिकेशी अजिबात तडजोड करत नाही ना याबाबतीत मध्यस्थास जागरूक राहावे लागते**. एखाद्या व्यक्तीत खोलवर रुजलेली हिंसा मध्यस्थाने स्त्रीवादी दृष्टिकोन स्वीकारल्याशिवाय नियंत्रित करता येत नाही. म्हणून, त्याचा परिणाम जास्त करून वरवर असू शकतो आणि पीडिता आणि हिंसा करणाऱ्या व्यक्तीच्या नातेसंबंधात जी काही सुधारणा दिसून येते ती निव्वळ तेवढ्यापुरती असते.

या मार्गदीपिकेच्या- 'लिंगभाव आणि कौटुंबिक हिंसा' - या पहिल्या भागात, आपण कौटुंबिक हिंसेची मूळ कारणे, पितृसत्ताक पध्दतीच्या आधाराने स्त्री-पुरुषात खेळले जाणारे सत्तेचे राजकारण, कौटुंबिक हिंसा घडण्यास प्रामुख्याने जबाबदार असलेले हिंसा करणाऱ्या व्यक्तींवरील पितृसत्तेचे नियंत्रण आणि त्याहून अधिक वैयक्तिक संबंधातील त्यांची मनोवृत्ती याची सविस्तर चर्चा केली. ही सविस्तर चर्चा विचारात घेऊन समुपदेशन आणि मध्यस्थी करणे आवश्यक आहे. **जर असे केले नाही तर समुपदेशनास आलेल्या व्यक्तीत पितृसत्ताक विचारसरणी कायम राहील आणि त्याचे दृढीकरण होईल**. उदाः समुपदेशक किंवा मध्यस्थ पीडित महिलेस विचारतो की, "तू तुझ्या माहेरी जायचे असल्यास तुझ्या सासू-सासऱ्यांना किंवा नवऱ्याला विचारत का नाहीस"? अशी परवानगी घ्यावी लागते या समजुतीमुळे हिंसा नको असल्यास अशी परवानगी घ्यावी ही समझोत्यातील पूर्वअट होऊ शकते. अशा केसमध्ये तिच्या हालचालींवरील आणि निवडीवरील पितृसत्तेचे नियंत्रण दृढ होते, आणि अप्रत्यक्षपणे या पूर्व अटीमुळे हिंसेचे समर्थन केल्यासारखे होते.

सदर कायद्यातील समुपदेशनात हिंसा करणाऱ्यास 'राग' कसा हाताळायचा, आक्रमक वर्तनापासून कसे दूर राहायचे, स्वतः श्रेष्ठ असल्याचा दृष्टिकोन तसेच लिंगभाव आणि पितृसत्तेमुळे निर्माण झालेली 'आदर्श पुरुषाची' संकल्पना (याची सविस्तर चर्चा भाग एकमध्ये केली आहे) कशी बदलायची हे समुपदेशकाचे जाणीवपूर्वक उद्दिष्ट असावे. मध्यस्थी करताना हे जाणीवपूर्वक घडेलच असे नाही, त्यात सर्वसामान्य ज्ञानाचा मार्ग अवलंबिला जाऊ शकतो. वर दर्शवलेला समुपदेशन आणि मध्यस्थीतील फरक संक्षिप्त रूपात खालील तालिकेत दिला आहेः

**'समुपदेशन' आणि 'मध्यस्थी' यातील फरक**

| **वैशिष्ट्य** | **सदर कायद्यांतर्गत समुपदेशन** | **मध्यस्थी** |
|---|---|---|
| **संदर्भ** | कलम 14 अन्वये | मुंबई उच्च न्यायालयाच्या सिविल प्रोसिजर अल्टरनेटिव डिस्प्यूट रेझोल्यूशन रूल्स, २००६ आणि *सदर कायद्या*च्या कलम 28 अन्वये (न्यायालय स्वतःची प्रोसिजर स्वीकारू शकते.) |
| **प्राथमिक उद्दिष्ट** | हिंसा थांबवणे | समझोता करणे (वादग्रस्त पक्षांमध्ये) |
| **रोख (भर)** | हिंसा थांबवावी म्हणून प्रतिवादीवर अधिक प्रमाणात भर | समझोता करण्यासाठी तडजोड करावी म्हणून दोन्ही पक्षांवर भर |
| **उपयोजित तत्त्वे** | स्त्रीवादी समुपदेशन | बोलणी करणे (negotiation) |
| **दृष्टिकोन** | लिंगभावाविषयी संवेदनशील आणि स्त्रीवादी | लिंगभावाविषयी संवेदनशील नाही |
| **परिवर्तनाची/ बदलाची दिशा** | अंतर्गत / आतून (परिवर्तनासाठी कायद्याच्या रेट्यामुळे चालना मिळू शकते) | बाहेरून ( अंतर्गत परिवर्तन दैवयोगाने घडल्यास) |

| वैशिष्ट्य | सदर कायद्यांतर्गत समुपदेशन | मध्यस्थी |
|---|---|---|
| ***पीडब्ल्यूडीव्हीए* अधिनियम आणि नियमातील तरतूद** | कलम 14 आणि नियम 14 | *सदर कायद्या*मध्ये कोणतीही विशिष्ट तरतूद नाही. मध्यस्थीमध्ये न्यायदंडाधिकाऱ्यांनी कलम 28 अन्वये आणि मुंबई उच्च न्यायालयाच्या मध्यस्थी नियमांप्रमाणे अधिकाराचा वापर केला. |
| **समुपदेशनाची दिशा** | (छळ/ हिंसा होणाऱ्या नातेसंबंधात) मूल्य, दृष्टिकोन, भावना, प्रेरणा आणि कौशल्यांमध्ये परिवर्तन घडवून प्रतिकूल परिस्थितीत हिंसक प्रतिसाद देण्याची सवय मोडून अहिंसक प्रतिसाद देण्यास शिकवणे हे उद्दिष्ट आहे. | परिवर्तन बाह्य दिशेने होते. समझोत्याच्या अटी आणि परिस्थिती आखणे आणि त्या अनुसरणे यावर भर दिला जातो. (घरखर्चासाठी पैसे देणे, घर देणे, घराची नीट व्यवस्था बघणे, सासू-सासऱ्यांचा अपमान न करणे इ.) . |
| **हे कोणाला उद्देशून आहे** | हे पितृसत्ताक नियंत्रणाला उद्देशून आहे. | यात वाद आणि मतभेदांच्या समस्यांना संबोधले आहे. |
| **हिंसेची पुनरावृत्ती होऊ नये याची हमी** | समुपदेशन प्रक्रियेच्या सुरुवातीसच हिंसा होणार नाही असे हमीपत्र प्रतिवादीकडून लिहून घेणे नियम 14(6) अन्वये आवश्यक आहे. | हिंसा न होण्याचे लेखी हमीपत्र घेतले जाईलच असे नाही. त्याचा समझोत्याची एक अट म्हणून समावेश केला जाऊ शकतो. |
| **मदत प्रक्रिया** | हिंसा करणाऱ्या व्यक्तीस आणि कौटुंबिक हिंसा पीडितेस हिंसक वर्तन का घडले त्याची मूळ कारणे शोधायला लावणे, आणि हिंसामुक्त नातेसंबंध ठेवण्यासाठी बोलणी करायला लावणे | वादात असलेल्या दोन्ही पक्षांमध्ये बोलणी करणे |

| वैशिष्ट्य | सदर कायद्यांतर्गत समुपदेशन | मध्यस्थी |
|---|---|---|
| **न्याय्य तत्वाचा वापर करणे** | सदर कायद्याच्या नियम 14(10) प्रमाणे - न्यायाधीशाची भूमिका न घेणे (non-judgmental)<br>हिंसा थांबवण्याच्या प्रयत्नात, हिंसापीडित महिलेच्या इच्छेची/मताची योग्य ती कदर करणे (स्वयंनिर्णयाचे तत्त्व). | मध्यस्थीची तत्वे- मुंबई उच्च न्यायालयाच्या मध्यस्थीच्या नियमांप्रमाणे मार्गदर्शित |
| **अपेक्षित फलित** | समझोता होईलच असे नाही.<br>**नोंद:** नियम 14(7) असे नमूद करतो की पीडितेची इच्छा असेल तरच समझोत्याचे प्रयत्न केले जावेत. | या प्रक्रियेचा शेवट समझोत्यात व्हावा अशी अपेक्षा असते. |

प्रतिवादीस कौटुंबिक हिंसा करण्यापासून थांबवणाऱ्या घटकांकडे पाहूया. प्रतिवादीस समुपदेशन करताना सदर कायद्याखालील-समुपदेशकास काम करावे लागेल असे दोन घटक आहेत.

१. <u>कायद्याच्या प्रभावाचा वापर करणे - हिंसा थांबवण्यासाठी</u> : सदर कायद्या अन्वये संरक्षण आदेश (हिंसा-थांबवा आदेश) देऊन हिंसक असलेल्या प्रतिवादीस हिंसा थांबवण्यासाठी एक संधी दिली जाते. असा आदेश देऊनही जर तो हिंसा करतच राहिला, म्हणजेच त्याने आदेशाचा भंग केला, तर त्याच्यावर खटला भरून त्याला एक वर्षापर्यंत शिक्षा होऊ शकते आणि / किंवा २०,००० रुपयांपर्यंत दंड होऊ शकतो. संरक्षण आदेश हिंसेला प्रतिबंधक ठरू शकतो. “हिंसा चालणार नाही” - याची पुन्हा एकदा जाणीव करून देणे हे समुपदेशकाचे पहिले कर्तव्य ठरते आणि त्यातून स्वतःमध्ये बदल घडवून आणण्याची चालना मिळण्याची शक्यता निर्माण होते.
   (म्हणून नेहमी संरक्षण आदेश निघाल्यानंतरच न्यायदंडाधिकाऱ्याने त्या पक्षाला किंवा पक्षांना समुपदेशनासाठी निर्देशित करणे योग्य ठरते.)
२. नंतर सदर कायद्याखालील-समुपदेशक ज्या विशिष्ट कारणांमुळे हिंसा सुरू झाली त्या कारणांचा-परिणामांचा विचार करून प्रतिवादीस परिवर्तन घडवून आणण्यास

साहाय्य करू शकतो. त्यामुळे प्रतिवादी कौटुंबिक हिंसा पीडितेशी त्याचे जे मतभेद असतात ते स्वतः हिंसक न होता व्यक्त करू शकतो आणि ते कौशल्य शिकू शकतो.

## ७.५ समुपदेशन म्हणजे काय?

'काउन्सेलिंग' म्हणजेच समुपदेशन. हा शब्द व्यवहारात अनेक अर्थाने वापरला जातो. सल्ला देणे, मार्गदर्शन करणे, आधार देणे, मध्यस्थी करणे, अगदी एखाद्या कॉलेजच्या प्रवेशाबाबत किंवा परदेशी शिकायला जाण्याबाबत मुलाखत अथवा सल्ला-मसलत होते, त्या प्रक्रियेला देखील 'काउन्सेलिंग' असेच संबोधले जाते. या हस्तपुस्तिकेत मात्र 'काउन्सेलिंग' चा अर्थ 'मानसशास्त्रीय सिध्दांतावर आधारित मदतीची प्रकिया' असा आहे[6].

## ७.६ व्यक्तींना मदत करण्याचे विविध मार्ग




अ. **सांगणे** - या प्रक्रियेत व्यक्ती बदलाच्या केंद्रस्थानी जरी असली, तरी तिचा सहभाग सक्रिय नसतो. उदा. एकत्र कुटुंबात राहून वाद होत असल्यास, वेगळे राहण्याबद्दल दिलेली सूचना

[6] 'प्रवास सक्षमतेकडे' या समुपदेशकांसाठी असलेल्या स्त्री अभ्यास केंद्र, आय्एल्एस् विधी महाविद्यालय, पुणे, येथे २०१८ मध्ये प्रकाशित झालेल्या मार्गदर्शिकेतील डॉ. शिरीषा साठे लिखित तिसऱ्या प्रकरणातील - "कौटुंबिक हिंसा आणि समुपदेशन" – यातील काही भाग इथे सादर केलेला आहे.

ब. **तयार उत्तर देणे** - या प्रक्रियेत समस्या / प्रश्न सोडविण्यावर भर असतो. बदलाच्या प्रक्रियेमध्ये  व्यक्तीचा सक्रिय सहभाग नसतो. जसे एखाद्या त्रासासाठी डॉक्टरने केलेली शस्त्रक्रिया अथवा लिहून दिलेले औषध

क. **सल्ला देणे** - या प्रक्रियेत प्रश्नावर भर असतो व व्यक्तीचाही सहभाग असतो. व्यक्तीला काय कर, काय करू नको यावर सल्ले दिले जातात जेणेकरून प्रश्नाचे निरसन होईल. यावर दिलेले सल्ले ऐकून व्यक्तीने क्रिया करणे अपेक्षित असते. उदा. आर्थिक सल्लागाराने कराच्या संदर्भात दिलेला सल्ला

ड. **समुपदेशन** - यामध्ये व्यक्ती बदलाच्या प्रक्रियेच्या केंद्रस्थानी असते, तसेच तिचा प्रक्रियेमध्ये सक्रिय सहभाग असतो. व्यक्तीमध्ये बदल घडवून आणणे व तिला निर्णय घेण्यास व समस्या सोडवण्यास सक्षम बनविणे हा उद्देश असतो.

उदाः एक विवाहित महिला दिवसभर कामासाठी बाहेर असते. तिने रात्री आल्यानंतर केलेला स्वयंपाक तिच्या सासूला आवडत नाही. त्यावरून त्यांची रोज भांडणे होतात. ही तक्रार ऐकल्यावर मदत करणारी व्यक्ती विविध प्रकारे मदत करू शकते.

१) लक्ष देऊ नकोस वा स्वयंपाक करणे बंद कर असे सांगितले तर यात सांगणे ही प्रक्रिया घडते. ज्यामध्ये व्यक्तीचा सहभाग नसतो. परंतु बदलामध्ये व्यक्तीवर भर असतो.
२) मदतनीसाने परस्पर सासूशी संवाद साधून समस्या सोडविण्याचा प्रयत्न केला तर तयार उत्तर देणे ही प्रक्रिया घडते. ज्यात व्यक्तीचा सहभाग नसतो व समस्या सोडविण्यावर भर असतो.
३) स्वयंपाकाला बाई लाव असा सल्ला दिला तर प्रक्रियेत व्यक्तीचा सहभाग असतो व समस्य़ेवर भर असतो.
४) समुपदेशानामध्ये  वरील परिस्थितीचे विविध पैलू लक्षात घेतले जातात - उदाः सुनेने स्वयंपाकाच्या जबाबदारीचे नियोजन करणे, त्यासाठी लागणारे कौशल्य शिकणे, सासूची मदत अपेक्षित असल्यास त्याविषयी तिच्याशी संवाद करणे, किंवा स्वतःच्या मर्यादा सांगणे, अथवा सासूच्या टीकेला ठामपणे आणि शांतपणे हाताळणे. समुपदेशनामुळे या नात्यामध्ये दीर्घकालीन सकारात्मक बदल घडवून आणता येऊ शकतो.

कुठल्याही मदतीमध्ये वरील बहुतेक सर्व प्रक्रिया योग्य त्यावेळी कराव्या लागतात. संकटात असलेल्या व हतबल झालेल्या व्यक्तीला सांगणे व तयार उत्तर देणे हे करावे लागते. कारण संकटाचा धक्का व दुःख यामुळे तिची विचारशक्ती कमी पडू शकते. भावनांचा जबरदस्त पगडा असतो. अशा वेळी मदतगाराने तिच्या वतीने योग्य तो विचार करून योजना आखणे क्रमप्राप्त असते. तसेच व्यक्तीला, समस्येला नीट समजून घेतल्यानंतर दिलेला सल्लाही

उपयोगी ठरू शकतो.  फक्त सल्ला कधी दिला गेला, तो रास्त होता का यावर त्याचा परिणाम ठरतो. नाहीतर सल्ले ऐकून व्यक्ती प्रोत्साहित होण्याऐवजी अजून निराश होऊ शकते वा कंटाळून मदतीसाठी येण्याचेही टाळू शकते.

**कृपया नोंद घ्यावीः सदर कायद्याखालील समुपदेशकास प्रतिवादीने हिंसा करण्यापासून परावृत्त व्हावे असे वाटत असल्यामुळे त्याच्या समुपदेशनावर ह्या मार्गदीपिकेत भर दिला आहे. ज्या अर्जांमध्ये पीडिता आणि हिंसा करणारी व्यक्ती यांना समेट व्हायला हवा असतो तिथे  नातेसंबंधावरील समुपदेशनाच्या काही पूर्वसूचना दिल्या आहेत.** कौटुंबिक हिंसेच्या परिस्थितीत समुपदेशनाविषयी अधिक जाणून घेण्यासाठी ‘प्रवास सक्षमतेकडे’ या आय्एल्एस् लॉ कॉलेज, पुणे, येथील महिला अभ्यास केंद्राने प्रकाशित केलेल्या (२०१८) या समुपदेशकांसाठीच्या मार्गदीपिकेचा संदर्भ पाहावा.

## ७.७ हिंसा करणाऱ्या व्यक्तीस (पीडितेच्या जोडीदारास) समुपदेशन करणे[7]

### ७.७.१ अशा हिंसा करणाऱ्या व्यक्तीस जाणून घेणे

हिंसा करणाऱ्या व्यक्तीविरुध्द पीडिता त्याने हिंसा केल्याची तक्रार करते. हिंसा हा अपराध असल्यामुळे हिंसा करणारा अपराधी ठरतो. जेव्हा अशी अपराधी व्यक्ती न्यायदंडाधिकाऱ्याने समुपदेशनासाठी पाठवल्यावर समुपदेशकाकडे येते तेव्हा असे अपेक्षित असते की समझोता/ समेट होवो वा न होवो, **समुपदेशनाच्या परिणामुळे हिंसा मात्र थांबली पाहिजे**.

हिंसा करणाऱ्या व्यक्तीशी बोलल्यानंतर समुपदेशकास खालील गोष्टी शक्य होतील -

अ. हिंसा करणाऱ्या व्यक्तीला समजून घेता येईल. त्याची मानसिकता, विचार करण्याची पध्दती, हिंसेला खतपाणी घालणाऱ्या धारणा, मूल्ये समजतील. कौटुंबिक हिंसेच्या घटनेला घडलेले काही ना काही निमित्त असते ते कळेल.

आ. समुपदेशनाचा रोख निश्चित करणे शक्य होईल. यासाठी समुपदेशक हिंसेला निमित्त ठरलेल्या घटनेपासून चर्चा सुरू करू शकतो.

इ. हिंसा करणाऱ्या व्यक्तीबाबत समानुभूती प्रदर्शित करता येईल.

ई. बदल घडवून आणण्यामधील अडथळे समजून घेता येतील. (मूल्ये, प्रेरणा, कौशल्ये या पातळीवरील अडथळे)

[7] ‘प्रवास सक्षमतेकडे’ या समुपदेशकांसाठी असलेल्या स्त्री अभ्यास केंद्र, आय्एल्एस् विधी महाविद्यालय, पुणे, येथे २०१८ मध्ये प्रकाशित झालेल्या मार्गदर्शिकेतील प्रसन्ना इनवल्ली लिखित पहिल्या प्रकरणातील - “कौटुंबिक हिंसा आणि हिंसेची प्रक्रिया व राजकारण” - यातील काही भाग इथे सादर केलेला आहे.

## **समुपदेशकांना हिंसा करणाऱ्या पुरुषास समजून घेण्यासाठी काही सूचना**

अ. हिंसा करणाऱ्या व्यक्तीस पुरुषप्रधान व्यवस्थेतील तत्त्व, धारणा, नियम किती मान्य आहेत हे निश्चित करावे

त्याने केलेल्या छळाविषयी / हिंसेविषयी विचारल्यास तो जी काही विधाने करतो ती नोंदवून घ्यावीतः

अशा वर्तनाविषयी हिंसा करणाऱ्या व्यक्तीने केलेल्या विधानांची काही उदाहरणे :

- "मी असे पुन्हा वागणार नाही"
- "माझी पत्नी माझ्याशी मर्यादेत राहून 'नीट' वागत नाही, म्हणून तिला मी मारतो, शिवीगाळ करतो"
- "सर्व तिच्याच चुका आहेत, कितीही समजावून सांगितले तरी देखील पुन्हा तशीच वागते"
- "तिच्यात काही अर्थ नाही, काही उपयोग नाही तिचा"
- "ती अत्यंत उर्मट, घमेंडी आहे"
- "तिने माझ्याशी वाद घातला, मला जाब विचारला, म्हणून मी फक्त एकदा तिला मारले."
- "मी तिला सर्व काही पुरवतो, पण तरी कटकट करते, तिला हवे तसे वागते"
- "तिला अनेकदा बजावूनही ती स्वतःला वाटेल तेच करते"
- "ती स्वतःला फार शहाणी समजते"
- "माझा खरे पाहता तो उद्देश नव्हता परंतु माझ्या आई-वडिलांच्या समाधानासाठी मी तसे वागलो"
- "मी तिच्यासाठी सर्व काही केले फक्त तिची पूजाच करायची बाकी आहे"
- "आताच्या काळात सर्व कायदे स्त्रियांच्याच बाजूचे आहेत"
- "तुम्ही स्त्री आहात त्यामुळे स्त्रीचीच बाजू घेणार हे मला माहिती आहे"

हिंसा करणाऱ्या व्यक्तीने केलेल्या प्रत्येक विधानातून त्याची मूल्य, तत्त्वे, धारणा आणि तो स्त्रीवर घालत असलेले नियंत्रणं स्पष्ट होते.

- *"माझी पत्नी माझ्याशी 'नीट' वागत नाही.", "यात सर्वस्वी तिचीच चूक आहे", तिला अनेकदा बजावूनही ती स्वतःला वाटेल तेच करते"* - या विधानांमधून हेच स्पष्ट होते की तिने जर चूक केली तर तिला शिक्षा ही होणारच. तिने त्याला अपेक्षित असेल तसेच वागले पाहिजे, नाहीतर तिचे वर्तन चूक ठरेल.

- *"ती उर्मट, घमेंडी आहे","ती स्वतःला फार शहाणी समजते ", "तिने माझ्याशी वाद घातला, मला जाब विचारला म्हणून मी फक्त एकदा तिला मारले."*, या विधानांतून त्याची धारणा स्पष्ट समजते की, तिला प्रश्न विचारण्याचे स्वातंत्र्य नसावे, त्याच्या किंवा तिच्यापेक्षा जास्त सत्ता असलेल्या कोणाच्याही विरोधात तिने मत नोंदविण्याचे स्वातंत्र्य तिला नाही. जर ती तसे वागली तर तिला हिंसेची शिक्षा दिली जाईल.
- *मी तिला सर्व काही पुरवतो. ", "मी तिच्यासाठी सर्व काही केले फक्त तिची पूजाच करायची बाकी आहे ."* - या काही विधानांवरून स्पष्ट होते की तो त्याची संरक्षकाची भूमिका वठवतो आहे. सर्व काही पुरवणारा पालक तो असल्याने त्याच्याबाबत लाभार्थ्याला कृतज्ञताच असली पाहिजे. तसेच त्याच्या आदेशांचे तंतोतंत पालनही केले पाहिजे.

ब. हिंसा करणाऱ्या व्यक्तीशी समुपदेशकाने समानुभूतीने वागावे

हे 'बरोबर' आहे की 'चूक' आहे अशा चौकटीमध्ये विचार केला जाण्याची खूप शक्यता असते कारण  समुपदेशक हिंसेच्या विरोधात काम करत असतो.. अर्थातच हिंसेचे कृत्य म्हणजे हक्कांचे उल्लंघन आहे आणि कायद्याच्या चौकटीत तो गुन्हाही आहे असे समुपदेशक मानत असतो. स्वाभाविकपणे त्याच्या नजरेतून असा पुरुष म्हणजे  'गुन्हेगार', 'हिंसक', आणि 'वाईट' व्यक्ती ठरतो. या धारणांमुळे हिंसा करणाऱ्या पुरुषाला तो समानुभूती दाखवू शकणार नाही. त्यामुळे समुपदेशन करण्यामध्ये अडथळा येतो आणि समुपदेशन परिणामकारक होत नाही.

**हिंसा करणाऱ्या पुरुषाला समानुभूती दाखवणे म्हणजे त्याने केलेल्या हिंसेचे समर्थन करणे असे नाही. किंबहुना समुपदेशक अशा पुरुषांच्या पितृसत्तेने घडविलेल्या धारणा नेमक्या ओळखू शकतात**. त्याच्या सत्ता-नियंत्रणाच्या स्थानाला धक्का पोहोचलेली परिस्थिती, त्याला मिळणा-या सवलती आणि कमकुवत मुद्दे, त्याला हिंसात्मक वर्तनाकडे ढकलणारी तणावाची परिस्थिती निर्माण होण्याची कारणे, याची नेमकी समज समुपदेशकाला आली तरच त्याला समानुभूती दाखवणे तसेच आवश्यक बदल घडवून आणण्यासाठी समुपदेशन करणे हे शक्य होणार आहे.

उदा. स्त्रियांना काही किंमत नसते अशी ज्या पुरुषाची धारणा आहे तो केव्हाही स्वतःच्या पत्नीचा मान राखू शकणार नाही. एवढेच नाही तर त्याचीही धारणा त्याच्या तिच्याशी होणा-या प्रत्येक वर्तनातून, व्यवहारामधून व्यक्त होत राहणार - हे समुपदेशक समजू शकेल.

## <u>समानुभूती : समुपदेशकाने व्यवहारात आणण्याचे अत्यंत महत्त्वाचे तत्त्व</u>

समानुभूती म्हणजे काय? हे समजून घेण्यासाठी डोळे तपासणा-या तंत्रज्ञाचे उदाहरण चपखलपणे देता येईल. आपण डोळे तपासण्यासाठी गेल्यावर आपल्याला डोळे तपासणारी व्यक्ती तिला योग्य वाटेल त्याच चष्म्याचा आग्रह धरत नाही. तर आपल्याला काही पर्याय देते. जास्तीत जास्त स्पष्ट कोणत्या काचेतून दिसते ती काच निवडण्याचे स्वातंत्र्य आपल्याला असते. त्याचप्रमाणे समुपदेशकाने त्याचे मत किंवा उपाय पीडित व्यक्तीवर लादणे योग्य ठरत नाही. समुपदेशकाने जर जगाकडे पीडित स्त्रीच्या नजरेतून पाहाण्याचा प्रयत्न केला तर तो पीडित स्त्रीला योग्य ते उपाय सुचवू शकेल आणि समुपदेशनाची प्रक्रियाही प्रभावीपणे पुढे जाऊ शकेल. यालाच समानुभूती असे म्हणतात. समानुभूतीबाबत लक्षात ठेवण्याच्या बाबी -

अ. समानुभूती दर्शविल्यास पुढील बदल घडवण्याच्या प्रक्रियेमध्ये येऊ शकणारे अडथळे समुपदेशकाच्या लक्षात येऊ शकतात. (धारणा, प्रेरणा आणि कौशल्यांच्या पातळीवर)

आ. समानुभूती म्हणजे एकमत असे नाही - समुपदेशकाने पीडित स्त्रीच्या मताशी सहमत होणे म्हणजे समानुभूती नव्हे. तर समुपदेशकाला बदल घडवून आणण्यातील अडथळे समजून घेण्याचा एक मार्ग असू शकतो. यातून समुपदेशकाला प्रश्न सोडविण्याच्या दिशेने पीडित व्यक्तीची गती किती असू शकेल हेही समजून येऊ शकते.

इ. समुपदेशन प्रक्रियेमध्ये समुपदेशकाला हिंसा करणा-याशीही समानुभूती दर्शवणे आवश्यक असते. यामुळे समुपदेशकाला हिंसेमागील नेमके कारण समजेल. हिंसेच्या कारणांची चौकशी करणे म्हणजे त्या कारणांना मान्यता देणे असे नव्हे तर कारणे समजल्यामुळे बदलाच्या प्रक्रियेचे नियोजन अधिक प्रभावी होऊ शकते.

ई. समुपदेशकाने समानुभूती दर्शविणे अनिवार्य आहे - समुपदेशक स्वतःच्या वर्तणुकीतून, लक्षपूर्वक ऐकून घेऊन, हावभावांवरून, आधार देणारा संवाद साधून, काळजी व्यक्त करण्यातून समानुभूती व्यक्त करू शकतो.

प्रभावी समुपदेशक मुलाखतीच्या सुरुवातीच्या दहा-पंधरा मिनिटांमध्ये समानुभूती व्यक्त करू शकतो.

## क. धोक्यात आलेली सत्ता-नियंत्रणाची  स्थाने ओळखावीत

| |
|---|
| हिंसेमागे असलेल्या बाबी अधिक चांगल्या प्रकारे समजून घेण्यासाठी या मार्गदीपिकेच्या पहिल्या भागात चर्चा केलेल्या हिंसेच्या कारणांची पुन्हा एकवार उजळणी करूया<br>- सत्ता टिकवून ठेवण्यासाठी हिंसेचा हत्यारासारखा वापर केला जातो.<br>- सत्तेला आव्हान दिले जाते, तेव्हा सत्ताधा-यांनाही आव्हान दिले जाते, परिणामी हिंसा होते. उदा. आपल्या मताशी सहमत नसलेल्या विद्यार्थ्याला शिक्षक मारहाण करतो कारण आपले म्हणणे डावलून विद्यार्थ्याने शिक्षकाच्या ज्ञानालाच आव्हान दिल्यासारखे त्यांना वाटते.<br>- हिंसा ही सत्ता निर्माण करण्यास तसेच वाढविण्यास साहाय्य कारक असते.<br>- पुरुषांना स्वतःकडे सत्ता असल्याची पुरेशी जाण असते, अर्थातच हिंसा करणाऱ्या पुरुषालाही त्याच्या पाठीशी पितृसत्ता असल्याची  खात्री असते |

**सत्ता-नियंत्रणाची धोक्यात आलेली स्थाने ओळखण्यासाठी काही केसेस उदाहरण म्हणून चर्चेला घेऊया**.

**केस क्र १** – हे पाच सदस्यांचे कुटुंब आहे – पती, पत्नी, त्यांचा मुलगा आणि नव-याचे आई-वडील. पती बेरोजगार आहे आणि पत्नी एका कंपनीमध्ये नोकरी करते. पतीने पत्नीचे बँक-पुस्तक, एटीएम कार्ड हे स्वतःच्याच ताब्यात ठेवले आहे. तिचा पूर्ण पगारही पतीच्याच ताब्यात असतो, तिला हवे तेव्हा तिने पैसे मागावे असे अपेक्षित असते. तो दररोज तिला तिच्या कामावर सोडायला  आणि आणायला जातो. कामावर जाण्याआधी ती सर्वांसाठी स्वयंपाक करते, मुलाची शाळेची तयारीही करून देते. कामावरून घरी आल्यावर ती घरातील उरलेली सर्व कामे करते. दिवस संपताना ती खूप थकलेली असते. पतीला तिच्याकडून लैंगिक संबंधांची अपेक्षा असते. जर तिने नकार दिला तर तो तिच्यावर संशय घेतो. तिचे कामाच्या ठिकाणीच कोणाशी तरी  संबंध सुरू असतील त्यामुळे ती त्याच्यावर प्रेम करीत नाही असा तो तिच्यावर आरोप करतो. ती पत्नी तिचा पती तिचा संशय घेतो व तिचा छळ करतो अशी तक्रार घेऊन समुपदेशकाकडे आली आहे

**या केसमधील सत्ता नियंत्रणाची स्थाने आधी ओळखूया**.

१. स्त्रीच्या श्रमावर सत्ता आणि नियंत्रण – तो  स्वतः काम करीत नाही परंतु तिला काम करावे  लागते. मुलाचा सांभाळ करणे ही तिचीच जबाबदारी असे त्याला वाटते. त्यामुळे तो काहीच जबाबदारी घेत नाही आणि तिला मुलाची एकहाती काळजी घ्यावी लागते.
२. तिच्या संसाधनांवर सत्ता आणि नियंत्रण – तो तिच्या पगारावर नियंत्रण ठेवतो आणि स्वतःच्या मर्जीप्रमाणे ते पैसे खर्च करतो, तिचा तिच्या उत्पन्नावर काहीही नियंत्रण, हक्क नसतो.

३. तिच्या हिंडण्या-फिरण्यावर सत्ता आणि नियंत्रण – तो दररोज तिला तिच्या कामावर सोडायला आणि आणायला जातो. तिच्या मैत्रिणींनाही तो भेटतो आणि तिचे फोनही तपासतो.
४. लैंगिकतेवर नियंत्रण – तो बायकोच्या इच्छेची-नाराजीची काही फिकीर न बाळगता त्याला हवे असेल तेव्हा शारीरिक संबंधांची मागणी करतो.

वरील केसमध्ये लैंगिक संबंध नाकारल्यामुळे सत्ता नियंत्रणास धोका उत्पन्न होत असल्याने ते अधिक हिंसेच्या उद्रेकास कारणीभूत होते.

| |
|---|
| प्रत्येक केस म्हणजे सत्ता-नियंत्रणाच्या या सर्व स्थानांची परस्पर क्रिया आहे. हस्तक्षेप प्रभावी व्हावा यासाठी यापैकी महत्त्वाच्या स्थानांच्या सत्ता-नियंत्रण या बाबीवर समुपदेशकाने लक्ष केंद्रित करावे. |

**केस २-** जिल्हा परिषदेत काम करणा-या एका माणसाची सुंदर आणि गो-या दिसणा-या मुलीबरोबर विवाह करण्याची इच्छा असते. परंतु एका सावळ्या मुलीशी त्याने विवाह केला. ही मुलगी बी. एड. शिकलेली आहे. आणि ती चांगला पगार मिळवेल असा विचार त्याने केला. त्यांच्या वयामध्ये दहा वर्षांचे अंतर आहे. या केसमध्ये सत्ता नियंत्रणाची स्थाने ओळखता आली ती खालीलप्रमाणे

१. स्त्रीच्या **श्रमावर** नियंत्रण - तिला सर्व घरकाम करावे लागते. ती पहाटे साडेपाचला उठते. स्वयंपाक करते, सकाळी सात ते दुपारी साडेबारा शाळेत नोकरी करते. घरी आल्यावर घरकाम करते. रात्री साडेअकराला झोपते. एके दिवशी तिने न्हाणीघर स्वच्छ केले नाही म्हणून त्याने तिच्या आई-वडिलांना बोलावून घेतले. तिचा नवरा योग्य तेच सांगतो आहे असे पालकांनी तिलाच समजावले. तो जेव्हा घरी येईल तेव्हा तिने त्याला जेवायला वाढले पाहिजे अशी त्याची अपेक्षा असे. घरकामाच्या जबाबदा-या सांभाळून दुधवाल्याचे, गॅसचं बिल भरणे वगैरे कामेही तिलाच करावी लागतात.
२. तिच्या **संसाधनांवर** नियंत्रण - तिला तिचा पगार कपाटात आणून ठेवण्यास सांगण्यात आले होते. तिचा नवरा त्याला हवे तेव्हा पैसे काढून घेत असे. तिच्याकडे पैसे मागणे त्याला कमीपणाचे वाटत असे. म्हणून ही व्यवस्था घालून देण्यात आलेली होती. जर तिने स्वतःच्या पगारातील काही पैसे एखाद्यावेळी घेतलेच तर तो तिला तिच्या खर्चाचे सर्व तपशील विचारीत असे. तिने मोठ्या प्रमाणात घराची आर्थिक जबाबदारी घेतली, परंतु घराचा मालक मात्र तो आहे आणि तिचे नाव कागदपत्रांवर कुठेही नाही.
३. **हिंडण्या-फिरण्यावर** नियंत्रण - तिने तिच्या आई-वडिलांना भेटलेले त्याला आवडत नाही. त्याच्या परवानगीसाठी कित्येकदा तिला त्याच्या खूप विनवण्या कराव्या लागतात.

४. **प्रजननावर** नियंत्रण - तिला पहिल्यांदा मुलगी झाली. त्यानंतर तीन वेळा मुलगी जन्माला येईल या भीतीने तिला जबरदस्तीने गर्भपात करून घेणे भाग पडले.

हिंसक नात्यात असलेल्या सत्ता-नियंत्रणास समुपदेशक ओळखू शकला तर कोणत्या बाबींना प्राधान्य देऊन समुपदेशन करायचे हे ठरवण्यास साहाय्य होऊ शकते. वरील उदाहरणात तिच्या श्रमावर नियंत्रण ठेवण्यासाठी म्हणजेच तिने तिला नेमून दिलेले कोणते काम कधी आणि कसे **केलेच** पाहिजे याबाबत तो जी काही शारीरिक हिंसा करतो, त्याविरुध्द तिची तक्रार आहे. समुपदेशक या घटनेविषयी चर्चा करून समुपदेशन सुरू करू शकतो.

हिंसा करणारी व्यक्ती ती करत असलेल्या हिंसेची काहीही कारणे सांगत असली तरीही त्यामागील सत्ता आणि नियंत्रणाचे राजकारण समुपदेशक ओळखू शकतो.

सत्ता आणि नियंत्रणाची समज वाढल्यामुळे अशा पुरुषांच्या समुपदेशनाची योग्य दिशा ठरवता येते. समुपदेशनात कोणत्या मुद्द्यांचा अंतर्भाव करायचा हेही ठरवता येते. उदाः पतीला पत्नीने जास्त वेळा आई-वडिलांना, नातेवाईकांना, मैत्रिणींना भेटलेले आवडत नाही, हा तिच्या संचारावरील नियंत्रणाचाच एक भाग आहे. ज्याबद्दल समुपदेशक तिच्या पतीबरोबर चर्चा करू शकतो.

केंद्रात आलेल्या स्त्रीच्या प्रश्नाचे सत्ता व नियंत्रणाच्या या समीकरणाच्या संदर्भात व्यवस्थित विश्लेषण झाले नाही तर समुपदेशनाच्या प्रक्रियेतून पितृसत्तेची तत्त्वे, धारणा अधिक घट्ट होण्याच्या खूप शक्यता असतात.

उदाः एखादा पती तक्रार करतो की पत्नी त्याला न विचारता सतत तिच्या आई-वडिलांना भेटते. तडजोडीच्या चर्चांमध्ये पुढे होणारे गैरसमज टाळण्यासाठी समुपदेशक तिला सुचवतो की पुढच्या वेळेला माहेरी जाण्यापूर्वीच तिने पतीची परवानगी घ्यावी. त्याचा हेतू तसा नसेल परंतु दिलेल्या सल्ल्यामधून समुपदेशक नकळत पितृसत्ता अधिक बळकट करत असतो.

'पत्नी पतीची परवानगी न घेता बाहेर जाते' हा वादाचा मुद्दा बनू शकतो. कारण पत्नीने आपली परवानगी घेतली पाहिजे हा पतीला आपला अधिकारच वाटतो. पत्नी त्याची परवानगी मागत नाही तेव्हा त्याला आपल्या अधिकाराला धक्का लागल्यासारखे वाटते. त्याला पुढे अशीही भीती वाटते की, त्याचे पत्नीवर नियंत्रण नाही असे सर्वांना वाटेल आणि त्याच्या पुरुषत्वाबाबत सर्वजण शंका घेतील; हे त्याला बिलकुल सहन होणार नाही !

अशा परिस्थितीत समुपदेशन खालील दिशेने जायला हवे.

अ. हिंसेने कोणतीही समस्या सुटत नाही उलट ती अधिकच तीव्र होत जाते असा त्याचा दृष्टिकोन बदलणे आणि

आ. समस्या सोडवण्याचा एक चांगला मार्ग म्हणून राग आणि भीतीशी (सत्ता किंवा पुरुषीपणा गमावण्याची भीती) सामना करण्याचे त्याचे कौशल्य आणि प्रेरणा वाढवणे. या परिवर्तनामुळे सत्ता आणि पुरुषीपणा जाईल या भीतीपेक्षा त्याला काय लाभ होईल यावर समुपदेशकाने भर द्यावा.

| सत्ता–नियंत्रणाच्या चौकटीत केसेसचे विश्लेषण करणे मदतकारक ठरते कारण : |
|---|
| - हिंसेचे मूळ कारण त्यातून स्पष्ट होते<br>- हिंसेच्या राजकारणाचे अधिक स्पष्ट विश्लेषण करता येते<br>- पुरुषांबरोबर या विषयांवर अधिक ठोस काम करणे शक्य होते |

ड. हिंसा करणाऱ्या पुरुषाच्या सवलती व असहायता समजून घ्याव्यात

पहिल्या भागात चर्चा केल्याप्रमाणे, स्त्रीने आणि पुरुषाने काय भूमिका बजावायची याबाबत पितृसत्ता आदर्श घालून देते. या आदर्शांमधून पुरुषांना काही सवलती मिळतात परंतु त्या आदर्शापर्यंत पोहोचण्याचा, तिथे टिकून राहण्याचा प्रचंड ताण पुरुषांवर असतो. या ताणाशी सामना करताना त्यांच्या असहायता उघड होतात. या असहायता समजून घेण्यासाठी त्यांच्या मनातील 'आदर्श पुरुषाची' संकल्पना काय आहे हे समजून घेतले पाहिजे. असहायतेची काही पाळे-मुळे पितृसत्तेतच असतात. परंतु काही प्रकारच्या असहायता ह्या त्यांनी स्वतःच निर्माण केलेल्या ताणातून येत असतात.

## ७.७.२ पितृसत्तेमधून आलेल्या असहायता ओळखणे

यापूर्वीच भाग १ मध्ये चर्चा केल्याप्रमाणे पितृसत्ता काही आदर्श घालून देते.

| **पितृसत्तेने घालून दिलेल्या 'आदर्श पुरुषां' ची काही वैशिष्ट्ये:** |
|---|
| अ. ते कुटुंबप्रमुख असतात<br>आ. सर्व व्यवहारांची ते जबाबदारी घेतात<br>इ. ते कमावते असतात<br>ई. ते स्वतःच नियम घालून देतात<br>उ. ते सर्वच निर्णय स्वतः घेतात.<br>ऊ. ते आक्रमक असतात तसेच संरक्षक पवित्रा असतो.<br>ऋ. ते शारीरिक दृष्ट्या अत्यंत ताकदवान असतात |

वरील वैशिष्ट्ये ही ख-या पुरुषाचा आदर्श घालून देतात. पुरुषाचे पुरुषत्व पारखण्यासाठी काही तत्त्वेही घालून दिली जातात. एखादी व्यक्ती या तत्त्वांमध्ये बसत नसेल, ही वैशिष्ट्ये त्याच्यामध्ये नसतील तर ख-या पुरुषत्वापासून आपण दूर जात आहोत, आपल्या पुरुषत्वामध्ये काही कमतरता आहे असे वाटू लागते. त्याच्या स्व-प्रतिमेला धक्का पोहोचतो.

एका उदाहरणाच्या मदतीने हे आपण समजून घेऊया:

बचत गटाच्या मूल्यमापनासाठी एका गटसदस्याची एकदा मुलाखत घेण्यात आली. या स्त्रीला गटातून ५००० रु.चे कर्ज मिळालेले होते. कर्जाच्या त्या रकमेतून तिने भाजीचे छोटे दुकान थाटले आणि लवकरच त्यातून चांगले उत्पन्न मिळवू लागली. कर्ज घेण्याच्या निर्णयाबद्दल कसं वाटतंय असे तिला विचारले असता तिने सांगितले की आत्तापर्यंतच्या सर्व निर्णयांपैकी हा तिचा सर्वात वाईट निर्णय होता. कारण जसे तिचे उत्पन्न सुरू झाले तेव्हापासून तिच्या नव-याने नोकरी सोडली आहे. तो सतत पैशांसाठी तिला मारहाण करू लागला. ती पैसे मिळवत नव्हती तेव्हा तिला कधीच मारहाण झालेली नव्हती.

या उदाहरणामध्ये त्या पुरुषाचे भांडण सुरू आहे/ दुविधा आहे ते त्याच्यातील 'आदर्श स्व' (कुटुंबातील कमावता, कर्ता) आणि त्याचा 'वस्तुस्थितीतील स्व' (नोकरी सोडणे) यांमधे. त्याच्या हातात पैसे नसणे म्हणजे त्याची आर्थिक सत्ता धोक्यात येते, म्हणून तो तिचे पैसे जबरदस्तीने मिळवतो. त्यासाठी शारीरिक ताकदही वापरतो. स्वतःची वर्तणूक बरोबरच आहे हे सांगण्यासाठी मग तो हे स्वतःलाच समजावतो की पुरुषाने आक्रमक झालेले चालते आणि त्याला विरोध झाल्यास मारहाण केलेलीही चालते.

अशा उदाहरणांमधून पुरुषांची **आर्थिक असहायता** स्पष्ट होते. तसेच कमावता, मिळवता हया साचेबध्द भूमिकेकडून असलेल्या अपेक्षा पूर्ण करू न शकण्याचीही भीती दिसते.
अशा प्रकारच्या उदाहरणांतून असेही ध्वनित होते की जसजसे स्त्रिया मिळवत्या होतील, प्रगती करतील तसतसे त्यांच्यावर हिंसा होण्याच्या शक्यता वाढत जातील. **स्त्रिया सबल झाल्या आणि पुरुष तशाच मागासलेल्या पुरुषप्रधान साच्यात अडकून पडले तर हे भांडण अटळ आहे.**

पितृसत्तेने दिलेल्या 'कमावता' किंवा 'कर्ता' या साचेबध्द भूमिकेमधून मिळणा-या सवलती आणि कमकुवत बाजू स्पष्ट करणारे अजून एक उदाहरण सांगता येईल. शिक्षण पूर्ण झाल्यावर पुरुषाने लगेच पैसे कमावण्याची अपेक्षा असते. तसे घडले नाही तर त्यांना लगेच

जाब विचारला जातो. त्यांच्यावर येणा-या दडपणाला ते बळी पडू शकतात. असे दडपण स्त्रियांच्या बाबतीत दिसत नाही. पुरुष त्यांच्या पुरुषत्त्वाची अशी किंमत मोजत असतात.

दुस-या एका उदाहरणातील हा पुरुष  समलिंगी होता. पत्नीशी लैंगिक संबंध होऊ शकले नाहीत यासाठी तो  पत्नीलाच जबाबदार धरतो. तिचे त्याच्यावर प्रेम नाही, ती त्याच्याबाबतीत रूक्ष आहे असे तो म्हणतो. ती नालायक असल्याबद्दल तो तिचा पाणउतारा करीत त्याचे लग्न मोडण्याचा विचार करतो. समाजामध्ये समलिंगी संबंधांना मान्यता नाही, त्याच्यासमोर आदर्श आहेत ते पुरुषप्रधान व्यवस्थेनेच घालून दिले आहेत त्यामुळे असे ताण निर्माण होतात ज्याचे परिणामी बायकोवर हिंसा केली जाते.

एका बेरोजगार पुरुषांच्या झालेल्या अभ्यासातून असे स्पष्ट झाले की, वाद-विवादांमध्ये पुरुष शारीरिक दृष्ट्या हिंसक होण्याची शक्यता जास्त असते. त्यांच्याकडे वाटाघाटीचे कौशल्य कमी असते. शिवाय पुरुषांमधील हिंसकपणा हे पितृसत्तेने मान्य केलेले वैशिष्ट्य  असल्याने पुरुषांनाही वाटाघाटींचा त्रास करून घेण्याची गरज वाटत नाही. ती कौशल्ये सवयीने वाढवणे, आत्मसात करणे हे शक्यच नसते. **सत्ताहीन असणे आणि सत्तेत असल्याची जाणीव यातूनच सवलती आणि असहायता निर्माण होत असते.** म्हणूनच पुरुषांची मानसिकता समजून घेताना त्यांना पुरुषसत्तेने दिलेल्या सवलती तसेच त्यांच्या असहायता यांच्यासह विचार झाला पाहिजे.

## ७.७.३ हिंसा करणाऱ्या व्यक्तीला स्वतःच्या समस्या ओळखायला आणि त्यांचा सामना करायला साहाय्य  करणे

### अ. <u>ती व्यक्ती हिंसक का आहे याच्या कारणांविषयी बोला</u>

पितृसत्ताक पध्दतीने पुरुषाला सत्ता बहाल केली असली आणि सवलतीही दिल्या असल्या तरी त्यांच्या जोडीने अनेक असहायतादेखील त्याच्या वाट्याला आलेल्या आहेत. सत्ताहीनतेच्या आणि असहायतेच्या अनुभवातून येणारा ताण जो पर्यंत समुपदेशक समानुभूतीने जाणून घेत नाही तो पर्यंत, हिंसा करणाऱ्या पुरुषाला केवळ आरोपी सारखेच बघितले जाईल व त्याला मदत मिळू शकणार नाही.

जर तो अपराधी आहे म्हणून त्याच्याकडे तुच्छतेने पाहिले तर तो समुपदेशनात खुल्या मनाने सहभागी होणार नाही. तो समुपदेशकाकडे निव्वळ न्यायालयाने आदेश दिला म्हणून आलेला असतो. परिणामतः त्याला आवश्यक ते साहाय्य  मिळणार नाही त्या नातेसंबंधात त्या महिलेसही न्याय मिळणार नाही. ती अशा टप्प्यावर येऊन उभी राहील की तिला न्याय

आणि नातेसंबंध यांतून एकाची निवड करायला  लागेल. ती नातेसंबंधासाठी न्याय मिळवणेही विसरून जाईल आणि असे झाले तर सदर कायद्याचे उद्दिष्टच हरवून जाईल.

सत्तेच्या गैरवापरामुळे पुरूषाचे बायको-मुलांबरोबरचं नातं दूषित होतं व त्यांच्या प्रेमाला देखील तो मुकतो. सत्तेच गणित नसलेलं, समानता आणि आपुलकी असलेलं नातं हे समाधानी आणि आनंददायी आयुष्याची गुरुकिल्ली आहे - हे जोपर्यंत त्या पुरुषाच्या लक्षात येत नाही, त्याचे फायदे जाणवत नाहीत तोपर्यंत पुरुष स्वतःमध्ये बदल घडवून आणण्याचा विचार देखील करणार नाही. असं निरोगी आणि आनंददायी नातं निर्माण करता येतं याविषयी खात्री वाटल्यास आणि त्याची प्रक्रिया समुपदेशकाकडून कळल्यास पुरुषाची मानसिकता बदलेल, व त्यातूनच निरोगी कुटुंबाची पर्यायाने निरोगी समाजाची पाया भरणी होईल.

जर व्यसनीपणा किंवा संशयासारखा मानसिक आजार असेल तर समुपदेशकास ते लक्षात आले पाहिजे आणि त्याने त्या व्यक्तीस मानसोपचारतज्ञाचे मार्गदर्शन मिळावे यासाठी न्यायालयास कळवले पाहिजे.

### आ. त्याच्याबरोबर  हिंसेच्या परिणामांची चर्चा करावी

पितृसत्तेने लादलेल्या अनेक मागण्यांचे पुरुषांवर ओझे झालेले असते आणि बरेचदा परिस्थितीच्या मागण्यांपेक्षा त्याची क्षमता आणि त्याला उपलब्ध असलेली साधने यांचे प्रमाण अत्यल्प असते (वर नमूद केलेल्या उदाहरणात पाहिल्याप्रमाणे); आणि त्याचा ताण पुरुषांवर येतो. या ताणाच्या व्यवस्थापन तंत्रांचे प्रशिक्षण समुपदेशकाने पुरुषास दिले पाहिजे. पितृसत्तेमुळे त्याच्याकडून असलेल्या या फुगवल्या गेलेल्या मागण्यांविषयी समुपदेशकाने त्या हिंसा करणाऱ्या पुरुषाशी चर्चा केली पाहिजे आणि त्याच्या मनावर आणि वर्तनावर होणाऱ्या परिणामांविषयी त्याला विचार करायला लावले पाहिजे.

जर समुपदेशक या दोषी पुरुषामध्ये संवाद कौशल्य, भावनांचे व्यवस्थापन करण्याचे कौशल्य, समस्या सोडवण्याचे कौशल्य निर्माण करून त्यास सुसज्ज करू शकला तर त्याच्या क्षमता आणि साधने वाढतील आणि त्याच्यावरील ताण कमी होईल, आणि त्याला जे हवे आहे ते हिंसा/ छळ न करताच मिळेल.

## ७.७.४ स्वतःकडून होणाऱ्या हिंसेला प्रतिबंध करण्यास मदत करणे

यासाठी समस्येचे निराकरण करण्यासाठी हिंसेव्यतिरिक्त अन्य पर्यायी तोडगे आहेत त्याचा विचार करण्यासाठी त्याला साहाय्य करावे

कौटुंबिक हिंसेबाबत हिंसाग्रस्त स्त्रीने जसे स्वतःच्या हक्कांबाबत जागरूक राहिले पाहिजे व समुपदेशकाची किंवा यंत्रणेची मदत घेतली पाहिजे आणि हिंसा सहन करणार नाही ही ठाम भूमिका घेतली पाहिजे, तसेच हिंसा करणाऱ्या पुरुषाने हे लक्षात घेतले पाहिजे की हिंसा करणं ही फक्त स्त्रीच्या मानवी हक्कांची पायमल्ली नाही तर कायद्याने गुन्हा देखील आहे आणि त्याचे गंभीर परिणाम होऊ शकतात. त्याने हिंसेला प्रवृत्त करणाऱ्या सर्व कारणांसाठी समुपदेशकाची किंवा इतर तज्ञांची मदत घेणे त्याची स्वतःप्रती आणि समाजाप्रती जबाबदारी आहे; आणि यासाठीच न्यायालयाने समुपदेशनाचा निर्देश दिला आहे.

समुपदेशकाने हिंसा करणाऱ्या व्यक्तीस त्याच्या हिंसक वर्तनास कारणीभूत ठरणाऱ्या बाबींचा विचार करायला साहाय्य करावे. उदाः व्यसनी व्यक्तीच्या बाबतीत, त्याने स्वतः त्याच्या व्यसनाच्या बाबतीत काही करायचे ठरवल्याखेरीज किंवा तज्ञांची मदत घेतल्याखेरीज तो त्याचे हिंसक वर्तन नियंत्रित करू शकणार नाही यावर त्याच्याशी चर्चा करावी. दुसरे उदाः हिंसा करणाऱ्या व्यक्तीची बायको आणि मुलांवरील मालकी हक्काची भावना इतकी पराकोटीला पोचलेली असते की आपण त्यांच्या हक्कांची पायमल्ली करत आहोत याचे भानच नसते. त्याला स्वतःच्या हक्काचे जे वाटते ते मिळालेच पाहिजे अशी त्याची मागणी असते आणि ते मिळवण्यासाठी तो हिंसेचा एक साधन म्हणून वापर करतो. अशा पितृसत्तेने पोसलेल्या समजुतींची हिंसा व्यक्त करण्यात महत्त्वाची भूमिका असते.

एकदा त्याने हिंसक वर्तनास कारणीभूत ठरणाऱ्या घटकांवर काम करायचे ठरवल्यास आणि त्यावर तोडगा काढल्यास तो अंमलात आणण्यासाठी कृती योजना आखण्यात त्याला साहाय्य करावे.

हिंसामुक्त नातेसंबंध असणे चांगले का आहे हे समजून घेण्यास त्याला साहाय्य करावे. याचा अर्थ समुपदेशकाने त्याला त्याच परिस्थितीकडे वेगळ्या नजरेने पाहायला साहाय्य करावे, समस्या निराकरणाची वेगळी कौशल्ये शिकवावीत आणि त्याच्या स्वतःत परिवर्तन घडवून आणण्यास साहय करावे.

## हिंसा करणाऱ्या पुरुषास समुपदेशन करताना लक्षात ठेवण्याचे काही मुद्दे

- ✓ पितृसत्ता, पुरुषांना त्यांच्या सत्तेची जाणीव देते तसेच त्यांना काही सवलतीही देते.
- ✓ सत्तेत असल्याची जाणीव आणि सत्ताहीन असणे यातूनच सवलती आणि असहायता निर्माण होत असतात.
- ✓ सत्ताहीनतेचा अनुभव, किंवा सत्ता जाण्याची भीती हीच त्यांची असहायता ठरते.
- ✓ पुरुष-सत्तेतून आलेले व स्वनिर्मित असे दोन्ही प्रकारचे ताण हे पुरुषाला हिंसक बनवण्यास पूरक असतात. याची चर्चा समुपदेशकाने त्या पुरुषाबरोबर केली पाहिजे.
- ✓ सवलती व असहायता यांची चौकट चर्चेसाठी वापरताना समुपदेशक हिंसेचे समर्थन देतो किंवा पाठिंबा देतो असे नाही.
- ✓ समुपदेशन प्रक्रिया ताण निर्माण करणाऱ्या घटकांच्या (म्हणजे पुरुषत्वाच्या/ आदर्श पुरुषाच्या कल्पनेमुळे निर्माण होणारा ताण) दिशेने चालली पाहिजे. हिंसा हा आपल्या प्रश्नावरील उपाय नाही हे यातूनच पुरुषाच्या लक्षात येऊ शकेल.
- ✓ समुपदेशनाची दिशा अशी असावी की त्यामुळे तो पुरुष ताण हाताळू शकेल, त्यावर तोडगा शोधून काढू शकेल, आणि स्वतःमध्ये परिवर्तन घडवून आणू शकेल. यामुळे त्या हिंसा करणाऱ्यास हे समजण्यास साहाय्य होते की त्याच्या समस्यांवर हिंसा हा तोडगा नाही.
- ✓ समुपदेशक किंवा कार्यकर्त्यांनी त्या पुरुषास हे शिकवले पाहिजे की पितृसत्ताक पध्दतीमुळे त्यांच्यावर 'पौरुषत्व' लादले गेले आहे, त्यातून काही सवलती मिळालेल्या आहेत पण असहायता देखील निर्माण झालेल्या आहेत, आणि हिंसेचे मूळ यातच दडलेले आहे. समुपदेशकाने असे पौरुषत्व नाकारायला शिकवले पाहिजे.
- ✓ पुरुषांबरोबर काम करताना त्यांना सत्तेचा अनुभव आणि त्यातूनच मिळणाऱ्या सवलती नाकारायला शिकवणे ह्यावर मुख्य भर असला पाहिजे.
- ✓ जर समुपदेशक त्या हिंसा करणाऱ्या पुरुषाला परिवर्तनाच्या लाभांच्या तुलनेत (पितृसत्तेने लादलेले पौरुषत्व नाकारून), सत्ता आणि त्याच्या स्वतःच्या पौरुषत्वाच्या कल्पनांचे दुष्परिणाम दाखवू शकला तर हे करता येईल.
- ✓ बदल केल्यामुळे विकास होतो असे दिसल्यास व्यक्तीला बदलाची प्रेरणा मिळते. जर समुपदेशकाने त्या हिंसा करणाऱ्या पुरुषाला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले तर तो स्वतःचा बचाव करण्याचा प्रयत्न करेल व असा बदल हा आपले अपयश आहे असे त्याला वाटेल.
- ✓ **'बदलातून फायदे होतात' - हिंसा करणाऱ्या पुरुषाला या निष्कर्षापर्यंत आणण्याचा प्रयत्न करणे ही समुपदेशकाची भूमिका आहे.**

## ७.८ नातेसंबंधाबाबत समुपदेशन करणे

सदर कायद्याखाली दाखल केले गेलेले बऱेचसे अर्ज वैवाहिक नातेसंबंधातील हिंसेविषयी असतात आणि म्हणून वैवाहिक नातेसंबंधाविषयी काही पूर्वसूचना येथे दिल्या आहेत.

सदर कायद्याखालील-समुपदेशकाने नातेसंबंधाबाबत समुपदेशन करणे आवश्यक ठरेल (जर न्यायालयाने पीडित महिलेस व हिंसा करणाऱ्या पुरुषास समुपदेशनासाठी पाठवलेले असल्यास). हिंसक नातेसंबंध बदलून परस्परांसाठी निरोगी आणि लाभदायक कसे ठरतील यासाठी साहाय्य करावे लागेल.

यासाठी प्रथम वैवाहिक नातेसंबंधात कोणते तणाव आहेत ते ओळखून त्याचे मूळ कुठे/ कशात आहे ते शोधून काढले पाहिजे. यासाठी खालील तक्ता/ साधन समुपदेशकास उपयोगी ठरेल.

जेव्हा एखादे जोडपे समुपदेशकाकडे समुपदेशनासाठी येते, तेव्हा समुपदेशक त्यांची वरवरची कारणे ओळखून त्यापलिकडे जाऊन त्या कारणांचे मूळ तपासून, त्याची तीव्रता किती आहे ते पाहून किती प्रमाणात काम कारवे लागणार आहे ते ठरवू शकेल.

अ. स्त्रीच्या बाजूने आणि पुरुषाच्या बाजूने हिंसेला पूरक कारणे आपण बघितली. पीडित स्त्री किंवा पती-पत्नी जेव्हा समुपदेशकाकडे येतात तेव्हा त्यांनी सांगितलेल्या तक्रारी खालील तालिकेत दिलेल्या कुठल्या गोष्टींबाबत असतात, समुपदेशकाला या तक्रारींच्या पलीकडे जाऊन हिंसेला कारणीभूत आणि पूरक असणाऱ्या घटकांचा शोध घ्यावा लागतो, व त्यानुसार त्या नात्यामधे करावयाच्या कामाची व्याप्ती आणि खोली निश्चित करावी लागते.

आ. मानवी वर्तनाची कारण मीमांसा करताना ढोबळ मानाने खालील गोष्टींचा मागोवा घेता येतो.

१. एखादी कृती ‘मी करणे योग्य आहे की नाही’ हे उत्तर आपल्या मूल्य किंवा धारणांवर ठरते.

२. एखादी कृती योग्य अथवा अयोग्य, यापेक्षा ‘मला करावीशी वाटते किंवा नाही’ हे प्रेरणेवर अवलंबून असते.

३. एखादी कृती करण्यास माझी हरकत नसते, मला करावीशी देखील वाटते, परंतु ती मी करू शकेन का आणि त्याचे परिणाम काय होतील, या प्रश्नाचे उत्तर व्यक्तीचे कौशल्य किंवा क्षमता असणे/नसणे यावर अवलंबून असते.

**वैवाहिक नातेसंबंधात कोणते तणाव आहेत ते ओळखण्यासाठी एक साधन -**

| वैवाहिक तणावाची लक्षणे दिसून येणाऱ्या बाबी → / तणावाचा स्रोत ↓ | घरातील जबाबदाऱ्या/ कामे | वैवाहिक नाते (जवळकीचे नाते) | आर्थिक व्यवहार | पालकत्व | कुटुंबीय आणि इतर नातेवाईकांशी संबंध | नोकरी/ धंदा आणि घर यामधील समतोल | आरोग्य विषयक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **मूल्य/ धारणा** *"मी असे करणे योग्य आहे की नाही?"* | | | | | | | |
| **प्रेरणा** *"मला करावीशी वाटते किंवा नाही?"* | | | | | | | |
| **क्षमता / कौशल्य** *"मी करू शकेन का?"* | | | | | | | |

इ. एकदा तणाव कुठे आहेत हे लक्षात आले की समुपदेशीबरोबर (पीडित स्त्री/ हिंसा करणारा पुरुष) कोणत्या समस्यांवर प्राधान्याने काम करायचे ते ठरवावे. मूल्य पातळीवरील समस्यांपेक्षा क्षमता / कौशल्य पातळीवरील समस्या हाताळणे अधिक सोपे असते. मूल्य पातळीवरील समस्यांपेक्षा प्रेरणा पातळीवरील समस्यासुध्दा हाताळणे सोपे जाते. एक कार्यपद्धत म्हणून ज्या समस्या त्या मानाने हाताळणे सोपे असते त्यात परिवर्तन घडवून आणण्यासाठी समुपदेशक समुपदेशन निर्देशित करू शकतो. इच्छित परिवर्तन घडवून आणण्यात यश आले तर परिवर्तन घडवणे शक्य आहे असा समुपदेशीचा आत्मविश्वास वाढेल.

ई. कृती योजना करणे आणि तिची अंमलबजावणी करणे ही त्यापुढची पायरी असेल.

नातेसंबंधविषयक समुपदेशन ही एक दीर्घकालीन प्रक्रिया आहे. सदर कायद्याखालील- समुपदेशकास कलम 14(2) अन्वये निर्देशित केल्याप्रमाणे अहवाल सादर करण्यास दिलेल्या

दोन महिन्याच्या कालावधीत ही प्रक्रिया पूर्ण करणे कठीण आहे. तथापि, जर त्या जोडप्यास समुपदेशन चालू ठेवायचे असेल तर ते तसे करू शकतात. अशा परिस्थितीत सदर कायद्याखालील-समुपदेशक समुपदेशन पूर्ण झाले नसल्यामुळे जास्त कालावधी मिळावा यासाठी विनंती करू शकतो (दोन्ही पक्षांच्या संमतीने) न्यायदंडाधिकारी त्याची परवानगी देऊ शकतात.

जर समुपदेशकाच्या लक्षात आले की परिवर्तनास प्रखर विरोध होत आहे आणि समझोता घडून आणणे कठीण आहे तर तिने समझोत्यात अपयश आल्याचा अहवाल सादर करावा (नियम 15). अशा परिस्थितीत न्यायालयीन कारवाई चालू राहते.

## ७.९ सदर कायद्याखालील-समुपदेशकास प्रयत्न करण्यास असलेला मर्यादित वाव

कलम 14 अन्वये निर्देशित केलेल्या सदर कायद्याखालील-समुपदेशनास नियम 14(8) अन्वये मर्यादा आहेत. त्यात असे नमूद केले आहे की कौटुंबिक हिंसा पीडितेच्या ‘तक्रारींचे’ निवारण करण्यासाठी ‘तोडगे शोधून’ काढणे हे उद्दिष्ट आहे. त्याचा अर्थ असा की तोडगे निघाले की सदर कायद्याखालील समुपदेशन संपते आणि ते समझोत्याच्या स्वरूपात लिहिले जाते.

म्हणून दीर्घ कालीन समुपदेशनास मर्यादित वाव असतो. जेव्हा विशेषतः दोन्ही पक्षांना समेट हवा असतो तेव्हा नातेविषयक समुपदेशन दीर्घकालीन असते. जरी कृती योजना दिलेल्या कालमर्यादेत बनवता आली तरी चालू असलेल्या समुपदेशनास आणि ती योजना अंमलात आणण्यासाठी लागणाऱ्या पाठिंब्यास अधिक वेळ लागतो.

## ७.१० समुपदेशनाविषयी अधिक

कौटुंबिक हिंसा पीडितेच्या समुपदेशनाविषयी, दोषी व्यक्तीच्या आणि नातेसंबंधाविषयीच्या समुपदेशनाविषयी, समुपदेशनात उपयोगात आणल्या जाणाऱ्या मानसशास्त्रीय तंत्रांविषयी; मानसिक आरोग्याच्या समस्यांविषयी आणि त्यांचे निराकरण कसे करावे याविषयी तसेच कौटुंबिक हिंसेविषयीच्या कायद्याबद्दल अधिक तपशील हवा असल्यास पुणे येथील लॉ कॉलेजच्या महिला अभ्यास केंद्राने तयार केलेली आणि प्रकाशित केलेली (२०१८) समुपदेशकांसाठी असलेली— “प्रवास सक्षमतेकडे” - ही मार्गदीपिका वाचावी. (या समुपदेशन मार्गदीपिकेसाठी wsc.ilslaw@gmail.com येथे संपर्क साधावा).

## ७.० समारोप

या लेखनासाठी अनके शिबिरांमधून, तसेच स्त्री अभ्यास केंद्राने कौटुंबिक हिंसा पीडित महिलांना मदत करणाऱ्या कार्यकर्त्यांसाठी घेतलेल्या समुपदेशनाच्या प्रशिक्षण प्रकल्पाच्या अनुभवातून, कार्यकर्त्यांच्या कामाच्या अनुभवातून आणि झालेल्या चर्चेतून आलेले मुद्‍दे मोलाचे ठरले. समुपदेशकांसाठी स्त्री अभ्यास केंद्राने प्रकाशित केलेल्या - 'प्रवास सक्षमतेकडे' मधील - अनेक संदर्भ या मार्गदीपिकेमध्ये दिले आहेत.

ही मार्गदीपिका आपल्याला उपयुक्त ठरेल अशी आम्ही आशा करतो.

**आणि या कायद्‍याच्या परिणामकारक अंमलबजावणीसाठी मन:पूर्वक सदिच्छा!**

# परिशिष्टे

फॉर्म ६

परिशिष्ट १

FORM VI

[See rule 11(1)]

FORM FOR REGISTRATION AS SERVICE PROVIDERS UNDER SECTION 10(1) OF THE PROTECTION OF WOMEN FROM DOMESTIC VIOLENCE ACT, 2005 (43 OF 2005)

| | | |
|---|---|---|
| 1. | Name of applicant | |
| 2. | Address along with phone number, email address, if any | |
| 3. | Services being rendered | ☐ Shelter<br>☐ Psychiatric Counselling<br>☐ Family counseling<br>☐ Vocational Training Centre<br>☐ Medical Assistance<br>☐ Awareness Programme<br>☐ Counselling for a group of people who are victims of domestic violence and family disputes<br>☐ Any other, specify |
| 4. | Number of persons employed for providing such services | |
| 5. | Whether providing the required services in your institution requires certain statutory minimum professional qualification? If yes, please specify and give details | |
| 6. | Whether list of names of persons and the capacity in which they are working and their professional qualification is attached | ☐ Yes<br>☐ No |
| 7. | Period for which services are being rendered | ☐ 3 years<br>☐ 4 years<br>☐ 5 years<br>☐ 6 years<br>☐ More than 6 years |
| 8. | Whether registered under any law/ regulation | ☐ Yes<br><br>☐ No |
| | If yes give the registration Number | |
| 9. | Whether requirements prescribed by any regulatory body or law fulfilled | |
| | If yes, the name and address of the regulatory body | |

*Note* – In case of a shelter home details under column 10 to 18 are to be entered by the registering authority after inspection of the shelter home.

| | | |
|---|---|---|
| 10. | Whether there is adequate space in the shelter home | ☐ Yes<br>☐ No |
| 11. | Measured area of the entire premise | |
| 12. | Number of rooms | |
| 13. | Area of rooms | |
| 14. | Details of security arrangements | |
| 15. | Whether record available for maintaining a functional telephone connection for use of inmates for last 3 years | |
| 16. | Distance of the nearest dispensary/ clinic/ medical facility | |
| 17. | Whether any arrangement for regular visits by a medical professional has been made | ☐ Yes<br>☐ No |
| | If yes, name of the professional | |
| | | |

Medical Professional

Address

Contact number

Qualification

Specialization

18. Any other facilities available, specify

*Note*.- In case of a counseling centre, details under column 19 to 25 are to be entered after inspection by registering authority

19. Number of Counsellors in the centre

20. Minimum qualification of the Counsellors, specify
    - ☐ Under graduate
    - ☐ Graduate
    - ☐ Post graduate
    - ☐ Diploma holder
    - ☐ Professional degree
    - ☐ Any other, please specify

21. Experience of counselors
    - ☐ Less than a year
    - ☐ 1 year
    - ☐ 2 years
    - ☐ 3 years
    - ☐ More than 3 years

22. Professional qualifications / experience of counsellors
    - ☐ Professional degree
    - ☐ Experience in family counseling centre as a ……………(designation)
    - ☐ Experience in psychiatric counseling as …………………………...(designation) in the …………………………(Name of the organization)
    - ☐ Any other relevant experience, please specify………………………………………………………………

23. Whether list of names of Counsellors along with their qualifications has been annexed
    - ☐ Yes
    - ☐ No

24. (a) Type of counseling provided
    - ☐ Supportive one-to-one counseling
    - ☐ Cognitive behavior therapy (CBT) Mental process that people use to remember, reason, understand, solve problems and judge things)
    - ☐ Provide counseling to a group of people suffering
    - ☐ Family counseling
    - ☐

(b) Facilities provided

- ☐ Offering personal professional and confidential counseling sessions
- ☐ A safe environment to discuss problems and express emotions
- ☐ Information on counseling services, support groups and mental health care resources
- ☐ One-to-one counseling and group work
- ☐ Therapies, ongoing counseling and health related support
- ☐ Any other, please specify

…………………………………………………………….

| | |
|---|---|
| | (c) Any other service<br>(1) Services being provided<br><br>(2) Personnel appointed<br><br>(3) Statutory minimum qualifications required for providing such service<br><br>(4) Whether list of names of personnel engaged for providing service along with their professional qualification is annexed<br>☐ Yes<br>☐ No<br><br>(5) Any other details which the service provider<br><br>………………if necessary continue on a separate sheet |
| | Place…………<br>Date………….<br><br>…………….……………..<br>Signature of authorized official<br>Designation<br>(Seal) |

परिशिष्ट २

# Form 1

# अर्ज १

(नियम ५ (१) आणि १७ (३) पहा)

कौटुंबिक हिंसाचारापासुन स्त्रियांचे संरक्षण अधिनियम २००५ अन्वये

कलम ९ (ब) आणि ३७८ (२) (क) नुसार

## कौटुंबिक घटना अहवाल

१) **पीडित व्यक्ती बाबतचा तपशील:**

१. पीडित व्यक्तीचे नाव -

२. वय -

३. लग्नानंतरचा सामायिक घराचा पत्ता -

४. सध्याचा पत्ता -

५. दुरध्वनी क्रमांक

**२) प्रतिवादीची सविस्तर माहिती:**

| अ क्र | नाव | प्रतिवादी पीडीत व्यक्ती बरोबर नाते संबंध | पत्ता | दुरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

**३)पीडीत व्यक्तीच्या मुलांविषयी सविस्तर माहिती:**

अ) मुलांची संख्या :

ब) मुलांविषयी सविस्तर माहिती :

| अ.क्र | नाव | वय | लिंग | मुलाचे सध्याचे वास्तव्य |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

**४) कौटुंबिक हिंसाचाराच्या घटना :**

**१) शारीरीक हिंसाचार:-**

| **अ. क्र.** | **दिनांक व ठिकाण हिंसाचार झाल्याची वेळ** | **कौटुंबिक हिंसाचाराला कारणीभुत व्यक्ती** | **कुठल्याही प्रकारची दुखापत झाली असल्यास कृपया स्पष्टीकरण देणे** | **तपशील** |
|---|---|---|---|---|
| | | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | |

## २)लैगिंक हिंसाचार

चौकोनात ( ✓) योग्य खुन करावी.

| अ. क्र. | दिनांक व ठिकाण हिंसाचार झाल्याची वेळ | कौटुंबिक हिंसाचाराला कारणीभुत व्यक्ती | हिंसाचाराचा प्रकार | तपशील |
|---|---|---|---|---|
| १. | | | ▪ सक्तीने लैंगिक संबंध ठेवणे<br><br>▪ अश्लिल चित्र बघण्यास सक्ती करणे<br><br>▪ दुसऱ्याच्या मनोरंजनासाठी तुमचा वापर केला असल्यास<br><br>▪ लैंगिक संबंधावद्दल इतर काही कृती अश्लिल शब्द वापरणे.<br><br>▪ अपमाणित करणे किंवा | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | इतर काही तुमच्या स्वाभिमानाला ठेच पोहचविणे (कृपया खाली दिलेल्याजागेवर या बाबतची सविस्तर माहिती देणे) | |

## ३)शाब्दिक आणि भावनिक हिंसाचार

चौकोनात ( ✓ ) योग्य खुन करावी.

| अ. क्र. | दिनांक व ठिकाण हिंसाचार झाल्याची वेळ | कौटुंबिक हिंसाचाराला कारणीभुत व्यक्ती | हिंसेचा प्रकार | तपशील |
|---|---|---|---|---|
| | | | ▪ चारित्रयावर संशय घेणे/ वागणुकीबद्दल दोषी धरणे<br>▪ हुंडा न आणल्याबद्दल अपमाणास्पद वागणुक देणे, इत्यादी<br>▪ मुलगा होत नाही म्हणुन अपमान करणे<br>▪ मुल होत नाही म्हणुन अपमान करणे<br>▪ घालुन पाडुन बोलणे, अपमानकारक, उपहासणात्मक किंवा अपशब्द वापरणे, मानहानी करणे | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | ▪ थट्टा करणे<br><br>▪ नावे ठेवणे<br><br>▪ शाळा कॉलेज किंवा इतर शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेश घेण्यास प्रतिबंध करणे<br><br>▪ नोकरी करु देण्यास प्रतिबंध करणे<br><br>▪ घराबाहेर पडण्यास प्रतिबंध करणे<br><br>▪ दुसऱ्या विशिष्ट व्यक्तीस भेटण्यास प्रतिबंध करणे<br><br>▪ तुमच्या इच्छेविरुद्ध लग्न करण्याची सक्ती करणे | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | ▪ तुम्ही निवडलेल्या व्यक्तीबरोबर लग्न करण्यास प्रतिबंध करणे<br><br>▪ इतर मानसिक किंवा शाब्दिक छळ असल्यास (कृपया त्याचे स्पष्टीकरण खालील दिलेल्या जागेवर लिहिणे | |

## ४) आर्थिक हिंसाचार

चौकोनात ( ✓ ) योग्य खुन करावी.

| अ. क्र. | दिनांक व ठिकाण हिंसाचार झाल्याची वेळ | कौटुंबिक हिंसाचाराला कारणीभुत व्यक्ती | हिंसेचा प्रकार | तपशील |
|---|---|---|---|---|
| | | | ▪ तुमच्या व मुलाच्या पालन पोषणासाठी घरखर्च न देणे<br><br>▪ तुम्हाला व तुमच्या मुलांना जेवण व औषध इत्यादी उपलब्ध करुन न देणे<br><br>▪ तुम्हाला जबरदस्तीने घराबाहेर काढणे<br><br>▪ घराचा कुठलाही भाग वापरण्यास प्रतिबंध करणे<br><br>▪ तुम्ही करत असलेली नोकरी /काम सोडण्यास भाग | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | पाडणे /प्रतिबंध करणे<br><br>▪ नोकरी करण्यास परवानगी न देणे<br><br>▪ भाड्याच्या घरात राहत असल्यास भाडे न भरणे<br><br>▪ तूम्हाला कपडे किंवा इतर घरगुती वस्तु वापरु न देणे<br><br>▪ तुमच्या परवाणगीशिवाय तुमचे स्त्रीधन किंवा इतर मौल्यवान वस्तु विकणे किंवा गहाण ठेवणे<br><br>▪ बळजबरीने तुमचा पगार,कमाई किंवा मजुरी घेणे<br><br>▪ बिल न भरणे उदा. लाईट बिल इत्यादी | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | ▪ इतर आर्थिके छळ(कृपया त्याचे स्पष्टीकरण खाली दिलेल्या जागेवर लिहिणे | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | |

## (४) हुंडयासंबंधी देण्यात येणारा त्रास-

| अ.क्र. | दिनांक व ठिकाण हिंसाचार झाल्याची वेळ | कौटुंबिक हिंसाचाराला कारणीभुत व्यक्ती | हिंसेचा प्रकार | तपशील |
|---|---|---|---|---|
| १. | | | ▪ हुंडयाची मागणी करणे (कृपया याबाबत विवरण दयावे) | |
| २. | | | ▪ हुंडयाबाबत इतर काही माहिती असल्यास कृपया सविस्तर माहिती दयावी | |
| ३ | | | ▪ हुंडयाचे साहित्य, स्त्रीधन, इ. बाबतची सविस्तर माहिती या अर्जासोबत जोडलेली आहे का?<br>होय<br>नाही | |

## ५) कौटुंबिक हिंसाचाराबाबत तुमच्या व मुलांविषयी इतर काही माहिती असल्यास:-

| | |
|---|---|
| १. | |

## ६) सोबत जोडलेल्या कागदपत्रांची यादी

| कागदपत्रांची नावे | दिनांक | इतर सविस्तर माहिती |
|---|---|---|
| कायदेशीर वैदयकीय प्रमाणपत्र | | |
| डॉक्टरांचे प्रमाणपत्र किंवा इतर कोणतीही डॉक्टरांनी सांगितलेली औषधे | | |
| इतर काही कागदपत्रे असल्यास | | |
| | | |
| | | |

## ७) कौटुंबिक हिंसाचारापासुन स्त्रियांचे संरक्षण अधिनियम २००५ तुम्हाला गरज असलेले आदेश

| अ.क्र | आदेश | होय/नाही | इतर काही |
|---|---|---|---|
| १. | कलम 14 अन्वये | | |
| 2 | कलम 17 अन्वये | | |
| ३. | कलम 18 अन्वये | | |
| ४. | कलम 19 अन्वये | | |
| ५. | कलम 20 अन्वये | | |
| ६. | कलम 21 अन्वये | | |
| ७. | कलम 22 अन्वये | | |
| 8 | कलम 23 अन्वये | | |

## ८) तुम्हाला पाहिजे असलेली मदत

| अ.क्र. | उपलब्ध सहाय्य मदत | होय/नाही | मदतीचा प्रकार |
|---|---|---|---|
| १. | समुपदेशन | | |
| २. | पोलिस मदत | | |
| ३. | फौजदारी कारवाईसाठी मदत | | |
| ४. | आधार गृह | | |
| ५. | वैदयकिय मदत | | |
| ६. | कायदयाची मदत | | |

## ९)कौटुंबिक घटना अहवाल नोंद करण्यास मदत करणाऱ्या पोलिस अधिकाऱ्याला सूचना:-

या नमुन्यातील माहितीमधुन पोलिसांच्या असे लक्षात आले की, भारतीय दंड विधान संहिता किंवा इतर कोणत्याही कायदयाने सांगितलेला गुन्हा घडला आहे तर पोलिस अधिकाऱ्याने-

(अ) हिंसाग्रस्त व्यक्तीला माहिती दिली पाहिजे की, अशा गुन्हयाबद्दल आरोपी व्यक्तीविरुद्ध फौजदारी प्रक्रिया , १९७३ (१९७४ च्या २ ) अन्वये करु शकते.

(ब)तिला फौजदारी कार्यवाही करायची नसेल तर तशी नोंद रोजनिशीमध्ये केली पाहिजे.त्यामध्ये या बाबीचा आवर्जुन उल्लेख करावा की हिंसाग्रस्त व्यक्तीचा आरोपीवर अत्यंत सलगीचा संबंध असल्यामुळे कौटुंबिक हिंसाचारापासुन संरक्षण व्हावे म्हणुन दिवाणी उपाय करण्याची तिची इच्छा आहे आणि तिने अशी विनंती केली आहे की तिला मिळालेल्या माहितीनुसार प्रथमदर्शनी माहिती अहवाल नोंदणी करण्याअगोदर सदर बाब अनिर्णित ठेवावी.

(क) हिंसाग्रस्त व्यक्तीने शारिरिक दुखापत किंवा त्रास याबाबत सांगितले असेल तर तिला त्वरीत वैदयकीय अधिकाऱ्यापासुन तिची वैदयकीय तपासणी करुन घेतली पाहिजे.

ठिकाण -

दिनांक -
पीडीत व्यक्तीची सही / अंगठा

नाव-

संरक्षण अधिकारी/ सेवादायी संस्था

सही व शिक्का

नाव-

पत्ता-

**प्रत रवाना-**

१.स्थानिक पोलिस ठाणे
२.सेवादायी संस्था / संरक्षण अधिकारी
३.पीडीत व्यक्ती
४.न्यायदंडाधिकारी

परिशिष्ट ३

**फॉर्म - ३**

# कौटुंबिक हिंसाचारापासुन स्त्रियांचे संरक्षण अधिनियम

# २००५ कलम २३(२) चे प्रतिज्ञापत्र (२००५ चा ४३ )

मे. न्यायदंडाधिकारी .......................... .............................................. यांचे न्यायालयात

**किरकोळ अर्ज क्र.**

सौ. ..........................................................................................

वय- .................. वर्षे. व्यवसाय-

**अर्जदार**

पत्ता- रा द्वारा.........................................................................

.............................................................................................

**विरुद्ध**

श्री ..........................................................................................

वय- ...................वर्षे. व्यवसाय-नोकरी

**जाबदेणार**

पत्ता - रा द्वारा .........................................................................

.............................................................................................

## प्रतिज्ञापत्र

मी ............................................................................श्री.........................................................................................यांची
पत्नी/ मुलगी/विधवा/ राहणार ......................................................................................................................

सत्यप्रतिज्ञेवर कथन करते की,

१. की माझ्या करीता किंवा माझ्या मुलाच्या / मुलीच्या वतीने ........................................................................ याकरीता केलेल्या अर्जातील मी अर्जदार आहे.

२. की मी ....................................................................................................................याची नैसर्गिक पालक आहे.

३. की मला या प्रकरणातील सर्व तथ्ये व परिस्थिती माहित आहे आणि म्हणुन हे प्रतिज्ञापत्र करण्यास मी समर्थ आहे.

४. की अभिसाक्षी प्रतिवादी सोबत.......................... ..........................................................येथे गेली .................दिवस राहत होती.

५. सदर अर्जामधील सर्व तपशील लाभ कलम / कलमे ......................................................................अन्वये मान्य करावा यासाठी माझ्या संमतीने दाखला केला आहे.

६. की अर्जातील सर्व मजकुर हा मला वाचुन दाखविण्यात आला आहे आणि त्याचा आर्थ इंग्रजी/हिंदी स्थानिक भाषेत(स्थानिक भाषा.......................)मला समजावुन सांगण्यात आला आहे.

७. की अर्जातील सर्व मजकुर सोयी करीता व पुरावृत्ती टाळण्याकरीता या प्रतिज्ञापत्राचा एक भाग म्हणुन वाचण्यात यावा.

८. की अर्जदारास असे वाटते कि प्रतिवादीकडुन कौटुंबिक हिंसाचार न होण्यासाठी जी मदत अर्जात मागितली आहे तो कौटुंबिक हिंसाचार प्रतिवादी कडुन पुन्हा होईल.

९. की अर्जदारास प्रतिवादीने असे धमकाविले आहे की.

..................................................................................................................................................

..................................................................................................................................................

..................................................................................................................................................

..................................................................................................................................................

१०.  की प्रतिज्ञापत्रा सोबत केलेला विनंती अर्ज तातडीचा असुन तो मंजुर करण्यात यावा जर अंतरिम एकतर्फी विनंती अर्ज अमान्य केला तर अर्जदारास खुपच आर्थिक त्रासास तोंड दयावे लागेल आणि अर्जात कथन केल्यानुसार प्रतिवादीकडुन अर्जदारास पुन्हा कौटुंबिक हिंसाचार जबरदस्तीने पुन्हा सहन करावा लागेल.

११.  की सदर अर्जात नमुद केलेली सर्व तथ्ये ही माझ्या माहिती व समजुतीप्रमाणे खरी व बरोबर आहेत तसेच कोणत्याही गोष्टी लपवून ठेवलेल्या नाहीत यातील कोणतेही भागातील कथने खोटी नाहीत.

अभिसाक्षी-

## सत्यता

सत्यता तपासुन घेतली............................................ठिकाणी....................................................................या तारखेला सदर प्रतिज्ञापत्रात कथन केलेला सर्व मजकूर हा माझ्या माहिती व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर असुन कोणत्याही गोष्टी लपवुन ठेवलेल्या नाहीत तेव्हाच हे प्रतिज्ञापत्र केले आहे.

संरक्षण अधिकाऱ्याची सही व शिक्का

पीडीत व्यक्तीची सही

परिशिष्ट ४

**फॉर्म नं.५**

**सुरक्षा नियोजन तक्ता.**

See rule 8(1)(iv)

| अ.क्र | स्त्रीवर झालेली हिंसा | 'अ' रकान्यामध्ये दिलेल्या हिंसेचा तिच्यावर झालेला परिणाम | हिंसेच्या संदर्भात स्त्रीला जाणवणार धोका | सुरक्षीततेसाठी घेण्याची खबरदारी | न्यायालया कडून मिळविण्याचे आदेश |
|---|---|---|---|---|---|
| | अ | ब | क | ड | इ |
| १. | शारीरिक हिंसा | असा हिंसक प्रकार परत घडण्याची भीती | १. पुन्हा हिंसक प्रकार घडेल<br>२. जास्त गंभीर स्वरूपात होईल,<br>३. जास्त दुखापत होईल,<br>४. इतर काही | | |
| २. | लैंगिक छळ व शिव्या तिला अपमानास्पद वाटेल असे इतर वर्तन | १. नैराश्य येईल,<br>२. अशी हिंसा परत होण्याची भिती<br>३. लैंगिक छळाच्या प्रयत्नांनाही तोड द्यावे लागेल. | १. पुन्हा हिंसक प्रकार घडेल<br>२. जास्त गंभीर स्वरूपात होईल,<br>३. जास्त दुखापत होईल,<br>४. इतर काही | | |
| ३. | तिच्यावर हत्याराने वार करण्याचा प्रयत्न करणे | १. शारीरिक दुखापत<br>२.मानसिक दडपण आणि अस्वास्थ्य<br>३. इतर काही, | १. पुन्हा हिंसक प्रकार घडेल<br>२. जास्त गंभीर स्वरूपात होईल,<br>३. जास्त दुखापत होईल,<br>४. इतर काही | | |
| ४. | मुलांना मारहाण करणे | १. मुलांना दुखापत होईल.<br>२. त्यांच्या मनावर वाईट परिणाम होईल,<br>३. इतर काही. | १. पुन्हा मारहाण होऊ शकते<br>२. त्यांच्या हिंसक वागणूकीमूळे घरातील वातावरण बिघडेल त्यांचा मुलांवर वाईट परिणाम होतो<br>३. इतर काही | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ५. | आत्महत्या करण्याची धमकी हिंसाग्रस्त स्त्रीला दिली जाणे. | १. घरातील वातावरण तणावाचे होते<br>२. सुरक्षीततेला धोका निर्माण होतो<br>३. इतर काही | १. आत्महत्येचा प्रयत्नं करेल<br>२. पुन्हा पुन्हा प्रयत्नं करेल<br>३. इतर काही. | | |
| ६. | आत्महत्येचा हिंसक व्यक्तीने प्रयत्नं करणे | १. घरामध्ये हिंसक वातावरण होते<br>२. असुरक्षीतता भिती,नैराश्य, वैफल्य आणि मानसिक धक्का स्त्ीला बसू शकतो.<br>३. इतर काही. | १. पुन्हा पुन्हा प्रयत्नं करेल,<br>२. मानसिक ताण,दुःख.<br>३. इतर काही. | | |
| ७. | मानसिक आणि भावनिक छळ उदा.अपमान खिल्ली उडवणे,नावे ठेवणे, मुलगा होत नाही म्हणून अपमान करणे वाईट चालीची असल्याचे खोटे आरोप करणे | १. वैफल्य,नैराश्य येऊ शकते,<br>२. मानसिक ताण,तीव्र,दुःख होईल<br>३. मुलांच्या विकासासाठी हे वातावरण योग्य नसेल<br>४. इतर काही. | १. पुन्हा पुन्हा छळ,होईल<br>२. मानसिक ताण दुःख<br>३. इतर काही. | | |
| ८. | हिंसाग्रस्त स्त्री,तिची मुले किंवा तिचे नातेवाईक यांना इजा पोहोचवण्याच्या घमक्या देणे | १. सतत काळजी वाटत राहील<br>२. मानसिक ताण दुःख<br>३. इतर काही | १. धमकी दिल्याप्रमाणे खरंच काही इजा पोहोचवेल<br>२. मानसिक ताण,दुःख<br>३. इतर काही | | |
| ९. | शाळा,महाविद्यालय किंवा इतर कोणत्याही शैक्षणीक उपक्रमात सहभागी होऊ न देणे | १. वैफल्य,नैराश्य येऊ शकते,<br>२. मानसिक ताण,तीव्र,दुःख होईल<br>३. इतर काही. | १. पुन्हा पुन्हा असा त्रास दिला जाईल.<br>२. मानसिक ताण,दुःख<br>३. इतर काही | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १० | तिच्या मनाविरुध्द लग्न करण्यास भाग पाडणे,तिच्या पसंतीच्या जोडीदाराबरोबर लग्न करू न देणे,घरातील लोकांच्या पसंतीच्या मुलाशी लग्न करण्याची जबरदस्ती करणे | १. वैफल्य,नैराश्य येऊ शकते,<br>२. मानसिक ताण,दुःख<br>३. इतर काही. | १. पुन्हा पुन्हा असा त्रास दिला जोईल.<br>२. मानसिक ताण दुःख<br>३. इतर काही. | | |
| ११ | मुलांना किडनॅप करण्याची,पळवून नेण्याची धमकी देणे | १. मुलांची सतत काळजी लागुन राहील.<br>२. मुलांच्या सुरक्षीततेला धोका निर्माण होईल.<br>३. इतर काही | १. मुलांना पळवून नेले े जाईल.<br>२. इतर काही | | |
| १२ | हिंसाग्रस्त स्त्रीला, तिच्या मुलांना किंवा तिच्या नातेवाईकांना मारहाण,दुखापत करणे | १. पुन्हा मारहाण होईल अशा दडपणाखाली सतत रहावे लागू शकते.<br>२. इतर काही. | १. पुन्हा हिंसक प्रकार घडेल<br>२. जास्त गंभीर स्वरूपात होईल<br>३. जास्त दुखापत होइ्ल<br>३. इतर काही. | | |
| १३ | हिंसक व्यक्तीच्या व्यसनांमूळे होणारा त्रास | १. तो त्यंाच्या व्यसनामूळे मारहाण किंवा<br>२. इतर काही त्रास देईल याची सतत भिती आणि दडपण येते<br>३. दैनंदिन आयुष्य सुरळीत राहू शकत नाही.<br>३. इतर काही | १. व्यसन केल्याचे निमित्त सांगून हिंसक वर्तन सहन करावे लागू शकते.<br>२. व्यसन केल्यावर अधिक त्रासदायक वर्तन करेल<br>३. घरखर्चासाठी तिला तो पैसे देणार नाही.<br>२. इतर काही | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १४ | त्याची वृत्ती गुन्हेगारी असेल यापूर्वी गुन्हेगारी रेकॉर्ड असेल | १. हिंसा होईल अशी सततची भिती काळजी वाटत राहील.<br>२. सुडवृत्तीने तो वागेल अशी भिती | १. कायदे नियमांच्या विरोधात वागण्याची वृत्तीच असल्याने न्यायालयाने हिंसा थांबवा असा दिलेला आदेश पाळेल याची खात्री देता येत नाही.<br>२. हिंसाग्रस्त स्त्री,तिची मुले त्याच्या पासून घोका होऊ शकतो<br>२. इतर काही. | | |
| १५ | अन्न,वस्त्र,निवारा औषधे,अशा दैनंदिन खर्चासाठी तो पैसे देणार नाही | | १. मुलाच्या आणि स्वतःच्या गरजा भागवताना खूप ओढाताण होऊ शकते<br>२. इतर काही. | | |
| १६ | तिला नोकरी व्यवसाय करू दिला जाणार नाही,रस असलेल्या कामात अडथळे आणले जातील | १. स्वतःच्या आणि मुलांच्या किमान गरजा पुर्ण करू शकणार नाही<br>२. इतर काही. | १. मुलांच्या आणि स्वतःच्या गरजा भागवताना खूप ओंढाताण होऊ शकते<br>२. इतर काही. | | |
| १७ | घरातून घालवून देणे घराचा ठरावीक भाग वापरण्यास परवानगी न देणे | १. स्त्री व मुले बेघर होण्याची भिती<br>२. घराच्या ठरावीकच भागात कोंडल्यासारखे वावरावे लागू शकते | १. स्त्रीची आणि तिच्या मुलांची सुरक्षीतता धोक्यात येते,<br>२. मुलांसाठी आणि स्वतःसाठी किमान निवऱ्याची सोय करताना खूप प्रयत्नं करावे लागतील.<br>२. इतर काही | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १८ | कपडे,भांडी व इतर दैनंदिन गरजेच्या वस्तू वापरण्याची परवानगी न देणे | १. तिच्या वस्तुंवर तिचा ताबा राहणार नाही.<br>२. त्या सर्व वस्तु परत आणण्याची ऐपतही नसेल. | १. तो त्या वस्तु विकुनही टाकू शकेल<br>२. इतर काही. | | |
| १९ | भाडेतत्वावर घरात रहात असेल तर घरभाडे न भरणे | १. घरभाडे न भरल्यामूळे घर सोडावे लागू शकते<br>२. राहण्याची पर्यायी व्यवस्था न होणे<br>३. पुन्हा स्वतः भाडयाने घर घेण्यासाठी पैसे नसणे | १. निवारा गमवेल<br>२. इतर काही | | |
| २० | तिचे स्त्रीधन व इतर मौल्यवान वस्तू तिच्या परवानगी शिवाय विकल्या जाऊ शकतील | १. तिच्या मौल्यवान वस्तू तिच्याकडे राहणार नाही.<br>२. इतर काही. | १.तिच्या वस्तू तिच्यापासून कायमच्या हिरावून घेतल्या जाऊ शकतील.<br>२. इतर काही. | | |
| २१ | तिचे स्त्रीधन तिच्याकडून काढून घेणे | १. ती तिच्या मौल्यवान वस्तूपासून वंचित राहील.<br>२. इतर काही | १. तो तिच्या सर्व वस्तु विकून टाकील किंवा त्यांची नासधूसही करेल.<br>२. त्या तिला कधीच मिळणार नाहीत अशी तिला भीती काळजी वाटू शकते.<br>३. इतर काही. | | |
| २२ | दिवाणी किंवा फौजदारी न्यायालयाने दिलेला आदेश तो डावलून टाकेल | १. इतर काही | १. इतर काही | | |

**हिंसाग्रस्त स्त्रीची सही** **संरक्षण अधिकारी / सेवादायी संस्था**